



म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं. क्र. : २८६४

REFBK-0022732

ऱ्हीही आम्ही प्रसंगानुसार खात असू.

गावची शीव सोडून गावात शिरले की, बकऱ्याप्रमाणे आम्ही कशावरही तोंड टाकत असू. जोंधळ्याचे गोड धाटं, बाजरीचे कोवळे कणीस, मकेचे कोवळे कणीस, तूर-मटकीच्या शेंगा, हरबऱ्याचे घाटे, शेंदण्या आणि शेंदाडे, काकड्या, वाळके, गाजरे, रताळे, बाभळीच्या खोडाला आलेला डिंक, जोंधळ्याच्या पानावर पडलेली साखर यांपैकी काहीही, ऋतुकालानुसार आम्ही फस्त करीत असू.

ह्या भ्रमंतीने कधीकधी, राखण नसलेल्या वाड्यावस्तीवर, गोठ्या छपराच्या दिवाळी कोनाड्यात कोंबडीने घातलेली अंडी चुकूनमाकून सापडत. अशी चोरीची अंडी उकडण्याची नामी पद्धत पोरांनी शोधली होती. गुरांचे रानात पडलेले शेण घेऊन त्यात अंडे पुरायचे. वर चघळ टाकून काडी लावायची. अंडी चांगली उकडून निघत. ती विहिरीच्या पाटात, डोणेत धुवायची आणि सोलून खायची. आज ही पद्धत थोडी गदळ वाटते, पण तेव्हा काही वाटत नसे!

रानात चुकलेली दुभती शेळी पकडून, वडाच्या पानांच्या द्रोणात तिला पिळायचे आणि ते धारोष्ण दूध पिऊन टाकायचे असाही एक धाडसी प्रकार केव्हा केव्हा करायला मिळे. चुकार गाई-म्हशींच्या बाबतीत मात्र हे धाडस अंगावर येई. विनओळखी हात कासेत येताच ही जनावरे लाथ हाणत. गरीब शेळ्यांपाशी एवढे बळ नसे.

माडगूळच्या मानाने कुंडल हा भाग चांगला सुपीक होता. इथे कैऱ्या, झाडाचे आंबे, गोंदणी, पिकलेली शिंदीची फळे, टमाटे अशी अपूर्वाईची फळे मी पहिल्यांदा खाल्ली. रानातसुद्धा ओल्या वाटाण्याच्या शेंगा, भुईमुगाच्या शेंगा, उड्या ऊस, असे चोरायला मिळे. पण इथल्या शाळेतले दाभाडे मास्तर फार कडक होते. अंगाने पहिलवानासारखे गलेलठ्ठ, ओठावर मनगटासारख्या मिश्या आणि सदा तांबरलेले डोळे त्यामुळे ते राक्षसगणापैकी वाटत. रूळ आणि छडी ही त्यांची आम्हाला मारायची हत्यारे होती. त्यामुळे शाळा चुकवून नोमाळ किंवा ओढ्याओघळींच्या काठाने हिंडणे फार अवघड होते. शिवाय माडगूळप्रमाणे कुणब्यारामोश्यांची वनविद्येत तरबेज अशी पोरेही इथे नव्हती.

प्राथमिक शाळेतून मी मोठ्या पट्ट्याच्या शाळेत जाईपर्यंत मला चांगलासा

दोस्त नव्हताच. एक कुलकर्ण्याचा वसंता, एक जोशी मास्तरांचा वसंता, एक इस्रायली सालोमन, एक कोकणस्थात खपवून जावा असा चांभाराचा हरी एवढे दोस्त होते, पण त्यांच्यातल्या कुणाला रानचा वारा माहीत नव्हता.

पत्र्याच्या शाळेत गेलो तेव्हा मराठी पाचवीच्या वर्गात पवाराचा शामू म्हणून एक बलदंड पोरगा होता. सगळा वर्ग त्याला वाबरून असे.

मधल्या सुटीत त्याने मला गाठले आणि धक्का मारून विचारले,

" काय रे भटा, खेळतो का मारामारी ? "

प्रसंग बाका होता. कारण शामची आणि माझी तशी बरोबरी नव्हती. तो चांगला डबल हाडाचा आणि खोंडासारखा रगेल होता. पण मीही गावच्या ओढ्यात झोंबी खेळलो होतो. म्हणालो,

" भीती घालतो काय रे, बघायचं आहे का तुला भटाचं पाणी ? "

शामू मनोमनी चमकला. असे उत्तर घेण्याची त्याला सवय नव्हती. म्हणाला,

" शाळा सुटू दे, न्हाई तुझ्या ढेरीतला भात भायेर काढला तर नावाचा शेम्या न्हाई ! "

पाच वाजता शाळा सुटली. पाटीदप्तर घेऊन पोरे बाहेर पडली. माझे घर फार लांब होते! थोडा जातो न जातो तंवर शाम्या आला, त्याच्या मागोमाग पोरांचा घोळका होता. आल्या आल्या शाम्याने आपली पुस्तके एका पोराच्या जवळ दिली. आणि माझ्यावर दंड थोपटले. जवळच्या दगडी भिंतीवर मी माझी पुस्तकं ठेवली आणि 'मारू किंवा मरू' अशा आवेशाने दोन कोंबडे जसे झुंजतात तसे आम्ही झुंजू लागलो. लाथा, बुक्क्या, ओरखाडे, मी खाली तो वर, तो खाली मी वर. दे धमाधम! असा प्रकार चार-सहा मिनिटे झाला. दोघांचेही शर्ट फाटून चिंध्या लोंबल्या, टोप्या धुरोळ्यात उडाल्या. गुढगे फुटले, ढोपर फुटले, अंगे धुळीने भरली. मग धापा टाकत एकमेकावर तमत आम्ही आमने सामने उभे राहिलो तेव्हा शामू हसला आणि जवळ येऊन माझा हात हातात घेऊन म्हणाला, " शाबास रे भादर. आपन तुपन आजपसनं दोस्त. हात मिलाव. "

आम्ही उराउरी भेटताच पोरांनी टाळ्या पिटल्या, शिट्या वाजवल्या.

मला चांगला दोस्त मिळाला. त्याच्या बरोबर मी राने धुंडली, डोंगर

वेधले, विहिरी तळी धुंडाळली. रानमेवा खाल्ला.

( हा शामराव पुढे पत्री सरकारात जाऊन नामवंत पुढारी झाला म्हणे. )

माझ्या वडिलांची बदली झाली, आणि आम्ही किन्हईला गेलो. हे गाव तर फारच निसर्गरम्य होते. फळांच्या बागांची तिथे लयलूट होती. आंबे, पेरू, फणस, नारळ, सीताफळे, रामफळे आणि आवळे !

बघता बघता माझ्याभवती दोस्त गोळा झाले. एक माळ्याचा शंकर, एक शिंप्याचा बबन, एक कुणब्याचा खाशाबा, आणि एक न्हाव्याचा महादा.

माझे भटकणे चालू राहिले. आता वडील चांगल्या हुद्द्यावर म्हणजे किन्हई देवस्थानचे वहिवाटदार होते. एवढ्या मोठ्या अधिकाऱ्याच्या मुलाला शोभावेत असे माझे गुण नव्हते. वानरांप्रमाणे मी कुणाच्याही बागेत शिरून फळे खात असे. वडिलांकडे तक्रारी येत. कधी सापडलो म्हणजे बागेचा धनी माझी टोपी हिसकावून घेई आणि ती घेऊन सरकारवाड्यात येई. वडिलांना दाखवून म्हणे,

" तुमच्या मुलाला काही ताकीद द्या साहेब, मला माहीत नव्हतं मुलगा तुमचा हे. फार नासाडी करतात हे बागांची. खायचा जिन्नस मुलं खायची पन हे संगट फौज घेऊन येतात. दहाबारा पोरं बागेतल्या झाडांवर दोन दोन तास फळं खात राहिली तर माझ्या गरिबाचं किती नुकसान होईल बरं ? "

आपल्या परीने मला वडील हे कसे अयोग्य आहे, हे समजावून सांगत, बागवानाची समजूत घालत. प्रकरण तात्पुरते मिटे. मला पश्चात्ताप होई, तो काही दिवस टिके.

किन्हई गावाबाहेर, किन्हई ते सातारा रोड ह्या रस्त्यावर एक लायब्ररी बंगला होता. औंधकर सरकारच्या मालकीचा. त्याच्या परिसरात सुरेख बाग होती. नाना फळझाडे होती. एकदा सुट्टीच्या दिवशी मी, न्हाव्याचा महादा आणि माळ्याचा शंकर असे तिघे तिसऱ्या प्रहरी बाहेर पडलो आणि बंगल्या-पाशी आलो. बंगल्यासमोर रस्त्याच्या पलीकडे दोन प्रचंड मोठी अति उंच चिंचेची झाडे होती. त्याच्या सावलीला, तोडलेल्या झाडाचा लांबलचक ओंडका होता. वहिवाटदाराचा मुलगा असल्यामुळे मी एकटाच बागेत शिरलो. बरेच पेरू तोडून आणले. वाटावाटी करून पेरू खात आम्ही त्या ओंडक्यावर गप्पा मारत, गुढगे हालवत बसलो.

दरम्यान आभाळ भरून आले.

जवळचे पेरू संपले. मी शंकरला आणि महादाला म्हणालो,

"तुम्ही चला, आणखी पेरू काढू. माळी आला तर काही बोलणार नाही. बाग सरकारचीच आहे. आमचे दादा वहिवाटदार आहेत."

मी बराच धीर दिला तेव्हा शंकरने हिंमत बांधली. महादा मात्र आला नाही. म्हणाला,

"तुम्ही तोडून आणा, मी बंगल्याच्या आवारात येणार नाही. माळी मला धरून सरकारवाड्यावर नेईल"

महादाला बाप नव्हता, आणि आपल्या आईचा तो एकुलता एक लेक होता, त्यामुळे तो घाबरून असायचा.

शेवटी, त्याला भागूबाई ठरवून आम्ही गेलो आणि झाडाच्या शेंड्यावर जाऊन पेरू तोडत खिसे भरत राहिलो.

आभाळ चांगलेच भरून आले. काळेनिळे झाले. अंधारून आले. सातार रोडच्या दिशेला विजा चमकू लागल्या. पेरू खाण्याच्या नादात आम्हाला प्रसंगाचे गांभीर्य कळले नाही.

एकाएकी प्रचंड कडकडाट झाला. आणि काळ्याभोर आभाळातून विजेचा लोळ भूमीवर उतरला. डोळे दिपले. भ्यालेल्या खारीसारखे आम्ही फांद्यांना चिकटून राहिलो. थोडी शांतता झाल्यावर खाली उतरलो आणि पळत चिंचेकडे येऊन पाहिले तर, वीज चिंचेवर पडली होती. फांद्या पाने करपून गेली होती. खोडाचा एक भागही करपला होता. आणि खाली ओंडक्यावर बसलेला महादा करपून खाली धुळीत पडला होता.

मी भितीने थिजून गेलो. माणसाचे अपघाती मरण मी प्रथमच पाहिले.

गाव शेजारीच होते. जवळपासच्या रानातून लोक काम करीत होते. ते "वीज पडली ? वीज पडली" असा गोंगाट करत धावून आले.

महादाभोवती कडे पडले. कांदा आणा, पाणी आणा, अशी धावपळ झाली. पण त्याचा प्राण केव्हाच निघून गेला होता. कुणीतरी गावात जाऊन त्याच्या आईला बातमी दिली आणि ती आकांत करीत, छाती पिटत आली. गोंधळ माजला. मग शंकरच्या घरची माणसे आली. माझी आई आली; वडील आले. आम्हाला जिवंत बघून त्यांना आनंदाचे रडू आले.

माझी आई मला पोटाशी धरून रडरड रडली.

पेरूच्या झाडाकडे न जाता मीही महादाशेजारी त्या ओंडक्यावरच बसून राहिलो असतो तर ?

घरी नेऊन आईने मला देवघरातील देवांपुढे उभे केले आणि म्हणाली,

" जगदंबेची शपथ घे, म्हण, पुन्हा कधी घरी न सांगतासवरता असा रानात जाणार नाही. "

मी शपथ घेतली. आईचे तेवढ्याने समाधान झाले नाही. माझा हात आपल्या गळ्यावर ठेवून ती म्हणाली, " बघ, ही शपथ मोडलीस तर मी मरून जाईन पटकन्. "

बराच काळ ही शपथ मी कसोशीने पाळली. बाळपण संपले. पंखे फुटली. बाहेरच्या जगात उडाली.

रानमेव्याचा प्रकार बदलला. रानचा नाद सुटला नाही. विसाव्या वर्षी हाती बंदूक पडताच मी पुन्हा सवंगडी जमवून रानोमाळ भटकू लागलो.

मग आई म्हणाली,

" मी आता थकले. कितीदा आणि कोणत्या कारणासाठी. आंधळ्याची गुरं देव राखतो, माझ्या वांड पोराला तोच राखील. "

तिचे म्हणणे खोटे नाही !

# २

# देऊळ

**धन्य अंजनीचा सुत, त्याचे नाव हनुमंत**
**ज्याने सीता शुद्धि केली, रामसीता भेटविली !**

मारुतीचें देऊळ हे म्हणण्यासारखे असे एकच देऊळ गावात आहे. आणखीही एक खंडोबाचे जुनेपुराणे देऊळ आहे, पण ते गावापासून जवळ जवळ मैलभर दूर, माळावर आहे. पूर्वी पांढर तिथेच होती म्हणतात. खंडोबाचे देऊळ पहिले गावाला लागूनच होते. गावातल्या बायका पहिल्या कोंबड्याला उठायच्या आणि दळणे घालायच्या अगोदर जात्यांचे खुंटे खटाखटा ठोकायच्या. त्या कटकटीने खंडोबाचे टकुरे उठू लागले, म्हणून देवानेच गावाला उठवून लांब घालविले असे या फारकतीचे कारण सांगतात. पण या फारकतीमुळे आता गंमत अशी झाली आहे की, खंडोबा अगदीच एकटा पडला आहे. त्याला माणसाचा शब्द लवकर ऐकू येत नाही, रात्री-अंधारी दिवा दिसत नाही. खांडाला टांगलेली घंटा उगीच कधी आठवण झाल्यासारखी आवाज करते. क्वचित कधी, कुणाचा जोडा बाहेरच्या पायरीशी राहतो. भंडारा आणि खोबऱ्याची वाटी, या चंपाषष्टीची त्या चंपाषष्ठीपर्यंत खंडोबाला बघायला मिळत नाही. माणसांचा वावर नसल्यामुळे देवाचे देवपण गप्प झाले आहे.

अशी गोष्ट मारुतीच्या बाबतीत नाही. त्याने जसा राम छातीत ठेवला होता, तसेच गावाने मारुतीला ठेवले आहे.

मारुतीचे देऊळ असायला साधारणच आहे. देवळाचे म्हणून विशेष बांधकाम असते, तसे नाही. दहाएक खणांची साधीच इमारत आहे. आठ खण सभामंडप आणि दोन एक खण गाभारा. मूर्तीही आपली साधीच आहे. कुठे तांबडा मारुती असतो, कुठे उभा मारुती असतो. आमचा हा मारुती – साधाच आहे. मूळच्या पाषाणमूर्तीवर आज अनेक वर्षे भक्तगणांनी तेलाचे 'म्हाजन' केल्यामुळे मारुती काही वेगळाच झाला आहे. पाषाणाचा नसून – तो सरसासारख्या एखाद्या पदार्थाचा केला आहे, असे वाटते. कोणाचा कंदील गळू लागला किंवा तांब्या – घागरीला भोक पडले म्हणजे मूर्तीच्या आजूबाजूची मेणी लोक काढून नेत आणि ती चिकटवून गळणारा कंदील, भांडे तात्पुरते दुरुस्त करीत.

रुईच्या पानाफुलांच्या माळांनी लोक मूर्तीला शृंगारतात. छान ठळक गंधही लावतात. मार्तंडकाका कुलकर्णी दर शनिवारी मारुतीची चांगली पूजा करीत, मारुतीच्या रुंद छातीवर पांढऱ्या गंधाने 'श्रीराम' अशी अक्षरे काढीत, तेव्हा हनुमानाचे 'रामदूत' हे नाव सार्थ होत असे. मारुतीला सोबत म्हणून की काय कोण जाणे, गजाननाचीही एक लहानशी मूर्ती गाभाऱ्यात आहे, पण तिला वेगळे अस्तित्व नाही. गाडीबरोबर नळ्याची यात्रा होते, तशी मारुतीबरोबर गजाननाचीही वासपूस होते, इतकेच.

मंडपातून गाभाऱ्यात जाण्यासाठी पूर्वी काही आडकाठी नव्हती. देव आणि भक्त यांच्यात दार नव्हते. पण मध्ये गावातील वांझोट्या बायकांची संख्या जास्त झाली. साहजिकच या बायका देवरुषांनी सांगितल्यावरून रात्री अपरात्री येऊन मारुतीचे पाय धरू लागल्या. त्याला त्रास होऊ लागला. घाम फुटू लागला. गावकऱ्यांच्या हे ध्यानात आले, तेव्हा त्यांनी मधे एक सळयांनी बंद असलेले दार केले. रात्री ते बंद करण्याचा हुकूम गुरवाला केला. त्यामुळे आता बायकांचा थेट उपद्रव मारुतीला होत नाही.

माझ्या लहानपणी सभामंडपाच्या तिन्ही भिंतींवर रंगीत चित्रे होती. कुणा चितार्‍याने रंगविली होती कोण जाणे ! पण हा चांगला कसबी असावा ! पोथीतल्या चित्रांच्या धर्तीवर काढलेली ही चित्रे मोठी सुरेख होती. बायकोला

खांद्यावर घेऊन आईवडिलांच्या गळ्यात दावे बांधलेला पुंडलीक, रामपंचायतन, वडाला वाणे घेऊन निघालेल्या सुवासिनी, गावापुढे पोथी वाचणारा ब्राह्मण, चिमण्या, पोपट, मोर आणि माकडे यांनी गजबजलेले आंब्याचे झाड, — असली नाना चित्रे किती तरी वर्षे देवळात होती. पुढे जुना गिलावा ढासळला म्हणून नवा करावा लागला आणि ही चित्रे नाहीशी झाली ती पुन्हा कुणाकडून काढून घ्यावीत असे गावाला वाटले नाही. अलीकडे – अलीकडे आमच्या गावच्या मार्तंडा चौगुले या कसबी माणसाने पत्रा कातरून केलेली मारुती, बैल, गाय, पोपट असली चित्रे देवळाच्या खांबावर ठोकली आहेत. यामुळे कल्हई लावण्यापासून पत्र्याच्या मोटा ठोकण्यापर्यंत सर्व व्यवसाय करणाऱ्या चौगुल्याचे नाव सर्व जगात जाहीर झाले आहे. या कामी त्याला कुणाची परवानगी घ्यावी लागलेली नाही. एखाद्याला आपले काही कसब जनलोकांपुढे मांडायचे असेल तर तो ते मारुतीच्या देवळात मांडू शकतो. त्याला कोणी हरकत घेत नाही. इतकेच काय, पण फिरता कासार भांडीकुंडी घेऊन आला तर त्याला आपले दुकान देवळात थाटता येते.

दरवर्षी खंडोबाची पालखी निघते. ती पालखी आणि अबदागिऱ्या मारुतीच्या सभामंडपातील आढ्यालाच वर्षभर टांगलेल्या असतात. हनुमानजयंतीला उपयोगात आणण्यासाठी कधीकाळी केलेला एक लहान रंगीत पाळणाही पालखीच्या जोडीने आढ्याला टांगलेला दिसतो. याशिवाय देवळात तसबिरी वगैरे काही नाही. खांडावरून वचनेही लिहिलेली नाहीत. अगदी अलीकडे ' पायताणे बाहेरच ठेवावीत ' अशी एक सूचना मात्र दिसते. चुकून कोणी हा नियम मोडला, पायताणे जोत्यावर ठेवली, तर त्याला दंड म्हणून एक नारळ फोडावा लागतो. नारळाचे पाणी आणि एक लहान तुकडा मारुतीला मिळतो, बाकीचा नारळ देवळात असलेले लोक खातात.

दिवसातून एकदा तरी गावातला माणूस देवळाकडे चक्कर मारतो. यात दर्शन घेणे हा हेतू असतोच असे नाही. देवळाकडे गेले म्हणजे चार लोकांच्या गाठीभेटी पडतात, नवेजुने कळते. रानामाळातल्या कामामुळे किंवा गोड वाटत नसल्यामुळे, एकदोन दिवस जर देवळाकडे जाता आले नाही, तर अगदी चुकल्यासारखे होते. फलटणीत असलेला किंवा मुंबईला गोदीत काम करणारा माणूस रजेवर आला, म्हणजे त्याला देवळाकडे जाण्याची ओढ असते. एकदा

देवळाकडे गेले की गावात सर्वांना त्याच्या येण्याची वातमी कळते. मोमिनांची पोरे मुंबईला अंड्याचा व्यापार करतात. ती सुद्धा गावी आली म्हणजे देवळाकडे येतात. आमचे दादा रक्तदाबाच्या विकाराने आजारी होते. त्यांना घराबाहेर पडायला बंदी होती. सर्वांचा डोळा चुकवून ते केव्हातरी उठून जात आणि एकटेच देवळाच्या पायरीवर जाऊन बसत.

नव्या वर्षाच्या सुरुवातीला उभे गाव देवळात 'निंब खाण्यासाठी' जमते. निंबाचा कडू पाला चिंच, गूळ, खोबरे घालून गुरव तयार करतो. हा कडुगोड पाला खाण्यासाठी जमलेल्या लोकांना गावचा जोशी वर्षफल सांगतो. व्यक्तिशः कोणाही माणसाला आपल्याला गुरू कोणता आहे, हे त्याच्याकडून काढता येते, पण त्याला एक पैसा भरावा लागतो. वयत्याच्या बदलात फक्त वर्षफलच येते. वर्षफल ऐकून आणि निंब खाऊन लोक घरोघरी जातात.

निंब खाण्याचा हा समारंभ आणखीही एका वेगळ्या कारणासाठी महत्त्वाचा असतो. त्या दिवशी गावचे म्हणून जे पैसे असतात त्यांचा हिशेब पुरा होतो. उरूस जत्रेच्या निमित्ताने किंवा आणखी कसल्या सामुदायिक कामाच्या निमित्ताने घरटी वर्गणी करून जमविलेला पैसा त्या त्या कारणासाठी खर्च होतोच असे नाही. असा शिल्लक पैसा, दहा जणांच्या विचाराने, कोणा गरजूला व्याजाने दिला जातो. तो व्याजासहित गावापुढे मांडण्याची हीच वेळ असते. ऋणकोने ही रक्कम गावापुढे नाही मांडली, तर गाव निंब खात नाही. त्यामुळे जीव गहाण ठेवून ही रक्कम मांडावी लागते. या सर्व पैशाच्या भानगडीत बाचाबाची होते निंब खाण्यासाठी जमलेल्या मंडळींत कडवटपणा येतो.

पाडव्याला निर्माण झालेला कडवटपणा हनुमानजयंतीच्या सुंठवड्यापर्यंत सहसा राहात नाही. दिवस उगवण्यापूर्वी हनुमानाचा जन्म, तर रात्रीपासूनच भजनाचा गजर देवळात सुरू होतो. कधी हातात टाळ न घेणारेही टाळाचा कीस पाडतात. गळा नसलेलेही गळ्यावर गातात. कपाळावर घाम फुटेपर्यंत आणि डोईचे मुंडासे गळ्यात येईपर्यंत लोक आवाज उंचावतात आणि माना झुंजावतात. विण्याच्या तारा तापतात आणि मृदंगाला वरचेवर कणकेचा मुखलेप करावा लागतो. असा मधुर ध्वनी पहाटेपर्यंत होत असतो. तिकडे पूर्वेला तांबडे फुटले, आंघोळी करून माणसे देवळात येऊ लागली म्हणजे

भजन अगदी शिगेला पोचते. वर्षभर देवळाच्या भानवटीला अडकून राहिलेल्या पाळण्यात अंजनीचा सुत जन्म घेतो. फुले पडतात आणि उगवतीला लालभडक सूर्याचा गोळा वर येतो.

रामनवमीला ज्या पाळण्यात कौसल्येचा राम जन्म घेतो त्याच पाळण्यात हनुमानाचा जन्म होतो आणि पुढे कृष्णाष्टमीला यशोदेचा कान्हा जेव्हा अवतार घेतो तेव्हाही तोच पाळणा असतो. हे तिन्ही जन्म मारुतीच्या देवळातच होतात. तीच मंडळी, तेच देऊळ, तोच पाळणा-पण प्रत्येक वर्षी जन्म नव्याने होतात.

या जन्मोत्सवाप्रमाणे 'पोथी लावण्याचा' समारंभही महत्त्वाचा समजला पाहिजे. वर्षातून एखादी-दुसरी पोथी लावली जाते. गावच्या शिवेलगतच होऊन गेलेल्या श्रीधरस्वामीचा हरिविजय, पांडवप्रताप लावला जातो, तेव्हा देवळात फार गर्दी होते. बायाबापड्या, पोरेठोरे सगळी जमतात. पोथी वाचणाऱ्याने अर्थ सांगितला पाहिजे असे नाही. मी जेव्हा पांडवप्रताप वाचत होतो, तेव्हा बरीच वर्षे मास्तरकी केलेले गोपाळतात्या अर्थ सांगायला होते. हा अर्थ सर्वजण लक्षपूर्वक ऐकतात. महार मंडळी बाहेर बसलेली असतात. गवंड्याचा धंदा करणारा, काव्य करता येणारा 'गुणी मारुती' महार हा महार-मंडळींपैकी सर्वांत जाणता श्रोता. हलक्या आवाजात तो आपल्या मंडळींना अर्थाची फोड करून सांगतो. श्रोते वरचेवर माना डोलावतात. मधूनच अर्थ सांगणारा दृष्टान्त देतो. रात्री अकरा-बाराच्या सुमाराला जेव्हा पोथी संपते, तेव्हा पोरे झोपी गेलेली असतात, बायांचे डोळे पेंगत असतात. पोथी संपताच घरी जाण्याची धांदल होते. खोच्या ओच्यातून आणलेल्या रताळ्याच्या काचऱ्या, शेंगदाणे पोथीपुढे ठेवून सर्वजण नमस्कार करतात. शेंगदाण्याचा प्रसाद वाटला जातो आणि पोथी संपते. महारमंडळी उशिरापर्यंत देवळापुढेच बसतात आणि गुणी मारुतीकडून ब्रह्म, माया वगैरे भानगडी ऐकतात.

रोज सकाळी मारुतीला पाणी घालणारी दहावीस मंडळी गावात आहेत. हे भक्तगण भल्या सकाळीच चंबू आणि धोतर घेऊन विहिरीवर जातात. हर गंगे, हर भागिरथी म्हणून विहिरीत उड्या घेतात. वाफा मारीत असलेले विहिरीचे कोमट पाणी चंबूत घेऊन ओले धोतर गाळीत मारुतीच्या देवळाकडे

येतात. गार पाण्याचा चंबू मारुतीच्या डोक्यावर ओततात. रोज वेगवेगळ्या तीर्थांचे नाही तरी विहिरीचे पाणी मारुतीरायाला स्नानासाठी मिळते.

शनिवारी संध्याकाळी मारुतीच्या दिव्याला तेल घालणारीही बरीच मंडळी गावात आहेत. नारायण वाणीसुद्धा लहानशा मापातून टाकभर तेल आणून देवाला घालतो. ' गुणी मारुती ' कापूर तेल घेऊन देवळापाशी उभा राहतो आणि कोणी स्पृश्य आला की त्याच्या हातून कापूर लावतो. दिव्यात तेल घालतो. पांडा न्हावी, विठोबा कुंभार, संभू परीट, इत्यादी अठरापगड जातींचे लोक आपल्या तेलाने मारुतीचा दिवा पेटता ठेवतात.

काही वेळा हा दिवा दंडाच्या तेलावरही जळतो. आगळीक केलेल्या माणसाचा देवळापुढे न्यायनिवाडा होतो. अपराध्याला ' मारुतीला चार घडे तेल द्यावे ' अशी जबर शिक्षा होते. शिक्षेपरी शिक्षा होते आणि देवाला तेलही मिळते.

देवळासमोर होणारा न्यायनिवाडा देवाच्या नावानेच होतो. न्यायाधीश मारुती असतो, तो पाचांच्या तोंडून बोलतो, इतकेच. असा एखादा खटला-खोकला महिन्यातून देवळापुढे येतोच. कधी टोपा महाराची सून नांदायचे नाकारते, तर कधी मुसलमानाच्या रानात परीट गुरे घालतो. कधी बयाजी महार, सुखदेव यलमाराला उलटून बोलतो तर कधी नारायण वाणी आपल्या आईला नीट वागवीत नाही. वरवर लहान दिसणाऱ्या या बाबींचा देवळापुढे फार विचारपूर्वक खल केला जातो.

देवळासमोर कुठला खटला यावा आणि पाटलाकडे कुठली फिर्याद जावी याबद्दल काही नियम नाहीत; पण हा पोच सर्वांनाच असतो. रिपोर्ट, लेखी जबान्या, अटक, तुरुंग—असल्या उठाठेवी देवळापुढल्या कोर्टाला कराव्या लागत नाहीत. एखादा आरोपी फार खट असला तर त्याला रामोश्याकडून तालुक्याला पाठवण्याचा फार्स केला जातो. जेमतेम चार एक फर्लांग वाट चालल्यावर आरोपी कबूल होतो. आणि परत फिरून देवळापुढची शिक्षा भोगतो.

देवळात मारुतीखेरीज कुणी नाही असे क्वचितच घडते. सकाळी कामाची माणसे रानामाळात जात असतात आणि बिनकामाची माणसे देवळाच्या पायरीवर पाय सोडून बसल्या बसल्या त्यांची चौकशी करीत राहतात.

"काय वंडा, आज काय काम काढलंय?"

"नांगरट पुरी झाली का रे, तुकाराम?"

"ऊस लावून घ्या ह्या घाईतच, दादा."

असे कामासंबंधी विचारीत विचारीत वेळ बरा जातो. दुपारी जेवणवेळ झाली की, बिनकामाची मंडळी उठून घरोघर जातात.

कुणब्यांपैकी कोणी बिनकामाचे सहसा नसते. असतात ते ब्राह्मण. दुपारी जेवण झाल्यावर मारुतीच्या देवळात येऊन गाढ झोपण्याची सवय बऱ्याच जणांना असते. सणासुदीला जेवण लवकर होईना म्हणजेही ही मंडळी देवळात येऊन गाढ झोप काढतात. अशा निरुद्योगी लोकांखेरीज, वयाने झालेली, घराने दुर्लक्ष केलेली माणसेही देवळाचा आसरा घेतात. देऊळ हेच त्यांचे घर असते. त्यांची अंथरुणे-पांघरुणे देवळाच्या खुंट्यांवर राहतात. त्यांच्या हातातल्या आधाराच्या काठ्या देवळाच्या कोपऱ्यात उभ्या राहतात. ही जुनी, टाकलेली माणसे देवळाच्या खांबांना पाठी देऊन दोन्ही तळहात एकमेकांवर टेकवून जुन्या आठवणी एकमेकांना सांगतात. मधूनच देवाचे नाव घेतात. कष्टी होऊन गप्प होतात. पत्ते खेळत, जुन्या गोष्टी बोलत, एकमेकांच्या सोबतीने उरले आयुष्य घालवता घालवता यांपैकी एकएक माणूस कमी होतो. उरली मंडळी काही दिवस विरक्तपणे बोलतात. उदास होतात. आपली पाळी जवळ आली, असे म्हणतात. देवळाच्या खुंट्या, खांब दुसऱ्यासाठी मोकळे होतात.

गुरांचा, माणसांचा डॉक्टर, गुन्ह्याच्या तपासासाठी आलेला फौजदार, दप्तरतपासण्यासाठी आलेला मामलेदार या लोकांचा मुक्काम जेव्हा गावात पडतो तेव्हा मारुतीच्या देवळाचे रूप बदलून जाते. देवळात आडवे जाजम लावून आडोसा केला जातो. गादी, तक्क्या, डेस्क असले देवळात कधी न दिसणारे सामान दिसू लागते. खुंट्यांना साहेबी टोपी, छत्री असल्या वस्तू अडकवल्या जातात. नेहमी देवळात असणारी म्हातारी माणसे वनवासी होतात. वळकट्या घेऊन त्यांना घरी जावे लागते. बिनकामाची माणसे जेवण झाल्यावर देवळाकडे न येता घरीच राहतात. त्यांचा वेळ जाता जात नाही. पाटील, कुलकर्णी, तराळ, रामोशी ही मंडळी हवालदिल झाल्यासारखी दिसतात. हरिनामाऐवजी वेगळाच गजर देवळात होऊ लागतो. घंटा गप्प राहते आणि

साहेबाचा रागीट आवाजच घणघणत राहतो. गॅसबत्तीच्या उजेडात गाभाऱ्यातला दिवा दिसतच नाही. एखादी दुसरी रात्रच साहेबाचा मुक्काम देवळात असतो; पण तेवढ्याने, निवळशंख पाण्याचा झरा कोणी पाय घालून खडुळावा तसे होते.

झरा निवळायला वेळ लागत नाही. अंमलदार गेला की, खुंट्यावर पुन्हा वळकट्या दिसू लागतात. रिकामी माणसे जोत्यावर पाय सोडून झाल्यागेल्याची चौकशी करू लागतात. लहान पोरे पुन्हा देवळाच्या घंटा, कोनाडे व खुंट्या वेंधू लागतात.

इतर गावांच्या देवळांबद्दल मला माहिती नाही; पण आमच्या गावचे मारुतीचे देऊळ ही एक विविध कार्यकारी संस्था आहे. उन्हाच्या वेळी लहान मुले खेळण्यासाठी ती एक उत्तम जागा आहे. म्हाताऱ्याकोताऱ्यांचा तो निवारा आहे. गावाने सामुदायिक रीत्या करावयाची कामे इथेच ठरतात. गावातल्या बारा भानगडी इथेच उजेडात येतात. फूट पडते ती इथेच पडते. एखाद्याला वहिमाने मारायचे झाले तर तेही इथेच होते.

गावच्या वर्गणीचे पैसे एक साल एकनाथ कुलकर्ण्याने घेतले आणि तीन वर्षे झाली तरी पाडव्याला त्याने ते मांडले नाहीत. गावाला तो बधलाच नाही. लोक फार कावले; देवळाला फरशी घालावी असा मनसुबा होता; पण गावचे येणे वसूल होत नव्हते. एकनाथ पैसे द्यायला तयार होता, पण त्याचे म्हणणे असे की, बाकी रक्कम जमवून तुम्ही फरशी आणायला निघा की मी पैसे देतो आणि गावचे लोक म्हणत होते, गावची शिल्लक मांडा, मग आम्ही फरशीसाठी वर्गणी देतो. या घोळात फरशी तशीच राहिली होती.

शेवटी गावच्या तरुण पोरांनी डाव केला आणि एके दिवशी फरशी घालण्यासाठी देवळाची जमीन उलगडून ठेवली. अशाने तरी फरशी होईल असे त्यांना वाटले. पण आठ दिवस झाले तरी एकनाथ बधला नाही आणि गावातल्या लोकांनी वर्गणी दिली नाही. उकरलेली देवळाची जमीन तशीच राहिली.

झोपायला येणाऱ्या लोकांची फार गैरसोय झाली. त्यातल्या त्यात, देऊळ हाच ज्यांना निवारा होता त्यांचे फार हाल झाले. एका विधवा मुलीशिवाय घरात कोणीही नसलेले गणपतीआप्पा; साथीच्या सालात बायकामुले मरून

अगदी एकाकी राहिलेले विसुतात्या; सुनेने आणि मुलांनी टाकून दिलेले सोनारबाबा; बायको कुठे नाहीशी झालेली, पोरगा खुळा निघालेला, असे मार्तंडकाका, या लोकांनी काही दिवस वाट पाहिली आणि शेवटी खराट्याने मुरुम-माती बाजूला करून अंथरुणापुरती जागा केली. पडक्या घरात वेवारशी कुत्री जशी जागा करून झोपतात तशी ही माणसे झोपू लागली. लोकांना कणव आली. फरशीची वाट न पाहता त्यांनी देवळाची जमीन पुन्हा पहिल्यासारखी करून घेतली.

सगळ्या अंगावर लहान लहान आवाळू असलेली एक गुरवाची म्हातारी होती. म्हातारपणी तिला कोणी राहिले नाही. हातपाय चालेनासे झाले, तेव्हा एके दिवशी तिने मारुतीच्या देवळात अंथरूण आणून टाकले आणि मरेपर्यंत ती तिथेच राहिली.

म्हातारीने एक तांब्याभांडे जवळ ठेवले होते. काही पाहिजे असले म्हणजे ती तांब्यावर भांडे वाजवायची. तो आवाज आजूबाजूच्या घरांतून ऐकू जायचा. माझी आई तो आवाज ऐकून म्हणायची,

" ए, गुरवाची आजी बोलावतीय्. काय पाहिजे वाटतं तिला ? "

हातातले काम टाकून आई तिथे जायची. अंथरुणावर पडलेल्या म्हातारीला विचारायची,

" काय पाहिजे आजीबाई ? "

मग म्हातारी हळू आवाजात म्हणायची,

" मला पानी पायजे. "

मग तिला पाणी मिळायचे. कधी जोरजोराने भांडे वाजू लागले आणि आई पाणी घेऊन गेली तर म्हातारी म्हणायची,

" मला पानी नको. लिंबाचं लोणचं आणि तूपभात पाहिजे. "

तोही तिला मिळे. बोलायला, हलायला येत नसलेल्या म्हातारीने भांडे वाजवले म्हणजे कुणी ना कुणी धावून जायचे. बाण्याची नबा, कुलकर्ण्यांची राधाबाई, माझी आई, सोनाराची वत्सलाबाई धावून जाऊन तिचे सगळे करायच्या. लहान मुले, म्हातारी माणसे, सगळी तिला मदत करायची. गुरवाची म्हातारी देवळात पडली आणि तिला सगळ्या गावाने सांभाळले. मग एके दिवशी ती केव्हातरी मरून गेली. भांड्याचा गजर बंद झाला.

अलीकडे देवळात म्हातारी माणसे दिसत नाहीत. ती निघून गेली आहेत. मी किती तरी वर्षे पाहात होतो, सोनारबाबा, गणपतिकाका, विठूतात्या, आमचे दादा, तुकाराम कंडऱ्या ही मंडळी किती आवडीने देवळात जमायची, पत्ते सोंगट्या खेळायची. इकडचे तिकडचे बोलायची. पण त्यांना देवळाकडे जाणे आता बरे वाटत नाही. त्यांच्या बरोबरीचे कोणी उरलेले नाही.

यानंतरची पिढी आता हलके हलके तयार होते आहे. आज देऊळ मोकळे वाटते. पण उद्या असा एक काळ येईल की, पुन्हा पाचदहा जण बसू लागतील. आमचे बिटाकाका आता देवळात बसू लागले आहेत. पेन्शन मिळाल्यामुळे घरी आलेले बाबूराव मास्तर, धोंडू मास्तर, शंकरराव ही मंडळी देवळाकडे जाऊ लागली आहेत. गणपतिआप्पाची एकुलती एक विधवा मुलगी आता तर पार थकली आहे. तिला कोणी राहिलेले नाही. ती सुद्धा आता देवळातच जाऊन पडते म्हणतात.

आणखी तीसचाळीस वर्षांनी माझी पाळी येईल, मग मी सुद्धा आमच्या दादांसारखा देवळाकडे जात राहीन. माझीही काठी देवळाच्या कोपऱ्यात उभी राहील. माझ्या बरोबरीने बसायला माझ्या वयाचे आणखी कोणी येतील का हे सांगता येत नाही. बऱ्याच जणांनी गाव कायमचे सोडले आहे. पण मी तिथे खांबाला टेकून बसेन. जुन्या माणसांशी जुन्या आठवणी बोलेन; बोलता बोलता गप्प होईन. तळवे एकमेकांवर टेकून देवाचे नाव घेईन.

आणि काही दिवसांनी माझा खांब दुसऱ्यासाठी मोकळा होईल!

# ३

# पार

देवळाच्या मधोमध उभे राहिले म्हणजे समोर पार दिसतो. देवळापासून दोनशे एक कदम टाकावे लागतात. पार चौरस आकाराचा आणि माणसाच्या डोक्याइतका उंच आहे; थोडा जास्तच असेल. वर चढून जायचे तर पाच-सहा भल्या मोठ्या पायऱ्या चढाव्या लागतात. देवळाकडच्या अंगाने व पलीकडच्या अंगाने, अशा पायऱ्या आहेत. पाराची घडण जुन्या वळणाची आणि दांडगेश्वर आहे. आणले तसेच दगड बसविले आहेत. त्याला गवंड्याने छिन्नी लावलेली दिसत नाही. गावाची वस्ती सातशे, आणि पार एवढा मोठा की, निम्मे गाव त्यावर मावावे. पाराच्या मधोमध भला मोठा निंब आहे. निंबाभोवती पार बांधला आहे का पार बांधून निंब लावला आहे, हे कळत नाही.

आमचे गाव यलमार लोकांचे आहे. यलमारांची फक्त अठराच गावे आहेत. त्यापलीकडे त्यांचा रोटीबेटी व्यवहार होत नाही. जमातीतल्या कोणा-कडून अपराध झाला म्हणजे जातगंगा जमून त्याचा फैसला करीत असे. आमच्या गावापासून फार दूर नसलेल्या मंगेवाडीच्या ‘अकरावर’ हा न्याय-निवाडा होत असे. अकर म्हणजे पारच. मंगेवाडीलाच अकर का, आमच्या येथेही पाहिजे, अशा ईर्षेने हा पार बांधला, असे सांगतात. पण न्यायपीठ

असलेले हे ठिकाण तूर्त व्यासपीठ बनलेले आहे. पारावर उभे राहून काही बोलले की त्याला वजन येते, महत्त्व प्राप्त होते.

न्यायपीठाचा आदर म्हणून की काय, महार, रामोशी पायरीला पाय लावत नाहीत, पारावर चढत नाहीत. वहाणा घालून पारावर चढणेही योग्य समजले जात नाही.

पारावर बसणाऱ्याने संध्याकाळी बसावे. दिवस मावळू लागला, उन्हाला चांदण्याची मवागी आली म्हणजे घरातून उठावे आणि पाराच्या पायऱ्यांवर किंवा पाराच्या कडेवर पाय सोडून बसावे. थंड वाऱ्याच्या झुळका येत राहतात. कधी भिजलेल्या काळया मातीने, तर कधी ज्वारीबाजरीच्या शेताने सुगंधित होऊन या झुळका येत असतात. उन्हाळयात नांगरट झाली आणि वळवाचा शिडकावा पडला म्हणजे वाऱ्याला नागरमोथ्याचा थंड सुवास असतो. पावसाळयात हाच वारा मातीच्या अत्तराचा फाया घेऊन येतो. हिवाळयात शेतांचा घमघमाट सुटतो. असा सुगंधी वारा हुंगीत पारावर बसावे. डोक्यावरच्या निंबावर चिमण्या-कावळयांचा गोंधळ चाललेला असतो. माणनदीकडून हदग्याच्या फुलासारखे पांढरेधोट बगळे रांगेने उडत येऊन निंबावर बसत असतात. लाल झालेल्या क्षितिजाकडून येणारी वटवाघळे पूर्वेकडे जात असतात. रानातून घराकडे येणारे बैल डुरकत असतात. गाई हंबरत असतात. गाड्या धडधडत असतात. गुरांच्या गळयांतील घाट्या, चंगाळ्या वाजत असतात. आवाजाची दुनिया मोठी भराला आलेली असते.

सूर्य मावळतो, कडुसे पडते तसतसे हे आवाज खाली बसतात. अंधारू लागते. घरे, झाडे निळ्यानिळ्या आभाळावर चित्रे चिकटविल्यासारखी दिसू लागतात. आभाळात चांदण्या चमकू लागतात. मारुतीच्या देवळात दिवा लागतो. सोनाराच्या घरात कंदील पेटतो. कुलकर्ण्याच्या घरातील आरगीन लखलखू लागते आणि घटकाभराने सगळीकडे कसे शांत शांत होते. निंबाच्या डहाळ्या एकमेकींच्या कानांत चहाड्या करीत असतात, तो हळू आवाज तेवढा ऐकू येतो.

थंड वारा गालाला लागत असतो आणि आपण बसलेला धोंडा अद्याप निवलेला नाही, हे ध्यानात येते.

आजूबाजूच्या घरांतून चाललेली बोलणी स्पष्ट ऐकू येतात माणसे दिसत

नाहीत, पण आवाज ओळखू येतात. कुलकर्ण्यांच्या घरात ताईडी, रामा जेवायला मागत आहेत, हे समजते. महारवाड्यातील येदू सुतार आपल्या मुलाला शेरडीची धार काढायला हाक मारतोय, हे कळते. वाण्याच्या दुकानात न्हाव्याची म्हातारी गूळ आणि गरा न्यायला आली आहे, तेव्हा मुंबईकडचा तिचा जावई आला असावा असा तर्क करता येतो. मुलांची किरकीर, बायांचे वळसेदार किनरे आवाज, पुरुष माणसांचे खाकरणे, शिणल्या आवाजातील बोलणे, गुरांवर दटावणे हे सगळे ऐकू येते आणि कुणाच्या घरी काय चालले आहे, हे न पाहता, न सांगता कळते.

नामू नसल्याच्या दिव्यावर दिवा पेटवून, तो पदराआड धरून घराकडे जाताना कोणी बाई दिसते. कोण असावे याचा उगीच तपास करावा. अद-मासानेच म्हणावे –

" कोण व्हंजी आहे काय ? "

गावात बऱ्याच आत्या, काकू, व्हंजी आहेत. त्यांपैकीच कोणी असले तर ती तटकन् वळून आपल्याकडे पाहते. अंधारात दिसत नाही थोडके शब्द कानी आल्याने आवाजही ओळखू येत नाही. व्हंजी चाल मंदावून विचारते,

" व्हय हो, मीच हाय ! एकटंच बसलाया ? "

" हां, बसलोय. आत्ताच आलो रानातनं. मिरचीला पाणी पाजायचं होतं आज. "

एवढे बोलल्यावर व्हंजीला आवाज ओळखतो. तिच्या आवाजात आपले-पणा येतो.

" दोडा, वारंच लई. टिकतोय का न्हाई घरापावतर ह्यो बाबा. "

असे आपल्याला, दिव्याला, वाऱ्याला एकाच वेळी म्हणत ती चालू लागते. तांबड्या पदराआड धरलेला दिवा, आकाशदिव्यासारखा दिसतो. गल्लीत शिरून, व्हंजी दिसेनाशी होईपर्यंत उजेड राहिला म्हणजे बरे वाटते.

वाण्याच्या घरात धूर फार झाला आहे, वाळल्याबरोबर ओले जळत नसल्यामुळे वाणीण बेजार झाली आहे, हे वासाने समजते. सोनाराच्या वत्सा-बाईने आज डाळ-कांदा घालून सांडग्याचे कालवण केले आहे, हे समजून जेवणाची इच्छा होते. कारण तव्यातली फोडणी ऐकू येते आणि वासही पारा-पर्यंत येतो.

मग आपण अंधारात काडी पेटवून विडी शिलगवावी आणि लाल मणी उजळीत बसावे. माणसे येत-जात असतात. पायताणे, काठ्या वाजतात. कुणाचा तरी आवाज येतो.

"कोन वसलंय ?"

यावर नाव सांगायलाच पाहिजे असे नाही. आपण नुसतेच म्हणावे, "का हो, मी आहे ?"

एवढ्यावरून, कोण ते ओळखून विचारणारा आपल्याजवळ येतो. मग एक विडी आळीपाळीने दोघांनी घ्यावी. जळत जळत अगदी हिरव्या करदोड्या-पर्यंत आली म्हणजे टाकून देऊन इकडचे तिकडचे बोलावे.

जेवणवेळेपर्यंत असे पारावर छान करमते. अंधाऱ्या रात्री पारावरची बैठक जास्तीत जास्त अकरापर्यंत. पुढे तिथे बसण्यात मतलब नाही. आपले उठून देवळात यावे.

चांदण्या रात्री निंबाच्या डहाळ्यांच्या उखाळ्या-पाखाळ्यांना अगदी जोर येतो. मागेपुढे वाकून वाकून त्या काही कुजबुजत असतात. पारावर शाई ओतल्याप्रमाणे सावली पडलेली असते. तेव्हा एकटे बसण्यात काही राम नसतो. अशा वेळी पाराच्या उबदार पायरीवर बहुधा दोन माणसे उशिरापर्यंत बसतात आणि त्यांचा बोलण्याचा विषय साधा राहात नाही. गावातील लफडी तंबाखूसारखी तोंडात घोळली जातात. दोघांपाशी तिसरा कोणी गेला की बोलणे एकाएकी थांबते. तिसऱ्याला अवघडल्यासारखे होते.

चांदण्या रात्री पारावर कोणाही दोघांनीच बसावे.

थंडीच्या दिवसांत काही माणसे पारावर येऊन सकाळचे ऊन खातात. दिवसभर एखादा-दुसरा माणूस पाराच्या शेजारी उभा, बसलेला असतोच. पण वर्दळ नसते. असली तरी ती लहान पोरांची. अंगात नुसतेच अंगरखे अडकवलेली भोंगळी पोरे, नुसताच पोलका किंवा नुसताच परकर नेसलेल्या लहान पोरी पारावरल्या सावलीत खड्याने, मातीने खेळत असतात. एवढी एवढी पोरे गुळूगुळू बोलत, लटूलटू हालत असतात, आणि म्हातारा निंब बघत असतो.

वर्षानुवर्षे म्हातारीच असलेली माणसे आपण पाहतो. तसाच पारावरचा निंब आहे. त्याला तरणा कोणी पाहिला असेल का, याची मला शंका आहे.

खालच्या आळीचे अप्पाजीपंत वर्षानुवर्षं म्हातारे असल्याचे मी पाहतो आहे. तसेच निंबालाही पाहतो आहे. प्रचंड बुंधा असलेला आणि गुरवाच्या म्हातारीप्रमाणे अंगावर लहान लहान आवाळे असलेला निंब आपला आहे तसा आहे. रापलेल्या चेहऱ्याची आणि कणखर बांध्याची काही खेडुत माणसे पाहिली म्हणजे ही अमर आहेत असे वाटते. निंबाच्या बाबतीतही तसेच वाटते. निंबाचे म्हातारपण एका विशिष्ट जागी येऊन थांबलेच आहे.

शिशिर ऋतू आला की, एरवी हिरवाकंच दिसणारा निंब पिवळा पडत जातो. डहाळ्यांची कुजबूज ऐकू येईनाशी होते. पिवळी पाने सारखी निखळून खाली पडतात. पारावर आणि आजूबाजूला वाळलेल्या काड्यांचा, पानांचा खच पडतो. गावची झाडलोट करणारी महारीण निंबाला शिव्या घालते. निंबाचा पाला गोळा करता करता तिला कसक भरते.

चैत्रमासात पुन्हा चमत्कार होतो. म्हाताऱ्या निंबाला जोमाने नवे धुमारे फुटू लागतात. पोपटी रंगाची पालवी चहू अंगांनी उसळ्या घेऊ लागते. तिच्या रूपाचा अगदी उजेड पडतो. पांढऱ्या शुभ्र अशा नाजूक मोहराने निंब बहरतो आणि कसा धुंद वास सुटतो. उन्हात तगमग होऊ लागली की पारावर येऊन बसावे. वाळ्याचे पडदे चोहो बाजूंना सोडले आहेत असे वाटते.

या मोहराचा पारावर सडा पडत असतो आणि बघता बघता हिरव्या निंबोळ्या दिसू लागतात, झपाट्याने अंग धरतात आणि लवकरच पिकून पिवळ्यारंजन होतात. मग पिकल्या निंबावर पाखरांची झिम्मड उडते. कावळ्यांची गर्दी होते. गोडगोड निंबोळ्या खात कुरूबुरू बोलत ही बस्ताद पाखरे दिवसभर निंबाच्या डहाळ्या धरून राहतात.

आषाढात उभे वारे सुटते. निंबाला फार सावरून उभे राहावे लागते. बुंध्यावरून सरासरा धावणाऱ्या खारी भिऊन एका जागी बसतात. निंबाच्या डोलीतील पोपटाची पिले लाल चोचा बाहेर काढतात आणि पटकन आत घेतात. भलतेच वारे सुटलेले असते. डहाळ्यांची दैना होते. कावळ्यांनी चोखून टाकलेल्या निंबोळ्याचे बी या वाऱ्याने साऱ्या गावभर होते.

—आणि श्रावणात बघावे तर गावात जागजागी म्हाताऱ्या निंबाची लहान पोरे दिसू लागतात. भिंतीच्या खोबणीतून, घराच्या माळवदावर, जाऊ नये तिथे ती गेलेली असतात. पण रस्त्यावर दरवर्षी दिसणाऱ्या ‘ म्हपी ’ कुत्रीच्या

पोरांप्रमाणेच ही पोरेही कधी जगत नाहीत. म्हाताऱ्या निंबाला संतती उदंड होते. पण ती वाढत नाही.

घरात बाळंतीण झाली की, चौकटीला निंबाच्या लहान डहाळ्या अडकवितात. पारावरच्या निंबाचे डहाळे आज किती वर्षे चौकटींना लटकत आहेत...

माझी आई म्हणते, "मी पाहातेय तसा पारावरचा निंब आहेच!"

पाडव्याला सगळे गाव देवळात निंब खायला जमते. तेव्हा गुरव याच निंबाचा पाला काढतो. गावात एखाद्याला 'पान लागले' (साप चावला) म्हणजे याच निंबाचा पाला काढून पारावर वाटतात. त्याचा रस 'पान लागलेल्या' माणसाला पाजून त्याला मारुतीच्या देवळाभोवती धावत प्रदक्षिणा घालायला लावतात. रात्रभर देवळात भजन होते आणि सकाळी पान लागलेला माणूस धड होऊन परत आपल्या घरी जातो. खरेखोटे देव जाणे! महादा न्हाव्याला एकदा पान लागल्याचे मला माहीत आहे. हे सगळे केले आणि तो सकाळी स्वतः घरी चालत गेला.

पारावर उभे राहिले की, चोहों अंगांचे आभाळ लांबवर दिसते. रोहिणी नक्षत्राची वाट बघत लोक पारावर उभे राहतात. पावसाची हालचाल दिसते. हतीताच्या वर दिसतोय, बोंबेवाडीच्या अंगानं उठला आहे, महुदावर पडतो आहे, असा पावसाचा ठावठिकाणा घेत लोक ह्या पारावरच उभे राहतात.

पाराच्या पलीकडून गावची वाट जाते. पारावरचा खेळ संपवून मुली सासरी जातात त्या याच वाटेने. परक्या मुली गावात येतात त्या याच वाटेने. याच वाटेवर गावाबाहेरच्या विहिरीवरून वा ओढ्यावरून धुणी धुऊन परत येणाऱ्या बायकांच्या खांद्यावरचे पिळे ठिबकतात, कमरेवरच्या घागरी हिंदकळून थेंब पडतात. गावची तरणी पोरे रात्री याच वाटेने शेतात राखण करायला जातात.

हीच वाट स्मशानाकडे जाते.

अमर वाटणारा पारावरचा निंब आता केव्हा पडेल त्याचा नेम नाही. पुष्कळ वर्षे तो जगला आहे. आषाढाचे वारे सुटले म्हणजे कोणी आता—पारावर बसत नाही. एखादे वेळी हा निंब अचानक कोसळेल आणि वाटेवरून येणाऱ्या-जाणाऱ्यांचा घात करील, अशी भीती गावकऱ्यांना वाटते. लोकांचा

असा विचार आहे की, आपोआप पडण्याअगोदरच हा निंब आता तोडावा. पार उलगडावा, आणि त्या जागी समाजमंदिर उभारावे.

विचार काही वाईट नाही.

# ४

# मोर बघायला कोरेगावला

उमरगा गाव मागं पडलं. डांबरी रस्ता सोडून जीप माळरान वेंधू लागली. कोरेगावच्या खुणा काही लवकर दिसेनात. नाही म्हणालं तरी कालच्या लांबलचक प्रवासाचा शीण अजून अंगभर होता. शुक्रवारी दुपारी चार वाजता पुणं सोडलं होतं. सोलापूरला येईतोवर तिन्हीसांजा झाल्या. थोडं रेंगाळून पुढं निघालो. उमरगा येता येईना. रात्रीचा एकदीड झाला. एवढ्या अपरात्री थांबावं कुठं ? सरकारी विश्रामधामावर गेलो. तिथला कर्मचारी उठता उठेना. फार आरडाओरडा केला तेव्हा तो झोपेतच उठला. कुठल्या तरी एका बंद दारावर त्यानं ठोठावलं, हाका मारल्या, लाथा घातल्या तेव्हा आत झोपलेला कोणी माणूस झोपेतच उठून बाहेर आला. आमच्यासाठी एक सूट मोकळा झाला. आतल्या कॉटवर गादी होती. पण तिच्यावर चादर नव्हती. प्यायला पाणी आणि चादर यांची मागणी केली तेव्हा त्या भल्या माणसानं एक ग्लास पाणी दिलं, चादर आणेल म्हणून वाट पाहिली, पण तो आला नाही. बघितलं तर, मधल्या हॉलमध्ये, कोचावरच्या कुशन्स जमिनीवर टाकून आणि वरचा पंखा सोडून तो गाढ झोपलेला होता. मग पाणी, चादर या सर्वांचा नाद सोडून आम्हीही झोपी गेलो. सकाळी लवकर उठून कोरेगावचा रस्ता धरला.

बरंच मोठं माळरान पार केल्यावर झाडी, शेतं दिसली. कौलारू घरं दिसली. हेच ते मोरांचं कोरेगाव. अरुंद गाडीरस्त्यावरच्या चाकोऱ्या चुकवीत जीप गावात शिरली. दगडी भिंती, लाकडी चौकटी, कुतूहलानं पाहणारी मुलं, खेडूत, कुत्री, शेरडं. धन्याचे पीक नुकतेच निघून त्याचे ढीग गावातल्य घरातून लागले असावेत. सुरेख कोथिंबिरी वास आला. उमरग्याहून निघताना, तिथल्या कॉलेजमधले एक व्यासंगी प्राध्यापक, डॉ. के. के. देशमुख बरोबर घेतले होते. कोरेगावचा एक कॉलेजविद्यार्थीही होता. गावातले एक धनंतर शेतकरी ग्यानबा राजोळे यांच्या वाड्यापाशी येऊन जीप थांबली. दरवाज्यातच ट्रॅक्टर ट्रेलर उभा होता. हायब्रीड ज्वारीच्या कणसांची थप्पीही दिसत होती. हसतमुख ग्यानबा दारातच उभे दिसले. त्यांना आधी वर्दी होतीच.

सगळे जाऊन देवडीला बसलो, भराभरा गावकरी जमले. विश्वनाथ पांगे, धोंडिराम पाटील, गोविंदराव पाटील ही ठळक मंडळी. आणखीही बरेच कोणी कोणी. मोर बघायला आलेल्या पाहुण्यांच्या सत्काराला सगळेच उत्सुक दिसले. चहा-पाणी, पान-तंबाखू झाले आणि पांगे म्हणाले,

"चला, आतासुद्धा रानात आपल्याला चार-दोन मोर दिसतील."

"चला तर चला!" गळ्यात दुर्बिण अडकावून बाहेर पडलो.

गाव लहानसंच, टुमदार होतं. अरुंद पांदीच्या वाटेनं थोडं चालल्यावर गावाला लागून असलेल्या ओढ्यात उतरलो.

आपल्याला मोर जवळ येऊ देणार नाहीत, जीपमध्ये बसूनच त्यांच्याकडं गेलो तर कदाचित जवळ जाता येईल असा माझा अंदाज होता. माणसापेक्षा वाहनाला पाखरे कमी बुजतात हा अनुभव होता. पण कोरेगावचे मोर अशा जागी होते की, जीपलासुद्धा जायला वाट नव्हती. पायी जाणेच भाग होते.

ओढा कोरडाच होता. पात्रात शिंदीची खुरटी झुडपं होती. दोन्ही काठाला झाडी होती, त्या पलीकडं शेतं होती. कुठं चिंचेची डेरेदार झाडं, कुठं उंच भव्य पिंपळ, कुठं भोकर, कुठं उंबर, कुठं बांधावर चंदन.

दोन्ही काठावरच्या शेतामळ्यांतून उसाचे फड होते. लोंब्याला आलेली वरई होती. शेंगा भरलेला मूग होता. हायब्रीड ज्वारी होती.

पिकाचा सुगंध सकाळच्या थंड हवेत भरून राहिला होता.

गावाकडची आठवण येऊन माझ्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. माडगूळच्या आसपासच्या माळरानातून, काळ्या शेतजमिनीवरून मी श्रावण महिन्यात, मनमुराद भटकलो आहे. अनेक वर्षे, न चुकता मी श्रावणात माडगूळला जाई आणि एकाकी चंडोल भराराावा तसा भटके. माझ्या जीवनातील अत्यंत सुखद असा तो काळ होता. निसर्गाशी जास्तीत जास्त जवळीक मी याच काळात केली. हिरवळ, वाटा, पाऊस, एकांत आणि अत्यंत तरल अशी चित्तवृत्ती. नितळ आभाळासारखं मन असे. तेव्हा कसली ओझीच नव्हती.

असो.

वरईचं शेत वाऱ्याच्या झुळकीनं हलत होतं. नाजूक पाती हलत होती. केशरी लोंब्या हिंदकळत होत्या. ओढ्याचा काठ धरून बांधाबांधानं हलकेच मी चाललो होतो.

पलीकडे, शेताच्या मधे लहानसं बाभळीचं झुडूप होतं. त्याच्या आडोशानं आमचा सावट घेत उभा असलेला, कोरेगावचा पहिला रानमोर मला दिसला.

आपला लांब पिसारा तोलून, गर्द निळी मान उंचावून ऐटबाजपणे तो उभ होता. तो डोईवरचा तुरा, ते मखमली, झगमगते रंग, तो चित्रमयी आकार वळसे, वेलांट्या, अर्धचंद्र, गडद ठिपके.

यापेक्षा अधिक ऐटबाज, अधिक रंगीत, अधिक चपळ आणि सावध असा दुसरा पक्षी निदान जगात तरी नाही.

मोर म्हणजे निसर्गाचा एक चमत्कार आहे.

जगात फक्त दोन जातीचे मोर आहेत. एक भारतीय मोर ( Pavo Cristatus ) आणि हिरवा जावा मोर ( Pavo Muticus ). हिरवा मोर ब्रह्मदेश, थायलंड, मलाया, जावा इकडे आहे. सुमात्रा, बोर्निओत नाही. भारतीय मोरापेक्षा हिरवा मोर जास्ती मोठा आणि जास्ती सुंदर आहे. त्याच्या डोक्याचा तुरा गर्द हिरव्या रंगाच्या पिसांचा असतो. पिसाराही प्रामुख्याने चमकदार हिरव्या रंगाचाच असतो. जोराचा पाऊस होऊन गेल्यावर मोरांचे सुंदर पंख गळू लागतात. कोरेगावच्या मोरांचे पंख दसऱ्यानंतर गळायला सुरुवात होते असे गावकरी म्हणाले. दसरा ते चंपाषष्ठीपर्यंत गळतात. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात पिसारा अगदी कमी दिसतो.

वयाच्या दुसऱ्या वर्षापासून नर मोरांना पिसारा दिसू लागतो आणि सहा

वर्षांपर्यंत तो वाढत राहतो.

पिसारा हे त्याचं सर्वांगात सुंदर अंग. लावण्यवतीनं रूप जपावं तसा मोर पिसारा जपतो. शंभर ते दीडशे पिसं ह्यात असतात.

जानेवारी ते ऑक्टोबर ह्या काळात लांडोऱ्या फळतात, अंडी घालतात, पोरे जन्मतात, असं ग्रंथ सांगतात. ह्या काळात मोरांच्या केका सारख्या उठत असतात. आभाळात 'गडद निळे जलद भरुनि आले' की मोरांची कामवासना उद्दीपित होते असे डॉ. देशमुख म्हणाले. अशा वेळी मोर आपला मनोहर पिसारा एखाद्या पंख्याप्रमाणे उघडतो. ह्या उघड्या पंख्याला आधार मिळतो तो मोराच्या शेपटीच्या ताठ पंखाचा. म्हणजे पिसारा हे काही मोराचे शेपूट नव्हे, ते वेगळे देणेच आहे. हा पिसारा उघडला म्हणजे झगमगाट होतो. हिरवा, जांभळा, निळा, किरमिजी अशा रंगांची उधळण होते. वरचेवर मोर पिसाऱ्याचा उघडलेला पंखा पुढं झुकवतो. पुन:पुन्हा रंग झगमगतात. रेशमी वस्त्रांची सळसळ ऐकू येते तसा पंखाचा आवाज येत राहतो. भोवती लांडोऱ्या जमा होतात. त्यांतली एखादी वाफेवर असते ती जवळ येते. लागलीच मोर तिला झडपतो.

रानातला मोर फार सावध असतो. मला दिसलेला हा मोर काही क्षण एका जागी होता. लगोलग, वरईच्या धाटांचा आडोसा घेत घेत तो बांध ओलांडून हायब्रीड ज्वारीच्या रानात उतरला आणि दिसेनासा झाला.

विश्वनाथ पांगे हे मोठे चौकस गृहस्थ होते. आम्ही हिंडत होतो हे रान त्यांचेच होते. आपला नित्याचा कृषि-व्यवसाय करता करता त्यांनी ध्यान देऊन मोर पाहिले होते. त्यांनी मला मोरांची झाडं दाखवली.

एका ओढ्यापलीकडे उंच पिंपळ होता. पन्नास-साठ फूट उंचीचा. त्यावर मोरांची वस्ती रात्री असे. ओढ्याकाठीच उंबराची आणखी दोन लहान, वाकड्या बुंध्याची झाडं होती. एक भोकरीचं झाड होतं. बुटकं, गर्द छाया देणारं. ह्याची एक फांदी मोरांच्या बसउठीने गुळगुळीत झाली होती. ह्या झाडाखाली मोराची विष्ठाही आढळली. पण कोणत्याही पाखरापेक्षा ती घट्ट आणि बांधीव होती. सगळ्याच जागा मुद्दाम निवडलेल्या दिसल्या. त्या उंचावर होत्या, सुरक्षित होत्या. तिथून आजूबाजूचं बरंच रान दिसत होतं.

पांगे म्हणाले,

" फार सावध आणि बुजरी जात मोराची. आणि ह्यांना खायलाही फार लागतं. वरी, मूग हे आवडीचं धान्य. मिरची शहाणी झाली, पिकली की, हे मिरचीच्या फडात शिरतात. पिकल्या लाल मिरच्या खातात. उन्हाळ्यात पिकले टमाटे खातात. एरव्ही ही फळं आहेतच, भोकर आहेत, उंबर आहेत, चंदनाचं फळ आहे."

बोलता बोलता समोर लक्ष गेलं. मोकळ्या रानातून मोर चालला होता. त्या पाठोपाठ उसाच्या कडेला एक लांडोर दिसली. ओढ्याच्या पात्रात शिंदीच्या जाळकटीला आणखी एक दिसला. थोडा वेळ होता, तरी सहा-सात मोर बघायला मिळाले.

पांगे म्हणाले,

" पिकाला त्रास आहे याचा. गहू, हरभरा, मूग अशा पिकांची नुकसानी होते, पण आम्ही सोसतो. हायब्रीडला मात्र काही त्रास नाही."

का बरं ? कदाचित उंच ताटावरचं कणीस त्यांना ओरबाडता येत नसेल.

हिंडता-फिरता माझ्या ध्यानात आलं की, कोरेगावच्या रानात शिंदीची खुरटी झुडपं पुष्कळ आहेत. टणटणी आहे. उसाचे फड आहेत. ही दडण मोरांना सोयीची आहे. चांगला पाऊसकाळ आहे. बागाईत आहे. त्यामुळं किडा-मुंगी, सरडे, साप ह्यांना तोटा नाही. बसायला पिंपळाची, चिंचेची उंच उंच झाडं आहेत. खायला धान्य आहे, फळं आहेत. माणसांची भीती नाही. कारण मोरांचा सर्वांत मोठा शत्रू म्हणजे माणूस. त्या खालोखाल वाघ, बिबटे, रानमांजरं. कोरेगावच्या रानात वाघ नव्हतेच. लमाण्या–पारध्यांसारखे भटके लोक कधी कधी मोरामागे लागतात. पण गावकऱ्यांना सावट लागला की, ते पारध्यांचा बंदोबस्त करतात. काही मोरांचे अपमृत्यू होतात. नुकताच एक मोर कुत्र्याने ताणून मारला म्हणे. आणखी एक आपसुक मरून पडलेला आढळला.

ओढ्याच्या दोन्हीही काठांना, मोरांच्या नाचायच्या जागा होत्या. कोणी गुराखी मुलं, कोणी रानातल्या बायका आवर्जून मला सांगत होत्या,

" रोज ह्या हितं सकाळचा नाचतो बघा. असा वढ्यातून येतो आन हितं नाचतो."

राजोळे-पांगे ही मंडळी सारखी हळहळत होती. मी मोर नाचताना बघावा

अशी त्यांची इच्छा होती. पाग्यांनी मोर कसा नाचतो, सावकाश आपल्या भोवतीच कसा फिरतो, नाचताना त्याला भान कसं नसतं याचं बहारदार वर्णन आपल्या भाषेत केलं.

पण, आता हा सप्टेंबर महिना होता. एव्हाना माद्यांनी अंडी सुद्धा घातली असतील. मोर कशासाठी आता नाचणार? बघायला आलेल्या प्रेक्षकांनाही आपल्या पिसाऱ्याची शोभा दाखवायला हे काही प्राणिसंग्रहालयातले मोर नव्हते. दोन वेळा मोरानं मला असं चकित केलं होतं. एकदा म्हैसूरच्या प्राणिसंग्रहालयात. मोराच्या मोठ्या पिंजऱ्यापुढं मी उभा राहिलो असताना ऐन मे महिन्यात मोरानं पिसारा उघडला आणि मला दाखवला. अगदी परवापरवा, सप्टेंबरमध्ये त्रिवेंद्रमच्या प्राणिसंग्रहालयातही हाच अनुभव आला. लोकांची झुंबड पिंजऱ्याभोवती पडताच मोरानं पिसारा उघडला आणि जवळजवळ दीड मिनिट तो फिरून सर्वांना दाखवला. नाचताना, मागे झाडाचा बुंधा, ओढ्याची दरड, वारूळ असे काही तरी पार्श्वभूमी म्हणून मोर घेतो असं दिसतं. घराच्या छपरावर आणि झाडांच्या फांदीवरही मोरानं पिसारा उघडल्याचे बघितल्याची नोंद काही निरीक्षकांनी केली आहे.

कुठं तरी मोर नाचताना दिसावा म्हणून आम्ही इथं-तिथं हिंडलो, चांगलं उन्ह झालं. पांग्यांच्या वस्तीवर आंब्याच्या सावलीला जाऊन बसलो. ही जागा उमाठ्याची होती. सगळीकडचं दिसत होतं. आम्ही गप्पा मारतो आहोत तोवर पांग्यांनी ज्वारीच्या पिकात हिंडून ओटाभर शेंदण्या गोळा करून आणल्या आणि आमच्यासमोर ओतल्या. म्हणाले,

"कोवळ्या कोवळ्या बघून घ्या. तंवर मी ऊस बघतो." किती तरी वर्षांनी मी शेंदण्या बघत होतो. अलीकडे हे पीक आमच्या भागात बुडालेच होते. कोणी करीत नव्हते. शेंदण्यांनी, शेंदाडांनी माझ्या बालपणीच्या आठवणी पुन्हा चाळवल्या. बरेच ऊन झाले तेव्हा गावच्या दिशेने परत फिरलो.

येता येता गावकऱ्यांपाशी चौकशी केली—

"मोरांची अंडी कुठं आहेत का?"

"काही ऐकिवात नाही, पण तपास करू."

"मला कोटं, अंडी बघायची आहेत. अलीकडं कुणाला दिसली होती का?"

सुग्रण पक्ष्यापाशी, घारी-गिधाडांपाशी आहे तो शहाणपणा, मोरांपाशी नाही. आपलं घरटं सुरक्षित जागी करावं आणि त्यात अंडी घालावीत हे त्यांना माहीत नाही. एवढी झेप आणि चपळपणा त्यांच्यापाशी नाही. लांडोरी अंडी घालते ती कुठं तरी जमिनीवरच आणि पोरं अंड्याबाहेर पडताच तुरूतुरू चालू लागतात, कण-दाणा टिपू लागतात. त्यांना बाहेरून घास आणून आई-बापांनी भरवावा लागत नाही. कुणा गावकऱ्याने माहिती दिली. मळ्यात, गुरांच्या गोठ्यात, पोटमाळ्यावर उसाचा पाचोटा अंथरलेला होता, त्यावर लांडोरीने अंडी घातली होती. एकदा पाचोट्याच्या उंच वडमीच्या सपाट माथ्यावरही घातली होती.

" पिलं निघाल्याचं कुणी पाहिलं आहे का ? "

कुणी पाहिलं नव्हतं. कुणी सांगावं, गुराखी पोरांनी डोळा ठेवून ही अंडी लांबवली असतील. रानातच गाई-म्हशीच्या ताज्या शेणात ती खुपसली असतील, वर चगळचोथा टाकून जाळ केला असेल, अंडी उकडली असतील आणि रानातच फराळ केला असेल.

कोरेगावच्या मोरांची बरीच अंडी अशी वायफळ जात असतील. माणसां-कडून, मुंगसांकडून, कावळ्यांकडून खाल्ली जात असतील. मला एकदा औरंगाबादला कळलं की, देवगिरी किल्ल्याच्या परिसरात खूप मोर आहेत. त्यांची अंडी लोक गोळा करतात. किल्ल्याशेजारच्या हॉटेलातून ती विकायला सुद्धा ठेवली जातात.

अशानं कोरेगावच्या मोरांची संख्या वाढणार कशी ? आज किती मोर आहेत अशी चौकशी केली तेव्हा बऱ्याच जणांकडून अदमास कळला, एकूण चाळीस ते पन्नास पाखरे असावीत.

संध्याकाळी पुन्हा रानात आलो.

वरईमुगाच्या शेतातून लाजऱ्या मोरांचे पुनःपुन्हा दर्शन होत होते. नाचणारा मोर मात्र आढळला नाही. गावचे पोलिस पाटील धोंडिराम आप्पा यांच्या मागोमाग मी रानातून हिंडत होतो. मोर आम्हाला पुनःपुन्हा झुकांडी देत होता. संध्याकाळ झाली. पश्चिम दिशा तांबडी लाल होऊ लागली, आणि मोर पाहता पाहता माझ्या अगदी समोरच्या बांधावर ससा येऊन बसला

किती तरी वेळ कान हलवत तो बसला होता. मी मनात म्हणालो,

“मित्रा, बैस. तुजप्रत कल्याण असो.”

संध्याकाळ झाली तेव्हा मोरांचे अनेक आवाज होऊ लागले, चितुरांच्या शिळा ऐकू येऊ लागल्या चरण्यासाठी रानोमाळ झालेली पाखरे एकमेकांना हाका देऊन आता एकत्र येत होती.

घुर्र घुर्र घुर्र असा शेवटचा होला बोलला.

सगळे रान शांत झाले. चक्कु चक्कु चक्कु असा रातव्याचा आवाज तेवढा ऐकू येऊ लागला. रातकिड्यांचे समूहगान सुरू झाले आणि त्या उंच पिंपळावर, चिंचेवर मोरांच्या काळया आकृती झेपावताना दिसल्या. उमाठ्यावर उभे राहून आम्ही बघत होतो.

एक, दोन, तीन...

हा मोर, ही लांडोर.

काळोख झाला. चांदण्या चमकू लागल्या. पायाखालचे दिसण्यासाठी बॅटऱ्या टाकीत आम्ही परतलो.

पाखरं नाना तऱ्हेनं झोपतात. दिवसा उजेडी आपसात मारामाऱ्या केल्या तरी रात्री झोपायच्या वेळेला सगळ्यांनी घोळक्यानं झोपणं त्यांना हवं असतं. अनेक पाणपक्षी तर तेथेच झोपतात. तोल जाऊ नये म्हणून एका पायानं आळसटपणे ते पाणी वारत असतात. जमिनीवर झोपणारी बदकं एका पायावर उभी असतात आणि मान मुडपून त्यांनी आपली चोच पंखात घातलेली असते. बगळे, ढोक, मोर माना आत घेऊन आणि दोन्ही खांदे उंचावून झोपतात. फांदीवर बसलेली ही पांखरं गाढ झोपेत कलंडून पडत कशी नाहीत? त्यांच्या पायात तशी सोयच असते. नख्याचं घट्ट कुलूप फांदीला आपोआप लागतं. फांदीवर बसलेली पाखरं पायावर मुरतात तेव्हा हे कुलूप बसतं आणि जागी होऊन ती अंगाला उभा तणाव देतात तेव्हा निघतं.

गावकऱ्यांचं मत पडलं की, आज सकाळी रानात जायला उशीर झाला, त्यामुळं मोर नाचताना दिसले नाहीत. उद्या सकाळी अगदी लवकर उठून जायचं.

भल्या पहाटे पांगे उठवायला आले आणि अजून दिवस उगवला नाही तोवर आम्ही ठिकाणावर जाऊन पोहोचलो.

सुरेख सकाळ होती.

पांगे म्हणाले,

" ह्या जागी हिंडायला नको. हितं उमाट्यावर बसू या. समोर येऊन मोर नाचतोय बघा."

ओढ्याच्या काठी मोठे टेकाड होते. त्यावर जाऊन बसलो. पाखरं जागी झाली होती. त्यांच्या आवाजानं सारं रान भरून गेलं होतं.

माझ्यासमोर पठाणी होल्यांच्या नरमादीचा प्रणय चालला होता. गिरेबाज मादी हुलकावण्या देत होती. पंख फुगवून नर तिला वारंवार झडपीत होता. पंखांचे फडत्कार होत होते.

ओढ्यापलीकडच्या उंबराच्या हिरव्या पिवळ्या बुंध्यावरही हिरव्या राव्यांची नरमादी ह्याच रंगानं रंगलेली होती.

एवढ्यात एक मोर भरारत येऊन त्या नेहमीच्या उंबरावर बसला. वाकड्या झाडावर त्याला नीट बसता आले. सकाळच्या वाऱ्यावर त्याचा पिसारा हलताना दिसत होता. तिथं बसल्या बसल्या त्यानं तीन उंच हाका दिल्या.

मी इथं आहे, आता हे आजूबाजूचं रान माझं आहे, अशी ही घोषणा असावी.

काही क्षणातच एक लांडोरी आली आणि खालच्या फांदीवर बसली. निळ्या निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर, वाकड्या फांदीवर बसलेले हे जोडपे अगदी सुरेख दिसत होते. त्यानंतर आणखी एक लांडोरी कुठूनशी आली, माझ्यासमोरच्या पिंपळावर बसली. सकाळच्या कोवळ्या उन्हात पंख साफ करू लागली. ती सुद्धा किती सावध होती. एक अर्धा क्षण मान वाकडी, चोच पंखात की लगेच वावरून इकडे तिकडे बघणं. हा प्रकार सारखा चालू होता. रानातून हिंडणाऱ्या मोरांचं सावधपण मी बघितलं होतं. आता लांडोरीचं पाहात होतो. रानातून हिंडताना बिबळ्या वाघ जसा सावध असतो तसाच, तितकाच मोरही असतो.

किती तरी वेळ गेला. अगदी एकाकी मादी उडाली आणि त्या दोघांच्या झाडावर गेली मग मात्र मोर उडाला. त्या मागोमाग ह्या दोघीही भरारत

किती तरी वेळ कान हलवत तो बसला होता. मी मनात म्हणालो,

"मित्रा, बैस. तुजप्रत कल्याण असो."

संध्याकाळ झाली तेव्हा मोरांचे अनेक आवाज होऊ लागले, चितुरांच्या शिळा ऐकू येऊ लागल्या चरण्यासाठी रानोमाळ झालेली पाखरे एकमेकांना हाका देऊन आता एकत्र येत होती.

घुर्र घुर्र घुर्र असा शेवटचा होला बोलला.

सगळे रान शांत झाले. चक्कु चक्कु चक्कु असा रातव्याचा आवाज तेवढा ऐकू येऊ लागला. रातकिड्यांचे समूहगान सुरू झाले आणि त्या उंच पिंपळावर, चिंचेवर मोरांच्या काळया आकृती झेपावताना दिसल्या. उमाठ्यावर उभे राहून आम्ही बघत होतो.

एक, दोन, तीन...

हा मोर, ही लांडोर.

काळोख झाला. चांदण्या चमकू लागल्या. पायाखालचे दिसण्यासाठी बॅटऱ्या टाकीत आम्ही परतलो.

पाखरं नाना तऱ्हेनं झोपतात. दिवसा उजेडी आपसात मारामाऱ्या केल्या तरी रात्री झोपायच्या वेळेला सगळ्यांनी घोळक्यानं झोपणं त्यांना हवं असतं. अनेक पाणपक्षी तर तेथेच झोपतात. तोल जाऊ नये म्हणून एका पायानं आळसटपणे ते पाणी वारत असतात. जमिनीवर झोपणारी बदकं एका पायावर उभी असतात आणि मान मुडपून त्यांनी आपली चोच पंखात घातलेली असते. बगळे, ढोक, मोर माना आत घेऊन आणि दोन्ही खांदे उंचावून झोपतात. फांदीवर बसलेली ही पांखरं गाढ झोपेत कलंडून पडत कशी नाहीत? त्यांच्या पायात तशी सोयच असते. नख्याचं घट्ट कुलूप फांदीला आपोआप लागतं. फांदीवर बसलेली पाखरं पायावर मुरतात तेव्हा हे कुलूप बसतं आणि जागी होऊन ती अंगाला उभा तणाव देतात तेव्हा निघतं.

गावकऱ्यांचं मत पडलं की, आज सकाळी रानात जायला उशीर झाला, त्यामुळं मोर नाचताना दिसले नाहीत. उद्या सकाळी अगदी लवकर उठून जायचं.

भल्या पहाटे पांगे उठवायला आले आणि अजून दिवस उगवला नाही तोवर आम्ही ठिकाणावर जाऊन पोहोचलो.

सुरेख सकाळ होती.

पांगे म्हणाले,

" ह्या जागी हिंडायला नको. हितं उमाट्यावर बसू या. समोर येऊन मोर नाचतोय बघा. "

ओढ्याच्या काठी मोठे टेकाड होते. त्यावर जाऊन बसलो. पाखरं जागी झाली होती. त्यांच्या आवाजानं सारं रान भरून गेलं होतं.

माझ्यासमोर पठाणी होल्यांच्या नरमादीचा प्रणय चालला होता. गिर्रेबाज मादी हुलकावण्या देत होती. पंख फुगवून नर तिला वारंवार झडपीत होता. पंखांचे फडत्कार होत होते.

ओढ्यापलीकडच्या उंबराच्या हिरव्या पिवळ्या बुंध्यावरही हिरव्या राव्यांची नरमादी ह्याच रंगानं रंगलेली होती.

एवढ्यात एक मोर भरारत येऊन त्या नेहमीच्या उंबरावर बसला. वाकड्या झाडावर त्याला नीट बसता आले. सकाळच्या वाऱ्यावर त्याचा पिसारा हलताना दिसत होता. तिथं बसल्या बसल्या त्यानं तीन उंच हाका दिल्या.

मी इथं आहे, आता हे आजूबाजूचं रान माझं आहे, अशी ही घोषणा असावी.

काही क्षणातच एक लांडोरी आली आणि खालच्या फांदीवर बसली. निळ्या निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर, वाकड्या फांदीवर बसलेले हे जोडपे अगदी सुरेख दिसत होते. त्यानंतर आणखी एक लांडोरी कुठूनशी आली, माझ्यासमोरच्या पिंपळावर बसली. सकाळच्या कोवळ्या उन्हात पंख साफ करू लागली. ती सुद्धा किती सावध होती. एक अर्धा क्षण मान वाकडी, चोच पंखात की लगेच वावरून इकडे तिकडे बघणं. ऱ्हा प्रकार सारखा चालू होता. रानातून हिंडणाऱ्या मोरांचं सावधपण मी बघितलं होतं. आता लांडोरीचं पाहात होतो. रानातून हिंडताना बिबळ्या वाघ जसा सावध असतो तसाच, तितकाच मोरही असतो.

किती तरी वेळ गेला. अगदी एकाकी मादी उडाली आणि त्या दोघांच्या झाडावर गेली मग मात्र मोर उडाला. त्या मागोमाग ह्या दोघीही भरारत

गेल्या. दूर झाडीत दिसेनाशा झाल्या.

मोर हा अनेक बायका करणाऱ्या पक्ष्यांपैकी आहे. सुंदर पिसाऱ्यामुळं, चवदार मांसामुळं मोर फार मारले जातात. म्हणून निसर्गानं ही तजवीज केली असावी.

एरवी नर मोर घोळक्यानं हिंडतात. जेव्हा जोड्या जमत असतात तेव्हा मात्र एक नर आणि अनेक माद्या असा कळप हिंडत असतो. ह्या सप्टेंबर महिन्यात मी मात्र जेवढे मोर पाहिले ते एकटे-एकटेच होते. माद्या फार कमी दिसल्या.

नऊ, साडे नऊ होऊन गेल्यावर आम्ही मोराचे कोटे बघायला गेलो. रात्री कुणी तरी बातमी दिली होती की, कोटे आहे, त्यात अंडीही आहेत. लांडोर अंड्यावर बसलेली आहे. मला माझ्या कामात मदत करण्यासाठी अनेक गावकरी उत्साहानं कालपासून रानात जमत होते. आरडाओरडा, हाका, शिट्या यामुळं बापडे मोर बावरून गेले होते. म्हणून अंडी बघायला मी फक्त एक बाटाड्या घेऊन गेलो.

ओढ्याच्या काठाला, चढावर असं उसाचं रान होतं. खाली खोल ओढा होता, आणि मधल्या चिंचोळ्या बांधावर, झाडापाचोळा, गवत, मारवेल, कुंदा, हरळी माजलेली होती. रानाच्या मालकाने जागोजाग बाभळीच्या काट्यांचे फेन्सही रोवले होते. शिंदी, टणटणी होतीच. पावसामुळे बेफाम माजलेल्या गवतातून वाट काढत आम्ही शेताच्या कोपऱ्यापाशी पोचलो. इथं अगदी अडचणीच्या जागी, शिंदीच्या झुडपाच्या बुडाशी लांडोरीनं अंडी घातली होती. साधा उथळ खळगा होता. त्यात पालापाचोळा सुद्धा फारसा नव्हता. ही अंडी स्पष्ट पाहण्यासाठी फार आटापिटा करावा लागला. शेत आणि पलीकडचा ओढा ह्यांमधला बांध फार अरुंद होता. जेमतेम दोन फूट रुंदीचा. माणूस, जनावर इथं जाण्याची, उभं राहण्याची काही शक्यता नव्हती.

ओढ्याशी समांतर असे, तोडलेल्या शिंदीचे खोड पडलेले होते. त्याच्या आडोशाला बसून मी हळूच डोळे वर काढले. लांडोरी अंड्यावर नव्हती. मग मात्र मी त्या खोडावर चढलो आणि तोल सावरीत नीट पाहिले. पिवळसर रंगाची, बदकाच्या अंड्याहूनही थोडी मोठीच अशी सहा अंडी होती. मी

अवघडून खोडावर बसलो आणि काखेच्या पिशवीतून वही-पेन्सिल काढून स्केच, नोंदी करू लागलो. एवढ्यात फडत्कार झाला आणि माझ्या पायातून उडावा तसा मोठा चित्तूर उडाला.

लांडोरीच्या कोट्यापासून तीन एक फुटांच्याच अंतरावर चित्तुराच्या मादीनं कोटं केलं होतं. गवतातल्या ह्या कोट्यात लहानलहान अशी सात अंडी होती.

हा काही केवळ योगायोग नसावा.

निरीक्षकांनी अशी नोंद केली आहे की, कोतवाल ( कोष्ठपाल ) पक्ष्याची जोडी झाडावर घरटं बांधू लागली की हळदले, होले ह्यांसारखे लहानसान पक्षी खालच्या फांद्यांवर घर करतात. कोतवालाच्या आश्रयाने आपली घरटी बांधतात. कारण कोतवाल हा बस्ताद पक्षी अंडी-चोरांना जवळपास फिरकू देत नाही. कावळा, ससाणा असल्या छापेमारूंना तो आरडाओरडा करून, पाठलाग करून हाकून लावतो. मला वाटतं, मोराचं आणि चित्तुराचंही असंच काही नातं असावं.

मोर सापाचा काळ आहे. मोरांच्या अंड्यापेक्षा थोडी मोठी असलेली चित्तुराची अंडी साप गिळत असणार.

बांध ओलांडून येताना माझ्या मागे असलेले गावचे गुरुजी मघा ताडकन उडी मारून म्हणाले होते,

" साप गेला हो, भला मोठा."

मला दिसला नाही. पण पाण्याजवळ म्हणून वाटलं, धामीण असावी. मोर आणि चित्तूर यांच्या घरट्यापासून त्याच बांधाला चाळीस एक फुटाच्या अंतरावरच ही धामीण दिसली होती.

घरटं दिसलं पण घरट्यावरची लांडोर दिसली नाही म्हणून दुपारी मी पुन्हा त्या जागेकडं गेलो. दरम्यान, कॅमेरा आणला नाही ही माझी हळहळ ध्यानी घेऊन गावकऱ्यांनी मोटारसायकल उमरग्याला पिटाळून फोटोग्राफर आणवला होता. त्याच्या जवळचा रोली फ्लेक्स कॅमेरा, फ्लॅश गन् बघून मी म्हणालो, कसा का होईना, पण फोटो येईल.

मी पुढं आणि फोटोग्राफर मागं असं बांधानं हळूहळू चाललो होतो. ( सकाळच्या जागी पुन्हा फोटोग्राफरला हा साप दिसला. ) दबत दबत जाऊन

मी पाहिले तर लांडोर अंड्यावर होती. माझ्याकडं पाठ असल्यामुळं तिला सुगावा लागला नव्हता. विशेष म्हणजे नेमकी त्याच वेळी चित्तुराची मादीही अंड्यावर होती. तिचीही माझ्याकडे पाठच होती. मी घड्याळ पाहिलं. दुपारचे बारा वाजले होते. येताना, घरट्याखाली, ओढ्यात आम्ही मोरही पाहिला होता. तो पहारा करत होता का ?

आजूबाजूला सगळी अडचण होती. त्यामुळं फोटोग्राफरला चपळाईनं फोटो घेता आला नाही. दरम्यान लांडोर उडून गेली.

मोठ्या खटाटोपानं अंड्याचा फोटो मिळाला. पण त्यासाठी जी साफसफाई करावी लागली, काटे, गवत दूर करावं लागलं, त्यामुळं घरटं उघड्यावर आलं म्हणून मी काळजीत पडलो.

एवढं सगळं होईपर्यंत चित्तुराची मादी मात्र अंड्यावर तशीच मुरून बसलेली होती.

तिचा फोटो मिळाला.

दोन्हीही कोष्ट्यांचा एकत्र फोटो मिळणं मात्र दुरापास्त होतं. आम्ही नाद सोडून दिला.

सोमवारी मला चाकरीवर रुजू होणं आवश्यक होतं. खरं तर माझी अशी इच्छा होती की, ह्या दोन्ही पाखरांची अंडी उबवून त्यांतून पिलं बाहेर येईपर्यंत आपण त्यांचं निरीक्षण करावं. नोंदी घ्याव्यात. फोटो काढावेत पण तेवढी मोकळीक नव्हती.

गावचे सरपंच, पोलिस पाटील, गुरुजी, राजोळे, पांगे ह्या सर्वांना मी वरचेवर सांगितले की, ही अंडी सांभाळा आणि पोरं बाहेर आली की, मला कळवा. मी पुन्हा येईन. डॉ. देशमुख जवळ उमरग्याला होते. ते स्वतः प्राणिशास्त्र चांगलं जाणणारे, त्यात रस घेणारे होते. त्यांनाही मी वरचेवर हेच सांगितले.

कोरेगावचा निरोप घेतला. दुपारी चार वाजता गाव सोडलं. ही दहा आणि अकरा सप्टेंबरची गोष्ट. पुढं मी दूर केरळ प्रांतात गेलो तो एकदम तीन ऑक्टोबरला परत आलो. दरम्यान घरी एक तार आली. एक पत्रही येऊन पडलं होतं.

तार एकवीस सप्टेंबरची. मजकूर असा—

Eggs Hatched. Deshmukh.

पत्र होते तेही एकवीस तारखेचेच.

'आज पहाटे चार वाजता मोराची चार अंडी उबवली आहेत. पिलं चांगली असून चालत आहेत. संरक्षणासाठी भोवती काटे लावले आहेत. श्री. राजोळे व पांगे आपली वाट पाहात आहेत.'

—देशमुख

माझ्या डोक्यावर भाराभर कामं आहेत, ती टाकून जाणं अगदी अशक्य आहे. तरी पण माझं मन सारखं कोरेगावकडं धावतं आहे.

मी पाहिले तर लांडोर अंड्यावर होती. माझ्याकडं पाठ असल्यामुळं तिला सुगावा लागला नव्हता. विशेष म्हणजे नेमकी त्याच वेळी चित्तुराची मादीही अंड्यावर होती. तिचीही माझ्याकडे पाठच होती. मी घड्याळ पाहिलं. दुपारचे बारा वाजले होते. येताना, घरट्याखाली, ओढ्यात आम्ही मोरही पाहिला होता. तो पहारा करत होता का ?

आजूबाजूला सगळी अडचण होती. त्यामुळं फोटोग्राफरला चपळाईनं फोटो घेता आला नाही. दरम्यान लांडोर उडून गेली.

मोठ्या खटाटोपानं अंड्याचा फोटो मिळाला. पण त्यासाठी जी साफसफाई करावी लागली, काटे, गवत दूर करावं लागलं, त्यामुळं घरटं उघड्यावर आलं म्हणून मी काळजीत पडलो.

एवढं सगळं होईपर्यंत चित्तुराची मादी मात्र अंड्यावर तशीच मुरून बसलेली होती.

तिचा फोटो मिळाला.

दोन्हीही कोश्यांचा एकत्र फोटो मिळणं मात्र दुरापास्त होतं. आम्ही नाद सोडून दिला.

सोमवारी मला चाकरीवर रुजू होणं आवश्यक होतं. खरं तर माझी अशी इच्छा होती की, ह्या दोन्ही पाखरांची अंडी उबवून त्यांतून पिलं बाहेर येईपर्यंत आपण त्यांचं निरीक्षण करावं. नोंदी घ्याव्यात. फोटो काढावेत पण तेवढी मोकळीक नव्हती.

गावचे सरपंच, पोलिस पाटील, गुरुजी, राजोळे, पांगे ह्या सर्वांना मी वरचेवर सांगितले की, ही अंडी सांभाळा आणि पोरं बाहेर आली की, मला कळवा. मी पुन्हा येईन. डॉ. देशमुख जवळ उमरग्याला होते. ते स्वतः प्राणिशास्त्र चांगलं जाणणारे, त्यात रस घेणारे होते. त्यांनाही मी वरचेवर हेच सांगितले.

कोरेगावचा निरोप घेतला. दुपारी चार वाजता गाव सोडलं. ही दहा आणि अकरा सप्टेंबरची गोष्ट. पुढं मी दूर केरळ प्रांतात गेलो तो एकदम तीन ऑक्टोबरला परत आलो. दरम्यान घरी एक तार आली. एक पत्रही येऊन पडलं होतं.

तार एकवीस सप्टेंबरची. मजकूर असा—

Eggs Hatched. Deshmukh.

पत्र होते तेही एकवीस तारखेचेच.

'आज पहाटे चार वाजता मोराची चार अंडी उबवली आहेत. पिलं चांगली असून चालत आहेत. संरक्षणासाठी भोवती काटे लावले आहेत. श्री. राजोळे व पांगे आपली वाट पाहात आहेत.'

—देशमुख

माझ्या डोक्यावर भाराभर कामं आहेत, ती टाकून जाणं अगदी अशक्य आहे. तरी पण माझं मन सारखं कोरेगावकडं धावतं आहे.

५

# वाळूचा किल्ला

गोव्यातला कळंगूट हा प्रसिद्ध सागरकिनारा. दिवस कलला होता. उन्हे सौम्य झालेली होती.

समोर निळा सागर गर्जत होता आणि वाळूत रंगीबेरंगी माणसे हिंडत होती. सोबतीला कोणी नसल्यामुळे मला फार एकटे वाटत होते. गोव्यात डेप्युटेशनवर येऊन मला महिना झाला होता. मुलाबाळांची आठवण येत होती. ह्या सुरेख, निसर्गरम्य प्रदेशात आपण एकटे का आलो ? उद्योगधंद्याच्या निमित्ताने आपण एवढे भटकतो पण सदैव एकटे, असे का बरे ?

गर्दीतून बाजूची जागा बघितली आणि वाळूत पाय रोवून बसलो. दोन्ही हात वाळूत खुपसले. निळ्या निळ्या पाण्यावर दृष्टी पसरली. उगाचच ओळी ओठावर आल्या—

ने मजशी ने परत मायभूमीला<br>
सागरा, प्राण तळमळला.

एवढ्यात चिमुकला, गोड आवाज आला,

“ अहो. ”

“ का हो ? ”

“ जरा लक्ष ठेवा हं माझ्या किल्ल्याकडं. ”

"का, तुम्ही कुठं निघाला किल्ला सोडून."

त्या तिकडे हात वर करून ती म्हणाली, "मी जरा तिकडे जाऊन येणार आहे."

"बरं, लवकर या."

"आले लगेच." असे म्हणून ती चिमुरडी पोर केस उडवीत पळालीसुद्धा. नाव विचारण्यापुरता वेळही तिने मला दिला नाही.

जवळ जाऊन मी तिचा किल्ला पाहिला. सुरेख बांधला होता. चोहोबाजूला चार बुरूज होते. चौफेर भक्कम तट होता. पायऱ्या होत्या, दरवाजे होते. चौफेर खंदक होता आणि त्यात पाणीसुद्धा आणून ओतलेले होते. माझ्या-सारख्याने केअर टेकर व्हावे अशी ही वास्तू होती खरी.

माझ्या मनात आले की, आम्ही वयाने एवढे होतो तेव्हा ओढ्याच्या ओल्या वाळूत पायावर चिमणीची ओबडधोबड कोटी करायला शिकलो होतो. एवढा नीटनेटका किल्ला कोणी आम्हाला कधी शिकवला नाही. किल्ला कधी पाहिलाच नव्हता, पाहिली होती ती चिमणीची कोटीच.

अगदी किल्ल्याशेजारीच ठाण मांडून बसणे बरे दिसणार नाही, म्हणून थोडे अंतर ठेवून बसलो.

खऱ्या खऱ्या वास्तूचे रक्षण करायचे म्हणजे चोराचिलटांकडून, उगाचच तावदानावर दगड फेकणाऱ्या विध्वंसक पोरांकडून, किंवा वादळ, पाऊस, आग ह्यासारख्या नैसर्गिक आपत्तीपासून. वाळूतच पाया खोदून वाळूने बांधलेल्या ह्या लुटीपुटीच्या वास्तूला मुद्दाम धोका द्यायला येणार कोण, आणि तिचे संरक्षण म्हणजे जोखीम ती काय?

पण, नाही म्हटले तरी जोखीम होतीच.

आत्ता जाऊन येते म्हणून सांगून गेलेल्या मालकीणबाई परत येऊन एक वार त्यांच्या हाती हा किल्ला सुपूर्द केला की मी सुटलो!

तेवढ्यात कुणाचे तरी भले मोठे कुत्रे धावत आले. एकाएकी थांबले. किल्ल्याजवळ गेले. नाक खाली करून त्याने वास घेतला आणि इकडे तिकडे बघितले. काही तरी कुकर्म करून, ह्या गोंडस वास्तूला कमीपणा द्यायचा त्याचा इरादा मला स्पष्ट दिसला.

आजूबाजूला दगडधोंडा नव्हताच. मी नुसताच हात उगारला, आणि

"हां..." म्हणून दरडावणी दिली.

कुत्रे लटकन हलले आणि तोंड फिरवून पुन्हा धूम् पळाले.

एक संकट टळले. मी उठून जाऊन किल्ल्याच्या अगदी शेजारी जाऊन बसलो.

मग ध्यानात आले की खंदकातले पाणी आटून गेले आहे. म्हणजे तिच्या हातात होती तसली रंगीबेरंगी बादली घेऊन पाणी आणणे आले. ते ओतून खंदक भरणे आले. आता बादली कोठून पैदा करावी बरे?

बीचवर दुकान होतेच. म्हटले, एक विकतच घेऊन टाकावी. अर्थात तिची होती त्यापेक्षा लहान. नाहीपेक्षा अपमान केल्यासारखे व्हायचे.

बादली घेऊन टिटवीसारखा समुद्राकडे गेलो. एक डोळा किल्ल्याकडे होताच. जवळपास कोणी नाही हे बघून ते कुत्रे पुन्हा यायचे. बादली भरून घेऊन आलो आणि सगळा खंदक नीट पाण्याने भरला. ह्या उलाढालीत शर्टाच्या वरच्या खिशातले सिगारेटचे पाकीट खंदकात पडले. सिगारेटी थोड्याफार भिजल्या.

त्या पाकिटातून काढून वाळूवर अंथरल्या आणि ते वाळवण आणि किल्ला राखीत स्वस्थ बसून राहिलो.

आत्ता तिकडे जाऊन येते म्हणून मालकीणबाई कुठे गुंतल्या होत्या कुणाला ठाऊक!

आता सूर्याचा तांबडा गोळा पाण्याच्या रेषेवर अगदी वावभर अंतरावर आला होता. दोघेचौघे कोळी लांबडे जाळे घेऊन समोरच मासे झोळीत होते. जाळे ओढून ते किनाऱ्यावरच्या वाळूत आले. त्यांनी जाळे झाडले. रुपेरी पोटे दाखवीत मासे फडफडू लागले आणि मंडईत ताजी भाजी न्यायला यावे तसे समुद्राकाठी मासे न्यायला आलेल्या गिऱ्हाइकांची, बघ्यांची, मुलांची गर्दी कोळ्यांभोवती झाली. आपणही उठून जावे आणि मासे कसले, केवढे आहेत, हे पाहावे असे मला वाटले. पण किल्ल्यापासून दूर जाणे धोक्याचे होते.

आणखी काही वेळ गेला.

हळूहळू भरती येते आहे हे माझ्या ध्यानात आले. बापरे! म्हणजे हा किल्ला आता पाण्याखाली जाणार. छे, छे, असे होऊन उपयोगी नाही. काय बरे करावे?

वर किनाऱ्याशी असलेल्या तात्पुरत्या हॉटेलापुढे मोकळ्या खोक्यांचा ढीग पाहिल्याचे आठवले.

धावत गेलो आणि एक खोके उचलून आणले. दुसरे आणले, तिसरे आणले. वाळूतच जरा पाया घेऊन ह्या खोक्याची भिंत करून किल्ल्याला आडोसा केला.

फेसाळ पाणी आता अगदी जवळ आले होते. मालकीणबाईचा अजूनही पत्ता नव्हता. तेवढ्यात हॉटेलातला झिप्रा पोरगा लुंगी सावरीत आलाच.

" कायहो खोकी आणताय उचलून. काय विचारायची पद्धत आहे की नाही. फुकटचा माल नाही तो ! "

मी खिशातून पाकीट काढीत विचारले, " हा माल मी विकत घेतला असं समजा, काय किंमत आहे एका खोक्याची ? "

पोरगा गडबडला.

" विक्रीची नाहीत ती. माल आणण्यासाठी लागतात हरघडी. पणजीहून माल आणावा लागतो. उपयोगाची आहेत ती आमच्या ! "

" मीही ती उपयोगातच आणतोय ! "

माझ्या थंडपणामुळे पोरगा आवेश सोडून खाली उतरला.

त्याने किल्ल्याकडे, पाण्याकडे बघितले. त्याचा चेहरा हसरा झाला. भरतीच्या पाण्यापासून किल्ला वाचवण्यासाठी माझी धडपड चालू आहे हे त्याच्या ध्यानी आले. म्हणाला, " बरं, काम झालं म्हणजे जागच्या जागी आणून ठेवा ! "

" अगदी अवश्य. बिनघोरी राहा तुम्ही. "

पाणी सारखे पुढे पुढे येत होते आणि ह्या बाईसाहेबांचा पत्ता नव्हता. जाऊन येते म्हणून आपले आईवडील बसले असतील तिकडे गेल्या असतील आणि कदाचित तिकडेच रमल्या असतील.

हातावर वळलेली सिगरेट ओठात ठेवून कोणी भटक्या माणूस हिंडत फिरत आला आणि किल्ल्यापाशी येऊन बघत उभा राहिला.

त्याने मला विचारले,

" तू बांधलास ? "

" नाही. लहान मुलीनं. मला येत नाही. "

" सवय लागते. "

मी उत्सुकतेने विचारले, " तुला येईल का बांधता ? "

" हा, ह्याच्यापेक्षा फसकलास बांधीन. "

" मग मला एक बांधून दे, त्या तिकडे. पाणी तिथं येणार नाही ना ? "

" नाही यायचं. चल बांधतो. "

हाताच्या बाह्या साधून भटक्या तयार झाला. भरतीचे पाणी पोचणार नाही अशा ठिकाणी बसून कामाला लागला. एखाद्या धंदेवाइकासारखा त्याचा हात चालला होता.

किनाऱ्यावर बरीच मुले हुंदडत होती. पण किल्ल्याच्या मालकिणीचा पत्ता नव्हता. बहुधा ती कोकाकोला किंवा आईस्क्रीम खाण्यात दंग असावी.

खोक्याची भिंत काही वेळ किल्ला वाचवू शकली. पण अखेरीला किल्ला पाण्याखाली गेलाच: ती तिन्हीही खोकी मी मालकाकडे पोचवून आलो.

दरम्यान भटक्याने किल्ला पुरा केला होता. सिगरेट वळण्यासाठी तळहातावर तंबाकू अंथरीत तो रुबाबात बोलला, " बघ बरं, तुझ्या मनासारखा झाला का ? "

" झकास झालाय. "

त्याचे आभार मानून मी एक रुपयाची नोट काढून देऊ लागलो. तो म्हणाला, " छ्या, माझ्या पोरानं सांगितलं असतं तर दिला नसता का बांधून ? ठेव पैसे. " आणि उलट मला सलाम करून तो निघून गेला.

मी वाट पाहात राहिलो. आता दिवस मावळला होता. हळूहळू किनारा रिकामा होत होता. ही पोरं आपल्या आईबापाबरोबर घरी निघूनही गेली असावी. आपण वाळूचा किल्ला बांधलाय आणि त्याच्या देखभालीसाठी कुणाला तरी बसवून आलोय, ही गोष्ट विसरूनही गेली असेल.

मुलांचे कसे असते ते आपल्याला ठाऊक नाही का ?

ते मघाचेच का आणखी कुठले कोण जाणे, कुत्रे पुन्हा आले आणि किल्ल्याचा वास घेऊन काही कुकर्म न करता निघून गेले.

मी त्रयस्थासारखा पाहात होतो.

कुत्र्यामागोमाग लहान मुलांचे एक टोळके आले. किल्ल्याभोवती उभे राहिले. त्यांनी किल्ला नीट पाहिला.

मग ' हो ' करून एक पोर किल्ल्यावर नाचले. तशी सगळीच पोरे नाचली. त्यांनी किल्ल्याची नामोनिशाणीसुद्धा ठेवली नाही. आरडाओरडा करीत पोरे पळाली. मी उदासीनच राहिलो.

बघता बघता अंधार झाला. किनाऱ्यावर अगदी तुरळक माणसे राहिली.

ती रंगीत बादली हलवीत मी मुक्कामाकडे परतलो.

# ६

## पारितोषिके

हल्ली कधीमधी मी कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला पाहुणा म्हणून जातो आणि माझ्या हस्ते बक्षिसे वाटली जातात. पन्नास-पाऊणशे विद्यार्थि-विद्यार्थिनींना ही पारितोषिके देत असताना या गुणी मुलांबद्दल मला फार आदर वाटत असतो आणि मनोमनी मी फार ओशाळलेलाही असतो.

माझ्या शैक्षणिक जीवनात मला कधी एकही पारितोषिक मिळालेले नाही. खेळाबद्दल नाही, कुस्तीबद्दल नाही, अभ्यासाबद्दल तर नाहीच नाही

नाही म्हणायला एक पारितोषिक मला मिडलस्कूलमध्ये असताना मिळाले होते. शाळेबाहेरील एका गृहस्थांनी अचानकपणे वर्गात प्रवेश करुन ही घोषणा केली होती. हेही बक्षीस अर्थातच अभ्यासाबद्दलचे नव्हते.

आमची शाळा तेव्हा ऐन बाजारपेठेत होती अरुंद बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाण्यांची दुकाने होती. कापडाची, किराणा मालाची, स्टेशनरी मालाची, तेलातुपाची, गावठी दारूची, अफूची अशी अनेक दुकाने ओलांडून आम्हाला शाळेत जावे लागे. बाजारपेठेत काही दुकानांपुढे छकडा सुटलेला असे आणि एखादा बैल वाट अडवून रवंथ करीत बसलेला असे. कुठे दोन बैल असत, कुठे घोडा असे, कुठे गाय-म्हैस असे. या सर्वांतून वाट काढत काढत आम्हाला शाळेपर्यंत पोचावे लागे.

पुष्कळदा आम्ही वेळेच्या आधीच शाळेपाशी पोचत असू आणि शाळा उघडलेली नसे. भलेमोठे कुलूप शाळेला असे. मग आम्ही शाळेपुढच्या जोत्या-वर वाट बघत बसत असू. इतक्या लवकर उत्साहाने शाळेला येणारी मुले फारशी नसत.

शाळेशेजारीच एक मोठा सूर्यनमस्कार हॉल होता. औंध संस्थानातील प्रथेप्रमाणे रोज सकाळी या हॉलमध्ये विद्यार्थ्यांनी सामुदायिक सूर्यनमस्कार घालावयाचे असत. ओम् ऱ्हाम ऱ्हीम अशी सुरुवात करून हे पंचवीस नम-स्कार होत. शेवटी—

आदित्यस्य नमस्कारान् ये कुर्वन्ति दिने दिने
जन्मांतरसहस्त्रेषु दारिद्र्यम् नोपजायते ॥
नमो धर्मविधानाय नमस्ते कृतसाक्षिणे,
नमः प्रत्यक्ष देवाय, भास्कराय नमोनमः ॥

असे म्हणून हे नमस्कार संपत. काढून ठेवलेले शर्ट आणि टोप्या घालण्याची मुलांची एकच धाई उडे.

शाळेला व सूर्यनमस्काराला चांगली उपस्थिती असावी म्हणून आमच्या प्रमुख अध्यापकांनी प्रथम घंटेच्या आत जो शाळेला हजर होईल त्याला मार्क ठेवले होते. अभ्यासात उत्तम मार्क पडण्याची ज्यांना आशा नसे असे माझ्यासारखे विद्यार्थी हे मार्क मिळविण्यासाठी सकाळी धावत पळत शाळेला येत. पुढे पुढे तर शिक्षकांची परवानगी घेऊन आम्ही चार-सहा मुले या हॉलमध्येच रात्री झोपू लागलो. एक प्रपंचात न पडलेले शिक्षकही आमच्या बरोबर असत.

हॉलमध्येच झोपल्यामुळे नमस्काराला उशीर होणे हा प्रश्नच मिटला. सकाळी साडेसातला सूर्यनमस्कार असत.

एकदा या हॉलच्या बाहेर उन्हाला येऊन मी उभा राहिलो होतो. अजून साडेसात व्हायचे होते. बाजारपेठेत हळूहळू दुकाने उघडली जात होती. वाण्यांचे गडी दुकानापुढे सडे शिंपीत होते.

सूर्यनमस्कार हॉलला लागूनच गणू मोटे याचे किराणा भुसार मालाचे दुकान होते.

रॉकेल, चुना, गूळ, ओशट तूप यांचे एकमेकात मिसळलेले वास या

दुकानातून निघून आमच्या हॉलमध्ये येत.

सकाळी सकाळी सुस्नात असे गणू मोटे, तांबडट रंग आलेले धोतर नेसून आणि कपाळ, छाती, दंड यांवर विभुतीचे पट्टे ओढून, गुळगुळीत पाटावर येऊन बसत. तोंडाच्या मानाने नाक फारच मोटे असल्यामुळे लोक त्यांना 'गणू मोटे, नाक मोटे' असे विनोदाने म्हणत.

मालाची ने-आण करण्यासाठी आणि पंचक्रोशीतले आठवड्याचे बाजार साधण्यासाठी, मोटेबोवांनी एक चांगले तेज घोडे ठेवले होते. ते घरासमोर नेहमी ठाणबंद असे.

मजा अशी झाली की सूर्यनमस्कार हॉलच्या बाहेरच्या जोत्यावर मी ऊन खात उभा असताना समोरच्या चंद्रा तेलणीच्या घरातून एक नुकतीच चालायला शिकलेली पोर कुणाचे लक्ष नसताना, कधी रांगत, कधी चालत, मूठभर धूळ झिपऱ्यांतून कालवत त्या घोड्याच्या मागच्या पायापाशी आली होती आणि उठून उभे राहण्यासाठी आता ती घोड्याच्या पायाचा आधार घेणार एवढ्यात माझे लक्ष गेले.

आता ते वीतभर पोर पायात आल्यावर खाण्याच्या नादात असलेले घोडे अगदी सहजच ताडकन् टाप हाणणार आणि एवढ्या मोठ्या घोड्याची टाप कुठेही लागली तरी पोरीचा चुरा होणार.

झटक्याने मी पुढे झालो आणि बाव्हट्याला धरून पोरीला उचलले. रस्ता ओलांडून, तेलणीच्या उंबऱ्यात सोडले.

तेवढ्यात शाळेची ठाण ठाण ठाण घंटा झालीच.

मी हॉलमध्ये येऊन कपडे काढले आणि ऱ्हाम ऱ्हूम करण्यासाठी ओळीत उभा राहिलो.

सूर्यनमस्कार झाले. आम्ही वर्गात आलो. तास व्ही. के. देशपांड्यांचा होता. ते संथपणे इंग्रजी शिकवू लागले आणि दोन-पाच मिनिटे झाली न झाली एवढ्यात गणू मोटे यांनी वर्गात प्रवेश केला.

अंगावर भस्माचे पट्टे, कडकडीत, तांबडट धोतर असाच त्यांचा वेष होता. आणि व्ही. के. सरांची परवानगी न विचारताच ते वर्गात घुसले होते.

सगळ्या मुलांच्या माना दाराकडे वळल्या तेव्हा व्ही. के. सरांनीही त्या दिशेने पाहिले तर गणू मोटे. तेही थक्क झालेले दिसले. चष्म्यातून वर पाहात

त्यांनी विचारले-" काय ? "

मोटे म्हणाले, " तो माडगूळकरांचा व्यंका तुमच्याच वर्गात आहे का ? "

अरे बापरे, हे काय बोवा बालंट आले ? मोटे याची काही खोडी काढल्याचे मला स्मरत नव्हते.

सर म्हणाले, " हो. का ? "

" त्याला उभा करा, मी त्याला बक्षीस देणार आहे ! " सरही गोंधळले.

" बक्षीस ? कशाबद्दल ? "

मला वाटते ' बक्षीस ' या शब्दाचा वेगळाच अर्थ सरांनी घेतला असावा.

मग मोट्यांनीच सगळया बाकावरून नजर फिरविली आणि मी दिसताच ते म्हणाले, " ऊठ रे मुला, उभा राहा. सर्वांना दिसू दे. "

आता कुणाचे ऐकावे, मोटे यांचे की सरांचे ? मी साभिप्राय व्ही. के. देशपांडे यांच्याकडे पाहिले. त्यांनी मानेनेच होकार दिला.

मी उभा राहिलो, बावरलो होतोच.

दारात होते ते मोटे टेबलाशी येऊन उभे राहिले आणि भाषण द्यावे तसे बोलले : " आज या मुलानं दयाळूपणाचं एक फार मोठं कृत्य केलं आहे. एका लहान बाळाचा जीव वाचविला आहे. रांगती मुलगी घोड्याच्या पायात आली होती. स्वतः धोका पत्करून यानं तिला ऐन वेळी उचलली. मी माझ्या घरातून बघितलं. या थोर गुणाबद्दल मी आज त्याला हे बक्षीस देतो-"

मोटेबुवांनी कमरेला हात घालताच आता हे काय देतात म्हणून सर्व मुले, मी, सर उत्सुकतेने बघत असताना गणू मोटे यांनी एक सबंध पावलीचे नाणे कडोसरीचे काढून उंच धरले.

" घे रे बाळ. "

फार संकोचाने मी पुढे झालो. ते नाणे घेतले. मोटेबोवांना नमस्कार केला, व्ही. के. सरांना केला.

पुढे जीवनात मला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशी अनेक पारितोषिके मिळाली. चित्रपटलेखनाबद्दल, नाट्यलेखनाबद्दल, लघुकथेबद्दल, कादंबरी-बद्दल घसघशीत पारितोषिके मला मिळाली.

पण मोटे यांचे पारितोषिक अद्याप माझ्या आठवणीत आहे.

## ७

# हरवलेले बालपण

मला वाटते गावाचे नाव तडवळे होते आणि ते सातारा जिल्ह्यात होते.

गेल्या वीस वर्षांत ह्या लहानशा गावात बघणाराने चकित व्हावे एवढ्या सुधारणा झाल्या होत्या. जुनेपाने, दरिद्री, मागासलेले तडवळे नाहीसे होऊन त्या जागी आता नवे, समृद्ध तडवळे झाले होते. ह्या गावच्या गोष्टीवर आधारित असा 'बदल' नावाचा कार्यक्रम आकाशवाणीवर, प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने करावा म्हणून जामानिमा घेऊन प्रत्यक्ष ध्वनिमुद्रणासाठी आम्ही त्या गावी गेलो होतो.

ध्वनिमुद्रण चालू होते. गावकऱ्यांची गर्दी झाली होती. गावकऱ्यांच्या बोलण्यात किन्ही, किन्ही असा कोण्या गावाचा उल्लेख वरच्या वर आला तेव्हा मी सहज चौकशी केली,

"किन्ही म्हणजे किन्हई तर नव्हे ?"

"हां, हां, तीच."

"ते गाव इतकं जवळ आहे इथनं ?"

"अहो, ह्या हितं, फार झालं तर चार मैल असेल."

मी पुन्हा खात्री करून घेतली,

"पूर्वी औंध संस्थानात होतं तेच ना हे गाव ?"

" हां, तेच तेच. "

माझी ही उत्सुकता पाहून गटविकास अधिकाऱ्यांनी म्हटले, –

" तुमचं तिथं कोणी आहे काय साहेब ? "

मी स्वतःशीच पुटपुटल्यासारखा बोललो, –

" हो, माझं बाळपण तिथं आहे. "

अचानक लाभ व्हावा तसा मला आनंद झाला. बरोबर तेहेतीस वर्षांपूर्वी ह्या निसर्गरम्य टुमदार गावात, माझ्या बाळपणीची सुंदर वर्षे मी घालवली होती. हे गाव पंतप्रतिनिधींचा राजवाडा, गावच्या बरोबर मधून वाहणारी वांगना नदी, फुलांच्या आणि फळांच्या बागा, राजेसाहेबांच्या हत्तीला वर्षभर लागणारे गवत पुरवणारी इथली डोंगरपठारे, आणि गावात नदीकाठी असलेली काळ्या पाषाणाची शांत, प्रसन्न देवळे ह्या सर्वांत माझे अवघे बाळपण दुडदुडत होते. ते आता किती तरी वर्षांनी तस्सेच्या तसे मला बघायला सापडणार होते.

मी विचारले,—

" का हो, ते डोंगरावरचे यमाईचे देऊळ आता कसे आहे ? "

अधिकारी म्हणाले,

" पार वरपर्यंत मोटार जाते, पायऱ्या चढायची दगदग नाही. आपण म्हणत असाल तर आज दुपारी जाऊन येऊ. "

मी म्हणालो,—

" जाऊ या. "

धुरोळा उडवीत आमची जीप धावत होती. समोर दिसणारा यमाईचा डोंगर जवळजवळ येत होता.

.... *खुणा गावच्या दिसू लागल्या, स्पष्ट मला लोचनी, उडे किति खळबळ हृदयातुनी...*

वरचे देऊळ, त्याचे शिखर दिसले.

आणि मला सनईचौघडा ऐकू आला....

देवस्थानचे वहिवाटदार म्हणून काम पाहात असलेले माझे वडील, उन्हाच्या आधी पायऱ्या चढत होते. त्यांच्या डोक्याला जांभळ्या रंगाचा जरीकाठी रुमाल होता, अंगात पिवळ्या रंगाचा लांब कोट होता. खांद्यावर

जरीकाठी उपरणे होते. धोतराचा सोगा आवरून ते दम घेत घेत, वरचेवर थांबत पायऱ्या चढत होते. मी, वरचेवर पुढे पळून, पायरीवर थांबून दमगीर दादांच्याकडे पाहात होतो.

नवरात्रात नऊ दिवस देवीचा मोठा उत्सव असे. सारखा सकाळसंध्याकाळ देवीचा सनईचौघडा झडत राही. जरीच्या झिरमिळ्यांची लाल पागोटी, पांढरे लांब अंगरखे घातलेले, तांबड्या मखमालीचे रुबाबदार पट्टे छातीवर रुळत असलेले देवीचे एकशेआठ सेवेकरी डोंगरावर जमत. देवीचा डोंगर माणसांनी फुलून जाई. पंचपक्वान्नांचा नैवेद्य देवीला असे. त्या स्वयंपाकाचा, धुराचा, उदाचा, हीना अत्तराचा, गुलाबाच्या, शेवंतीच्या फुलांचा वास डोंगरावर दरवळत असे.

देवीच्या प्रशस्त सभामंडपात गालिचे, गाद्या, लोड, तक्के अशी शाही बैठक घातलेली असे. सलीमाजान नावाच्या कोणा बाईचे गाणे असे. गोड स्वराने, सारंगीतबल्याच्या आवाजाने गाभारा भरून जाई.

मोरचेल अबदागिरी घेऊन भालदार-चोपदार उभे असत.

डोंगर चढून गेल्यावर देवीचे दर्शन घेऊन माझे वडील, गाभाऱ्यात बसण्या-आधी दीपमाळेच्या दगडी कट्ट्यावर पाच मिनिटे स्वस्थ बसत.

आमची जीपगाडी डोंगर चढून थेट दरवाज्यापाशी आली. दुपारचे तीन वाजले होते, रखरखीत उन्ह होते. दाराच्या मुख्य दरवाजातून मी आत शिरलो. सगळीकडे शुकशुकाट होता. जुन्यापान्या दगडी इमारती उन्हाने तापून उसासे सोडीत होत्या. ती दीपमाळ, तो दगडी चौथरा तसाच होता. पिंपळाची छाया त्यावर पडली होती.

जिथे पाय वर घेऊन, आणि गुडघ्याभोवती हाताची मिठी घालून माझे वडील देवाचिये द्वारी क्षणभर विसावत, त्यांच्या मांडीशी लागून मी बसत असे, त्या पाषाणावरून मी हात फिरवला. गार छायेतला तो पाषाण मला उष्ण लागला. नुकतेच तेथे कोणीतरी बसून गेले असावे.

आजूबाजूचे सगळे वातावरण उदास, रंगहीन, स्तब्ध होते.

कुठेतरी एकाकी होला खिन्नवाणे घुमत होता.

कुठे गेले ते देवीचे तुंदिलतनु पुजारी ? कुठे आहेत ते एकशेआठ इनामदार

मानकरी ? कुठे आहे तो चौघडा-सनईचा मंगल गजर ? कुठे गेले माझे वडील ?

*कोठे ते कांचनाचे कळस चमकती रम्य देवालयाचे ?*

रिकाम्या गाभाऱ्यात जाऊन मी देवीचे दर्शन घेतले. तेवढ्यात पुजाऱ्याची आठनऊ वर्षांची पोर आली. तिने खुलासा केला की, वर मोठे पुरुष माणूस कोणी नाही. वडील खाली गावात गेलेत. तिने अंगारा दिला. फोडलेल्या नारळाचे अर्धं भक्कल रुमालात बांधून घेऊन मी गाभाऱ्यात उभा राहिलो.

माझ्या आठवणीतल्या गाभाऱ्यापेक्षा हा गाभारा केवढा तरी लहान होता. पूर्वीच्या वैभवाची काही खूण आता राहिली नव्हती. रंगीत काचेच्या हंड्या नव्हत्या. लोलकांची झुंबरे नव्हती. औंधकरांचे अन्न खाल्लेल्या कोणा पेन्टराने केलेली दोन लहान चित्रे तेवढी टांगलेली होती. मांडीवर आडवी तलवार घेतलेल्या राजेसाहेबांचे आणि अहिल्यादेवी होळकरांसारखे वाटणारे, माईसाहेबांचे.

मी बाहेर आलो.

नारळाच्या तुकड्यातील खोबरे काढण्यात गर्क झालेल्या ड्रायव्हरला म्हणालो,

" आता काही राहिलं नाही इथं. "

पोरसवद्या ड्रायव्हरला त्याचे काही वाटले नाही. कदाचित तो ह्या भागातला रहिवासी नसेलही. त्याने विचारले,

" गावात जायचं का ? "

" चला जाऊ. "

डोंगर उतरून जीप गावाकडे निघाली.

बाजारपेठ. आठवड्याचा बाजार इथे भरायचा आणि कार्तिकीजत्रेत रंगी बेरंगी दुकाने ह्याच रस्त्याच्या दुतर्फा लागायची. राजेसाहेब ह्याच वाटेने देवीच्या दर्शनाला जायचे, शृंगारलेला हत्ती, उमदे घोडे, लवाजमा असा केवढा समुदाय लोंढ्यासारखा वाहात राही ह्या रस्त्याने. कर्णेतुताऱ्यांचा आवाज, उत्साहाला केवढे उधाण आणी.

आता त्याच्या काही खुणा नव्हत्या. रिकाम्या बाजारपेठेतल्या एका चिंचेच्या झाडाखाली दोन दीनवाणी गाढवे दिडक्या पायावर उभी होती.

हीच ती बांगना नदी. हिच्या दोन्ही काठांना तेव्हा केवढी गर्द झाडी होती.

पिकलेल्या टेंबरा-उंबराचा वास त्या झाडीत कसा भरून असे. दोन्ही तर्फा असलेली पांढरी, तांबडी कण्हेरी फुललेली असे. त्या गर्द झाडीतून वटवाघळे, वानरे, मोर किती दिसायचे.

आता ही नदी अशी उजाड, क्षुद्र ओढ्यासारखी का बरे दिसते? नदी लहान झाली की मी वयाने वाढलो?

"ड्रायव्हर, जीप जरा उजव्या बाजूने घ्या."

नदीला लागून आठ एकरांची उत्तम फुलबाग होती.

पहाटेपहाटे सनईचौघड्याच्या आवाजाने मी जागा होई, आणि लगेच मोठी परडी घेऊन निघे. वांगनेचे धुक्याने भरलेले पात्र ओलांडून ह्या बागेत येई. दहिवराने ओली झालेली शेकडो फुलझाडे इथे फुललेली असत. बसरा गुलाबाच्या, कुंदाच्या, जाईजुईच्या वासाने बाग भरून गेलेली असे किती परीच्या जास्वंदी माझे तांबडे भडक स्वागत करीत. ही सरकारी बाग म्हणजे मला रोज एक नवा चमत्कार असे.

कुठे होती ती बाग?

वाटेवरच गाडी उभी करून मी पाहिले. ज्वारीचे उभे पीक त्या सर्व आठ एकरांत होते. नारळाची, फणसाची, आंब्याची झाडे कुठे नाहीशी झाली होती?

नदी ओलांडून आम्ही गावात आलो. सारे गाव जुनाट, ओसाड, खिन्न वाटले. उदबत्त्यांचे कारखाने आता राहिले नव्हते. तो वास गावात कुठे आढळत नव्हता.

कोणी ओळखीचा चेहरा दिसला नाही.

"साहेब, राजवाड्याकडे जाऊया काय?"

चला."

राजवाड्यापुढची बागही आता नव्हती. आता राजवाड्यात हायस्कूल झाले होते. सर्व वर्ग चालू होते.

इथे आम्ही चार वर्षे राहात होतो.

उखणलेल्या भिंती, रंग गेलेल्या भिंती, अनेक वर्षांत तेलपाणी न मिळाल्यामुळे पांढरे पडलेले खांब, तुळया, कडीपाट.

ह्या दालनात माझ्या वडिलांची कचेरी होती. त्या दालनात आम्ही झोपत

असू. त्या खोलीत देवघर होते. त्या तिथं आमचा अंबादास जन्मला.

मला त्या भिंतींना हात लावायचा होता. त्या जमिनीवर उभे राहायचे होते. पण आता सगळीकडे वर्ग चालू होते.

हायस्कूलचे हेडमास्तर लगबगीने आले. मला आपल्या कचेरीत घेऊन गेले.

" नमस्कार, नमस्कार ! वाहवा, योग आहे आज ! "

शाळेच्या गड्याने स्टोव्हवर चहा केला. बिस्किटांचा पुडा आणला.

हेडमास्तर म्हणाले,

" आधी कळवले असते तर....मुलांना आपले चार शब्द ऐकायला मिळाले असते. "

मी ओशाळवाणे हसलो.

काही वासना नव्हती.

घाईगडबडीने बाहेर पडलो.

ही वाड्याची लांबलचक देवडी.

इथे रोज बारा हत्यारी रखवालदार झोपायचे. देवीचे सोन्याचांदीचे रत्नामाणकांचे दागिने आत होते ना ?

ह्या राखणदारांत एक बळी रामोशी होता. त्यानेच मला रानामाळाची गोडी लावली. शिकार दाखविली. आणि किती गोष्टी, किती किस्से ऐकवले. केवढ्या अद्भुत दुनियेतून तो मला हिंडवून आणी.

त्या बळीची खुशाली मी कुणाला विचारू ? तो तेव्हाच चाळिशीचा होता. म्हणजे आता सत्तरीच्या पुढचा असेल. असेल, किंवा बापडा मरूनही गेला असेल.

मी कुणापाशी चौकशी केली नाही.

आल्या वाटेने बाहेर पडलो.

जीप पुन्हा तडवळ्याकडे धावू लागली.

माझे बालपण आता कायमचे हरवले होते.

८

# माझे वडील बंधू

एकोणीसशे अडतीस साल. जुलै महिना. आभाळ सदा भरून आलेले, सारखा चिरीचिरी पाऊस लागलेला.

आमच्या घरातले वातावरण उदास. दादा आणि आई दोघांचे चेहरे काळवंडून गेलेले. घरात आम्ही सगळी न-कळती मुले होतो. माझे वय अकरा वर्षांचे. मोटा भाऊ भालचंद्र दिघंचीला चुलत्याकडे होता. आम्ही कुंडलला होतो. संस्थानात काही नवा कायदा जारी झाला होता आणि दादांना एकाएकी नोकरीतून निवृत्त केले होते.

आता इथून जायचे ते आपल्या खेडेगावीच. माडगूळला. पण त्यापूर्वी लोकांची देणी भागवायची होती, घरभाडे बेसुमार थकले होते. वाण्याची, दूधवाल्याची, ह्याची-त्याची बिले द्यायची होती. त्यावाचून कोण बिऱ्हाड उचलू देणार ?

आई सारखी अण्णाची वाट बघत होती. कोल्हापूरला पत्र गेले होते आणि आईला वाटत होते, ह्या परिस्थितीत आता कोणी उभा राहिला तर तो माझा मोठा ( म्हणजे सोळा वर्षांचा ) मुलगाच. त्याला मोठी नोकरी नसू दे, त्याच्यापाशी पैसे असू नसू देत, पण तो आता यावा. ह्याप्रसंगी त्यानं काहीही करून यावं.

घरातले ते वातावरण आणि आईचे स्वतःशीच चाललेले बोलणे मी ऐकत होतो. आणि रडकुंडी येऊन म्हणत होतो की, का येत नाही अण्णा? इतकी वाट का बघायला लावतोय? त्याने आता आले पाहिजे.

मग रोज सकाळी लवकर उठून, डोक्यावर गोणपाट पांघरून मी पावसातून ओढ्यावरच्या लहान पुलावर जात होतो. आणि किर्लोस्करवाडीहून येणाऱ्या सडकेकडे पाहात कठड्यावर बसून राहात होतो. तिथून थेट वरपर्यंत लांबलचक रस्ता दिसे.

विलक्षण अधीर होऊन मी टांग्याची वाट बघे आणि टांगा दिसत नसे.

शाळेची वेळ झाली म्हणजे निराश होऊन मी पुलावरून उठून येई.

दोनचार दिवस हा क्रम सुरू होता.

आणि एके दिवशी झिमझिम पावसातून चालत अण्णा आला. कितीतरी वर्षांत मी त्याला पाहिले नव्हते. अंगात रेनकोट घातलेला आणि हातात पिशवी घेतलेला अण्णा आला. त्याला पाहून मला आनंदाने अगदी रडू आले.

दहावीस पावलांवर असलेल्या अण्णाला न भेटता तोंड फिरवून धावतपळत मी घरी आलो आणि आईला म्हणालो :

" अग आई, आपला अण्णा आला. "

" खरं रे ? "

" अग, खरंच मी पुलावर पाहिला. "

" आला ? आता तो सगळं बारील बघ ! "

आणि गेले दोनतीन आठवडे घरात भरून राहिलेली उदासीनता मावळली. दिवाळी आली.

अगदी लहानपणची ही एकच ठळक आठवण माझ्या मनात घर करून राहिली आहे. पुलावर मी वाट बघत बसून राहिलो आहे आणि पावसातून चालत येणारा अण्णा दिसताच आनंदाने रडत घराकडे धावतो आहे.

अण्णा नेहमी कुठेतरी परगावीच असत. ते घरी भावंडांत असलेले मला फारसे आठवत नाहीत. आईच्या भाषेत म्हणावयाचे तर अण्णा नित्याचा परदेशी असे.

श्रावणातल्या सोमवारी निरांजन पेटवलेले तबक तयार करून आई विचारी :

" कोल्हापूर कोणत्या दिशेला रे ? "

टोपी घालून पाटावर बसलेला थोडा कळता असा मीच. भालचंद्र शाळा शिकायला म्हणून आक्काकडे किंवा बिटाकाकाकडे असे. श्याम फारच लहान होता. मला तरी एवढे भूगोलाचे ज्ञान कुठले? म्हणून टाकायचे—

" आई, कोल्हापूर इकडे पूर्वेकडे. "

मग आम्हाला ओवाळण्याआधी आई पूर्वेकडे ओवाळी.

अण्णा मुंबईला असोत, पुण्याला असोत. कोल्हापूरला असोत. बाई पूर्वेकडे ओवाळायची.

भावंडांपैकी कुणालाही काही गरज पडली की आई म्हणे—

" जा अण्णाकडे. "

कधी कधी ह्या गरजा अगदी साध्यासुध्या असत. फी-पुस्तकासाठी पैसे, नवे कपडे, स्वेटर, ब्लँकेटे असल्या. कधीकधी मोठ्याही असत. शेतीसाठी एंजीन हवे असे. कधी बैलजोडी हवी असे. कधी विहीर खोदायची असे, तर कधी जमीन खरेदी करायची असे. गरज लहान असो मोठी असो, सर्वांनी थेट अण्णा असतील तिथे जायचे. जर कोणी विशेष आजारी असले तरी त्याने अण्णाकडे जायचे. महिना-पंधरा दिवस औषधपाणी करून बरे व्हायचे.

अण्णा सर्वांचे होय नव्हे पाहात असत. त्यांनी ' नाही ' असे कुणाला म्हटले नाही. सर्वांच्या नडीअडचणी वारायच्या. भावांच्या, भावजयींच्या, बहिणीच्या, भाच्याच्या, पुतण्याच्या, चुलत्यांच्या. बरे, आमचे कुटुंबही असे की अण्णाचे पांघरूणही नेहमीच अपुरी चादर ठरायची. तोंडावर घेतली की पाय उघडे, पाय झाकले की तोंड उघडे!

त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून आजतागायत हे चालू आहे. त्यातूनच अण्णांनी लिहिले. कथा, कविता लिहिल्या. चित्रपटात कामे केली, गीते लिहिली. चित्रपटकथा लिहिल्या. पारितोषिके मिळवली. गीतरामायण लिहिले. राजकारणात भाग घेतला, सभासंमेलने गाजवली.

अहो, ह्या एकट्या माणसाने पन्नास वर्षांच्या काळात किती म्हणून केले!

कामाला बसले म्हणजे वाघासारखे आहेत. लिहिणे कष्टसाध्य कधीच नाही. मोत्यासारख्या स्वच्छ अक्षरांत पानामागून पाने लिहितात. मी माझी एकएक गोष्ट पुनःपुन्हा लिहीत असे. मान मोडून मी लिहिलेले फेअर करीत असलो

म्हणजे अण्णा म्हणत--

" हस्ताक्षराचा ब्लॉक करून छापत नाहीत व्यंकोबा; कंपोज वगैरे करून मग छापतात. "

विद्यार्थिदशेपासून अण्णांनी अगदी वेगळी वाट चोखाळली, आणि कधी पूर्वी आमच्या घरात नव्हते ते आले. साहित्य आले, राजकारण आले, अभिनय, चित्रकला यांसारख्या कला आल्या. अण्णाचा अनेक क्षेत्रांशी संबंध. त्यामुळे किती वेगवेगळे नामांकित लोक आमच्याकडे येऊजाऊ लागले.

त्या आडवळणी माडगूळलासुद्धा, रानात टाकलेल्या त्या वामणाच्या पत्र्याखाली साहित्य आणि चित्रपट क्षेत्रांतली किती तरी मंडळी येऊन, राहून गेली.

मला नेहमी वाटते की अण्णांनी पंचक्रोशी ओलांडली नसती तर आम्ही सर्वच भावंडे कुठे तरी प्राथमिक शाळेतील शिक्षक किंवा व्हिलेज पोस्टमन किंवा पोलिस किंवा तलाठी नाही तर किराणामालाचे दुकानदार झालो असतो !

अण्णा कुटुंबातले मोठे आहेत, आणि ही वाट्याला आलेली भूमिका ते फार जबाबदारीने, फार अभिमानाने पार पाडतात. कधी कधी, वाट्याला आलेल्या ह्या भूमिकेबद्दल ते तक्रारही करतात, नाही असे नाही. मधला भाऊ म्हणून ते मला म्हणतात—हा आमचा तात्या, लोण्यातला पावटा आहे. ह्याचा एवढासा छापील संसार सोडला तर ह्याच्यावर जबाबदारीच नाही. पण अण्णा कधी मधला किंवा धाकटा भाऊ झालेच नसते. ते जन्मजात वडील बंधू आहेत. त्यांच्यावर मोठेपणाची जबाबदारी टाकली नाही, तर त्यांना करमायचे नाही. मोठे हा हुद्दा ते अभिमानाने, सांबर शिंगे वागवतो तसा वागवतात आणि त्यांच्या वागवण्यामुळे हा हुद्दाही अगदी सार्थ होतो.

कितीतरी वर्षे झाली. वीसबावीस तरी असतील. जेव्हा कशात काहीच नव्हते तेव्हाची गोष्ट. आमच्या दुष्काळी गावातून पूर्वेकडे, माळावर जाणाऱ्या पाऊलवाटेने आम्ही भाऊ चाललो होतो. गावापासून अर्धा-पाऊण मैल दूर, अगदी फोड्यामाळावर खंडोबाचे देऊळ आहे. गावी आले की कुलदेवतेचे दर्शन घ्यायचे हा अण्णांचा रिवाज आहे. संध्याकाळ झाली होती. आणि आम्ही देवळाकडे निघालो होतो.

अण्णा म्हणाले :

" अरे मला वाटतं की ह्या गावी आपण खूप जमीन घ्यावी. विहिरी खोदाव्या, गुरंढोरं घ्यावी. फळांच्या बागा कराव्या. अन्नधान्याची रेलचेल होईल एवढे पिकवावे. सगळे कुटुंब तृप्त, सुखी व्हावे. शरदबाबूंच्या कादंबरीतून रंगवलेली ती खानदान बंगाली जमीनदाराची कुटुंबे असतात ना तसे आपले कुटुंब व्हावे. "

स्वभावतः मी सावधबुद्धीचा माणूस. सारासार विचार नित्य असतोच. मला वाटे, किती आडवळणी हे गाव. इथे ना पाणी, ना वीज, ना रेल्वे, ना रस्ते. इथे होऊन होऊन काय होणार ?

पण अण्णा असे काही बोलू लागले की इतक्या विश्वासाने बोलतात की ते म्हणतात ते होणे ही अगदी नैसर्गिक गोष्ट असे वाटू लागते.

तरी पण सावधपणे मी काही बोलून जातोच. मग अण्णा थोडे स्तब्ध होतात. वेगळयाच आवाजानं म्हणतात :

" अरे, इतकं तरी होईल असं वाटलं होतं का ? जरा मागं वळून बघ, मग पुढेही होणार नाही कशावरून ? आपण काय वाईट बुद्धी ठेवलीय, म्हणून आपले भले होणार नाही ? "

मला पुष्कळदा वाटते की, आयुष्यात इतके टक्केटोणपे खाऊन ही श्रद्धा ह्यांना कशी बरे जपता आली ? अंबाबाईचा अंगारा लावला की नातवंडाचा ताप उतरेल अशी आमच्या आईची जशी ठाम समजूत असते तशीच अण्णाचीही असते की आपण पापबुद्धी ठेवली नाही तर आपले चोहो अंगांनी कल्याणच होईल !

अण्णा मनाने धार्मिक आहेत. सुरेख पितांबर नेसून करंडीभर फुलांनी रोज देवपूजा करावी, मोठमोठ्याने स्तोत्रे म्हणावी, रोज ज्ञानेश्वरी वाचावी असे त्यांचे चालू असते. गणेश चतुर्थीला घरी ब्रह्मवृन्दांचा मेळावा बोलावून मंत्रघोष झालेला त्यांना मनापासून आवडतो. सण-समारंभ दणक्याने व्हावेत, पंगती उठाव्यात, पाहुण्यारावळयांची, इष्टमित्रांची घरात गर्दी उडावी ह्यात त्यांना आनंद, आनंद असतो.

माडगूळला आमच्या रानातील पाचखणी इमारतीत राहण्यात त्यांना सुख असते. मग ते कधी तरी विलक्षण श्रद्धेने म्हणतात,

" तात्या, मला वाटते ह्या ठिकाणी पूर्वी यज्ञ वगैरे झाले असतील. त्याशिवाय एवढी प्रसन्नता ह्या जागी नांदायची नाही. "

परवा आम्ही सारे मराठवाडा साहित्य संमेलनाच्या निमित्तानं लातूरला गेलो तर आपण आता तुळजाभवानीचे दर्शन घेतल्यावाचून परत जायचे नाही असा निश्चय अण्णांनी जाहीर केला. आम्ही म्हणालो, " अण्णा, उशीर होईल. ग्रामस्थ लोक तुम्हाला तसे सोडणार नाहीत. "

" छे रे फक्त दर्शन घ्यायचं आणि निघायचं. ग्रामस्थांना काही पत्ता लागणार नाही. "

त्या घाईघर्दीत अण्णांनी देवदर्शन केलेच.

भवानीचा एक चांदीचा टाक आपण खरेदी केला, एक मला घेऊन दिला आणि बजावले, " नुसता ' क्युरिओ ' म्हणून ठेवू नकोस. देव्हाऱ्यात ठेव ! "

आम्हाला धास्ती होती ते झालेच. गावात बातमी पसरली. ग्रामस्थमंडळी जमा झाली. त्यांनी सभा घेतली, भाषणे केली, करवली. हारतुरे चहापाणी सर्व झाले. परस्पर माडगुळला जाण्याचा बेत अण्णांना रहीत करावा लागला. पुण्याला पोचायला चांगली रात्र झाली !

उद्योगधंद्यांच्या निमित्ताने अण्णा नेहमीच कुटुंबापासून दूर असत. आजही ही स्थिती फारशी बदललेली नाही. पुण्यातल्या ' पंचवटी'तसुद्धा त्यांचा निवास कमीच असतो. बहुधा ते एकटेच मुंबईला असतात, मुंबईला नसले तर नागपूरला गेलेले असतात. नागपूरहून आले की सांगलीला जातात आणि सांगलीहून आले की लगेच त्यांना ग्वाल्हेरला जायचे असते.

पुण्यात आल्यापासून मी नेहमी त्यांच्या शेजारी घर पाही. बावन्न साली ते जिमखान्यावर होते. मी एरंडवण्याला घर पाहिले. नंतर त्यांनी अकरा मुंबई रोडला बंगला घेतला तेव्हा मी दहा मुंबई रोडला राहू लागलो. एका गावात असून अण्णाची पंधरापंधरा दिवस गाठभेटसुद्धा होत नाही. असा प्रसंग नको म्हणून मी बरीच वर्षे ही खटपट केली. आता आम्हा दोघांची घरे दोन टोकाला झाली आहेत. त्यामुळे खो खो सारखा चालू असतो. कधी कधी महिना दीड महिना असा जातो की गाठ पडली नाही. बोलणे झाले नाही.

परवा होते, म्हणून आज जावे तर ते सकाळीच नासिकला गेलेले असतात. यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्याला होणाऱ्या समारंभाचे निमंत्रण मला पोस्टाने

थोरल्या लेकाकडे राहून मग माझ्याकडे येते.

रात्री निजानीज झाली म्हणजे माझ्या उशाशी येऊन बसते – तिला आता काही खास बोलायचे हे मला कळते.

" अरे, त्या जिवाला उसंत नाही रे. मला बघ गेल्या खेपेपेक्षा थकलेला दिसला. केस कसे पिकले त्याचे ? ( हिचे वय आता बहात्तर आहे ) किती ओढावं त्या एकट्या जिवानं. त्याला थोडी विश्रांती देत जा. कसले तुम्ही भाऊ !"

यावर मी हसून काहीबाही विनोद करून आईची काळजी जावी अशी खटपट करतो. पण मनोमनी ठरवतो की अण्णांना आता म्हणायचे, अण्णा तुम्ही वर्षातून दोन महिने माडगूळला जाऊन राहा. आता तुम्ही कटाक्षानें विश्रांती घेतली पाहिजे. प्रकृतीला जपलं पाहिजे. आता तुम्हाला एवढी दगदग झेपत नाही.

असे मी ठरवतो. पण त्याच वेळी मला हेही माहीत असते की अण्णा सगळे ऐकून घेऊन म्हणतील—

" तात्या, अरे, मला काम करीत राहिलं पाहिजे, आणखी काही वर्षं. मग पुढं आहे सगळी विश्रांतीच. तेव्हा मग करायचं लेखन-वाचन .... आपल्या मनासारखं. "

विद्या वहिनीचे ' कवि ', सात मुलांचे पपा, आईचा मोठा मुलगा, आम्हा चार भावांचे वडील बंधू, आक्का, लीलाचे माहेर ह्या नात्यापलीकडे, आणखी एक नाते सगळ्या कुटुंबाचे आणि अण्णांचे आहे. माणदेशातील लहान शेतकरी आणि आभाळातील काळेनिळे मेघ ह्यांचे असते तसे.

त्याने ह्या दिशेला वळावे, बरसावे यासाठी सालोसाल वाट बघायची, बरसला की संतुष्ट व्हायचे. नाही बरसला की कष्टी, हिरमुसले व्हायचे. म्हणायचे ह्या साली बाबाने डोळे वटारले.

त्याच्याविषयी बोलताना आदरयुक्त दरारा असतो. भीती असते. असाह्यतेची जाणीव असते पण शेवटी थंडावा, बहार, फळे, फुले हे तो असला तरच, ही जाणीव वेढून राहिलेली असते.

त्याने कुठे तरी दूर असायचे आणि सर्वांनी कधी वळेल, कधी बरसेल म्हणून वाट बघत राहायचे. वरचेवर डोळे त्याच्या दिशेला वळवायचे.

आणि बरसला की आनंदाने न्हाऊन जायचे !

# १

# शिकारीचा छंद

मी तसा छांदिष्टच माणूस आहे. जनलोकातून थोडे बाजूलाच असावे, काही नाद लावून घ्यावा आणि त्याचा पाठपुरावा करीत राहावे, ह्यात मला विशेष आनंद वाटतो. हा छांदिष्टपणा माझ्यात कोठून, कसा आला ? आमच्या कुटुंबात तर असे कोणी दिसत नाही. आम्ही एकूण सात भावंडे आहोत. पण माझ्याप्रमाणे छंदामागे जाणारे कोणी नाही. वडील, आजोबा, चुलते ह्यांपैकी कोणी असे नव्हते असे ऐकतो. तात्पर्य, हे काही आनुवंशिक नाही.

शिकार हा छंद फार खर्चिक समजला जातो, आणि आहेही. राजेरजवाडे, सरदारजहागीरदार ह्यांनाच हा छंद परवडतो आणि शोभतो. किंवा वैदू, कातकरी, फासेपारधी, रामोशी अशा लोकांना. ‘ शिकार आणि भिकार ’ अशी म्हणच आहे. जन्माने ह्यापैकी कोणत्याही जमातीत मी बसत नाही; कर्माने मात्र बसतो. केवळ कुतूहलापोटी एकवार भृगुसंहितेतील माझ्या वाट्याचे भविष्य पाहिले होते. त्यात भृगु सांगतात—‘ विप्रकुळात जन्मलेला हा बालक अभक्ष्य भक्षील आणि अपेयपान करील. गेल्या जन्मी हा क्षत्रिय होता. ऋषीने पाळलेल्या हरिणाचा ह्याच्या हातून वध झाला. त्यामुळे शाप मिळालेला आहे, की तू विप्रकुलात जन्म घेशील पण तुझ्या हातून विप्रकर्म होणार नाही, हिंसाकर्म होईल. ’ ( भृगुसंहिता : फ. खं., पा. १५४ व ९२ ). म्हणजे मी शिकारी होईन

हे सटवाईनेच माझ्या कपाळावर लिहिले आहे.

आता, हा नाद लागण्यासाठी बाह्य परिस्थिती कोणती कारण झाली ?

जन्माने मध्यमवर्गातला पण आर्थिक दृष्टया मी मागासलेल्या वर्गापैकीच होतो. आठबाराशे वस्तीच्या आमच्या लहान संस्थानी खेड्यात माझ्या घराला लागून रामोसवाडा होता. रामोशी हे तसे आदिवासीच, डोंगराजंगलाऐवजी गावात घरे करून राहिलेले, एवढाच फरक. गोफण, कुऱ्हाड, गलोली ही हत्यारे वापरून शिकार करणे ह्यात त्यांना आनंद. कमरेला गुडघ्याच्याही वर असे गोल धोतराचे फडके गुंडाळून, अंगात काहीही न घालता, तिरकमठ्या-सारख्या गलोलीने धडाधड होले, पारवे, चित्र, पकुर्ड्या टिपणारा एक भाऊ रामोशी माझा लहानपणीचा हीरो होता. त्याच्यापाशी जुनीपानी एक ठासणीची बंदूकही होती. तिने तो माळावरची हरणे रांगत जाऊन मारीत असे. हरणे टप्प्यात यावीत म्हणून हा हुशार माणूस नाना युक्त्या करी. डोक्याभोवती तरवडाचे डहाळे बांधून, भुईसपाट असा सरपटत अनेक यार्ड जाई.

ईश्वरा, गोंदा, बापू ही रामोश्याची मुले; अकबऱ्या, अब्दुल्या ही मुलाण्याची पोरे; महाराचा लखू, मांगाचा मार्तंडा हे माझे खेळगडी होते. शेरडे-गुरे राखण्यासाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत रानामाळातून हिंडणे हा त्यांचा व्यवसायच होता. त्यांच्या मागोमाग मीही रानात जात असे. गुरेशेरडे चरणी लावल्यावर पांढऱ्या होल्यांची बाभळीच्या झाडाझुडपातली कोटी तपास, लिंब-पिंपळाच्या ढोलीत राघूच्या पिलांसाठी हात घाल, नेपती-बोराटी लागलेली मधाची पोळी काढ, तालीतून असलेल्या बिळात घोरपड आहे का ते बघ, ओढ्यात हिंडून धोतराने मासे झोळ, हेच त्यांचे उद्योग असत. आणि त्यात मी आनंदाने सामील होत असे. रूक्ष माणदेशातील ह्या भागात डोंगर, जंगल असे नव्हते, पण लांबच लांब पसरलेला माळ होता. थोडे दूर डबईचे कुरण होते. त्याहीपेक्षा दूर लोटेवाडीला सातारच्या महाराजांचे राखीव कुरण होते. लांडगे, खोकडे, घोरपडी असले प्राणी माळाला राहात आणि ससे, हरणे कुरणात मिळत. ढोक, पकुर्ड्या, लावे, होले यांसारखी पाखरेही त्या काळी बरीच दिसत.

वर्षातून एकदोन दिवस सगळ्या गावानेच शिकारीला जाण्याचा प्रघात होता. आषाढ-श्रावण महिन्यात बैलांचा सण 'बेंदूर' झाल्यावर दुसरे दिवशी,

आणि श्रावणात नागपंचमीच्या दुसरे दिवशी—अशी दोनदा ही सामुदायिक शिकार असे. आधल्या दिवशीच्या शिळ्या पोळ्या आणि भजी बांधून घेऊन, मोठ्या माणसांबरोबर, पायीपायीच आम्ही ह्या शिकारीसाठी डबईच्या कुरणात किंवा लोटेवाडीच्या कुरणात जात असू. मोठ्या माणसांनी आपली शिकारी कुत्री आणि काठ्या, कुऱ्हाडी, भाले बरोबर घेतलेले असत. निदान आम्हा पोरांपुरता तरी शिकार थोडी, सहल जास्त असा हा प्रकार असे. दिवसभर कुरणात लोकांचा आणि कुत्र्यांचा धुमाकूळ चाले. रान धरून झाडझाडोऱ्यातून लोक धोंडे फेकत, हां हूं ओरडत. होता होता एखादे हरण उठे, एखादा ससा उठे. गेलं, गेलं, गेलं; आलं, आलं, आलं असा गलगा होई. काठ्या-कुऱ्हाडी वर करून लोक धावत, कुत्री धावत. शिट्या, आरोळ्या, शिव्या आणि धावपळ ह्यांचा एकच गदारोळ होई. आमच्या गावाप्रमाणेच इतर गावांतील मंडळीही कुरणाच्या ह्याच भागात शिकारीसाठी आलेली असत. ह्या ना त्या कारणावरून त्यांच्याशी तक्रारी होत, थोडीफार दंगलही होई.

चालून चालून आम्हा पोरांचा पिट्टा पडे. उन्हाने तोंडे करपून जात. उघड्या रानातला वारा अंगे बडवून काढी. अनवाणी पायात काटेकुटे मोडत. कुठंतरी उंचावर बसून आम्ही हा सर्व खेळ बघत असू. कारण, मधे येऊन तुम्ही खेळात घाण कराल अशी थोरांची धमकी असे. बसून कंटाळा आला की ओढ्या-ओघळी गाठून वाळूत झरे उकरायचे, सर्वांनी एकत्र बसून बरोबर आणलेली शिदोरी खायची, सावलीला लोळायचे, नाहीतर कुठे लेंडी जांभळे मिळतात का—कुठं पिकली उंबरं, भोकरं, गोदंजी दिसतात का ह्यासाठी भटकायचे, असे चाले.

ह्या शिकारीत गावकऱ्यांना कधी एखादे हरण तर कधी फक्त दोनचार ससे मिळत. कधी लांडगा, कोल्हा, खोकड मिळे. ही शिकार काठ्यांना बांधून दिवस गाजवीत, सगळा समुदाय दमूनभागून भुकेल्या पोटाने आणि थकल्या शरीराने परत फिरे. गाव यायला चांगली संध्याकाळ होई. सगळा घोळका वेशीशी पोचला की तिथेच थांबून, गुरवाला आणि वाजंत्रीवाल्या होलारांना निरोप जाई. पिपाणी–डफडे घेऊन होलार मंडळी येत. रणशिंग घेऊन गुरव येई. तू ऽतू ऽ तू ऽऽ असा रणशिंगाचा नाद होताच डफडे घाईने वाजू लागे

पिपाणी फुंकली जाई आणि मग वाजतगाजत, मोठ्या आवेशाने आणि अभिमानाने शिकार गाववेस ओलांडून आत येई.

हरण, ससा असल्या शिकारीचा रवा वतनदाराच्या घरी पोचवला जाई.

कुलकर्णी, जोशी यांच्या घरापुढे चौगुला आवाज देई.

" शिकार आली हो आण्णा —"

डोक्यावर पागोटे गडबडीने ठेवीत आण्णा दरवाज्यात येऊन म्हणत, " पावली, पावली. काय मिळालं ? "

" हरण मिळालं हरण औंदा. "

" शाबास, शाबास ! "

आठ घरांतल्या जोशी–कुलकर्ण्यांचे रवे रामोश्याच्याच पितळीत पडत.

शिकार केलेल्या प्राण्याची शेपटे, वेशीतील मोठ्या कडूनिंबाच्या झाडाला टांगून ठेवली जात. तिथे वाऱ्यापावसात ही शेपटे काही महिने हलत भिजत राहात. आल्यागेल्याला बघायला मिळत. पुढे केव्हातरी ती झिजून झडून जात आणि काथ्याच्या नुसत्या दोऱ्याच लोंबत राहात.

शिकारीच्या गप्पाही वाऱ्यावर विरून जात. आणि लोक रोजच्या व्यापात रानामाळातल्या कामात व्यग्र होऊन जात.

माझी शिकारीची आवड ह्या वार्षिक उत्सवामधून जोपासली गेली. एरवीही आम्हा पोरांना गावाभोवतालची काळी राने आणि माळराने, ओढेताली आणि काटवने मोकळी होतीच. गावची शिकार संपली तरी आमची सुरूच राही.

वार्षिक शिकारीशिवाय, गावात लहानसान असे काही प्रसंग वारंवार घडत.

कधी फासेपारधी, कधी कधी नंदीवाले, कधी वैदू, कधी बेलदार असे भटके लोक तट्टे, गाढवे, गाई ह्यांवर आपली पोरेबाळे, कोंबडी, घरसंसार लादून आमच्या गावी सुगीला येत आणि ओढ्यापलीकडच्या पडीक रानात त्यांची चार-सहा पाले पडत.

वैदूच्या जवळ शेपूट तोडलेली, डागलेली कुत्री असत. ही कुलंगी कुत्री सोडून वैदू लोक गावाभोवतालच्या निवडुंगाच्या बनातली मांजरे, मुंगसे हुसकत आणि शिकारीची मोठी धामधूम उडवून देत.

फासेपारधी गावात भीक मागत आणि रानात फासे लावून लावे, चितूर, पकुर्ड्या असली पाखरे पकडत. आपली गाय फासे घेऊन एखादा मेदवाऱ्या

नावाचा फासेपारधी रानात निघाला की मीही त्याच्या मागे जात असे. पारधी चितुरासाठी जागा कशी हेरतो, फासा कसा लावतो, गळयात अडकवलेली चिव्याची शिट्टी वाजवून बरोबर चितुरासारखा आवाज कसा काढतो, हा कोण मला आव्हान देतो आहे याची चौकशी करण्यासाठी अडचणीत दडलेला चितूर मोकळयावर येऊन बघू लागताच मेदवान्या आपल्या चरणान्या गाईच्या आड दडून किती हुशारीने त्याच्याजवळ जातो, बारीक खडे फेकून त्याला कसा चाळवतो आणि नेमका फाशाशी आणतो, हे सगळे मला बघायला मिळे.

बेलदार लोक ओढ्याकाठची झाडे हेरून त्यांच्या बुंध्याला जाळी लावत आणि तोंडाने खारीसारखे ओरडून त्यांना बोलावत. बापड्या खारी फसत आणि बेलदाराच्या फाशात सापडून, रात्री बेलदारणीने उघड्यावर मांडलेल्या तीन दगडांच्या चुलीवरच्या तव्यावर जात.

झाडावरच्या खारी, निवडुंगातली मांजरे आणि मुंगसे, माळावरची खोकडे, ओढ्याकाठचे चितूर, तालीतल्या घोरपडी, विहिरीतली पारवळे, नदीकाठचे ढोक, तळयाकाठच्या पकुर्ड्या, सुगीच्या दिवसांत करड्याच्या पिकावर येणाऱ्या कांड्याकरकोच्या—ह्या सर्वांची शिकार गावच्या रामोश्यांकडून आणि भटक्या लोकांकडून होताना मी पाहात होतो आणि वनविद्या शिकत होतो.

मला चांगले आठवते—फार लहानपणापासून माझी एक महत्त्वाकांक्षा होती. आपण एक बंदूक, एक दुर्बिण आणि एक कॅमेरा मिळवायचाच. ह्या वस्तू हाती पडल्यावर आपण काय काय करू याची केवळ कल्पनाचित्रे रंगवूनच मी आनंद घेत असे.

बाळपण संपतासंपताच मी लहानसान उद्योग करून चारदोन रुपये कमवू लागलो; आणि ऐन विशी-बाविशीत एक उत्तम बंदूक मी घेतली. ( ‘ललित’चे संपादक रा. रा. कोठावळे यांना प्रकाशनासाठी एक पुस्तक देऊन, बंदुकीच्या किंमतीपैकी पाव रक्कम मी उभी केली होती, हे आजही आठवते. ) कॅमेरा घेण्यासाठी फार वाट बघावी लागली नाही. दुर्बिण हाती यायला मात्र वयाची पन्नाशी उजाडली. असो.

बावन्नपासून सत्तरसालपर्यंत माझ्या हाती बंदूक होती. मी काही निष्णात शिकारी झालो नाही आणि मोठमोठ्या शिकारी केल्या नाहीत; पण माझ्या-

सारख्या चाकरमान्या माणसाने इतर सारे उद्योग सांभाळून जेवढा नाद करणे शक्य होते तेवढा केला, आणि रानावनात हिंडण्याचा आनंद उपभोगला. ह्या काळातले अनुभव मी वेळोवेळी लिहिलेले आहेत. माझ्या ‘ वाघाच्या मागावर’ ह्या पुस्तकात ते आले आहेत. इतर कथासंग्रहांतूनही आले आहेत.

बुध्याळच्या तळ्याहून एकवार मी परत येत होतो. संध्याकाळची वेळ झालेली होती. उन्हे उतरली होती. आणि चोपडी गाव सोडताच भुईमूगाच्या शेंगांच्या हिरव्यागार रानात दोन काळे क्रौंच पक्षी चरताना दिसले. लांब, वळलेली चोच, तांबडे पाय, खांद्यावर पांढरा ठिपका आणि माथ्यावर तांबडा त्रिकोणी ठिपका. दोन्हीही नर-मादी चरण्याच्या नादात होती. मी बैलगाडीतून चाललो होतो. दोन्ही बाजूला शेंगांची राने आणि मधून जाणारी तांबडी वाट.

गाडीत बसलेली रामोश्यांची दोन मुले म्हणाली—

“ तात्या, ढोक नेटात आल्यात, मारता का ? ”

गाडीत बसल्याबसल्याच मी एकावर आवाज टाकला. चरता चरता नर-पक्षी पडला, पंखे फडफडवून शांत झाला. आवाजासरशी मादी उडाली, दूर न जाता जोडीदाराभोवती घिरट्या घेत करुण ओरडत राहिली.

एकाएकी हा कोलमडून का पडला, उठत का नाही, आपल्या हाकेला प्रतिसाद का देत नाही ?

जणू त्याला उठवण्यासाठी आधार द्यावा इतक्या जवळ येऊन ती पुन्हा पुन्हा ओरडत होती, घिरट्या घालत होती.

तो उठत नाही हे ध्यानी येतांच आणि रामोश्याच्या पोरांनी धावपळ करून पायाला धरून त्याला गाडीकडे घेऊन येताच मादी निळ्या आभाळातून ओरडत ओरडत दूरच्या एका चिंचेच्या झाडावर गेली. उंच अशा डहाळीवर एकाकी बसून राहिली.

मला खिन्न वाटले.

मुळशी धरणाच्या दिशेने, रात्री ससे मिळतात का म्हणून जीपने गेलो आणि ध्यानीमनी नसताना एक भेकर जीपपुढून आडवे पळत गेले. डोंगर चढले आणि क्षणभर थांबून, मान वळवून बघत राहिले.

क्षणार्धात मी बार टाकला. जीपमध्ये माझे बागाईतदार मित्र निंबाळकर होते. जीपखाली उतरून ते भेकर घेऊन आले आणि म्हणाले,

" अरारा, भाऊसाब गर्भिणी हाये हो ! "

कोथरूडला निंबाळकरांच्या बागेत रात्री दोनच्या पुढे आम्ही भेकर सोलत असताना, पुरी वाढ झालेले पोर तिच्या पोटातून बाहेर काढलेलं पाहून, निंबाळकरांची म्हातारी आई कळवळून म्हणाली,

" अरं लेकरानू का सराप घेतला रे हा- ! "

अशा प्रसंगांची माळ मला सांगता येईल. पण अशा प्रसंगांमुळे बंदूक टाकून मी दुर्बिण हाती घेतली, असे म्हणता येणार नाही. मी मनाने वाढलो आणि हे आपोआप झाले. अवखळ असे वय सोडले तर कोणता चांगला माणूस आपल्या सरावानं जिवंत राहण्याचा अधिकार असलेल्या कोणाही वन्य प्राण्याचा खून करण्याची इच्छा धरील ?

माझे सन्मित्र जयंतराव टिळक यांच्या सोबतीने मी सिंहगडच्या जंगलात भटकलो. मुळशी धरणापलीकडचे जंगल हिंडलो. पुण्याच्या परिसरातले डोंगर वेंघलो, कर्नाटकातल्या दड्डीकेरी, कोंडणकेरी, गुंजावती, मासूर ह्या राखीव जंगलांत शिकारी केल्या, आणि मुख्य म्हणजे जंगल पाहिले. निसर्गाचा हा आदिअंत नसलेला विशाल ग्रंथ मी पाहिला आणि त्यातली चार अक्षरे मला ओळखता येऊ लागली.

ही अक्षरओळख झाली आणि लवकरच पशुपक्षी मारण्यातला आनंद नाहीसा झाला. त्याच्याविषयीचे कुतूहल, जिव्हाळा एवढेच उरले. बंदुकी-ऐवजी दुर्बिण आणि रेखनचित्राची वही घेऊन रानात जाणे मला जास्ती आनंदाचे वाटू लागले. मला वाटते, हरेक सुसंस्कृत शिकारी ह्याच इयत्ता चढत पदवीपर्यंत जातो. आता मी शपथपूर्वक सांगू शकेन की, समोर कांचन-मृगांचा डौलदार कळप बघितल्यावर मला घरी टांगलेल्या बंदुकीची आठवण-सुद्धा होत नाही.

मला काही मृगपक्षी-शास्त्रवेत्ता व्हायचे नाही. किंवा वनशास्त्र अभ्यासायचे नाही. पण ह्या अद्भुत जगाविषयी मला अपार कुतूहल आहे; आणि ते कधीही संपणार नाही. त्यामागे लागून वनवासी व्हावे, असे माझ्या हल्ली फार मनात येते.

# १०

## पारधी

सुगीचे दिवस साधून परदेशी पाखरांची जोडी यावी तशी फासेपारध्यांची दोन पाले एके दिवशी आमच्या गावाच्या काळ्या रानात येऊन उतरली तेव्हा मला वाटले, बरे झाले, सोबत आली!

सोबत म्हणण्याचे कारण, सुटी घेऊन मी गावी आलो होतो आणि माझा मुक्काम रानातल्या पत्र्यात होता. फिरतीवर आलेल्या प्रांताचा मुक्काम पडावा तसा माझा मुक्काम रानात पडला होता, पण सुगीची धांदल असल्यामुळे पत्र्याकडे येऊन घटकाभर माझ्याशी बोलायलासुद्धा मंडळींना फुरसत नव्हती दिवसरात्र मी एकटाच रानात राहात होतो, असला तर एखादा रामोशी रखवालदार सोबतीला असे. एरवी माझी एकच वस्ती त्या बाजूला होती, साहजिकच सोबत पाहिजे होती, ती आली, मला बरे वाटले.

पाखरे उतरावीत तशी पारध्यांची पाले काळ्या रानात उतरली. घोड्याप्रमाणे पावंडावर चालणाऱ्या त्यांच्या चार गाई रानात हिंडू लागल्या, लेकुरवाळ्या कोंबड्या पालाभोवती फिरू लागल्या, अंगावर काहीही कपडे न घातलेली पारध्याची पोरे, झिंज्या आवरीत धावू लागली, कुशल चित्रकाराने रंगविलेल्या निसर्गचित्राप्रमाणे माझ्या झोपडीच्या चौकटीतून हे दृश्य दिसत होते. काळ्या रानातली पांढरी पाले, पलीकडे बाजरीच्या पिकाने हिरवीगार झालेली

राने, त्याही पलीकडे ओढ्याकाठची उंच झाडे आणि त्यापलीकडे निळेभोर आकाश!

दोन पोरे पाण्याचे भांडे घेऊन झोपडीमागे असलेल्या आमच्या विहिरीचे पाणी नेण्यासाठी आली. एक पोर विहिरीत उतरले, दुसरे विहिरीच्या भोवती हिंडू लागले. हिंडता हिंडता त्याच्या बारीक नजरेला पारव्याची दोन पंखे पडली. दुसरे पोर विहिरीबाहेर पडल्यावर त्याला ती पंखे उचलून दाखवीत पहिले पोर म्हणाले—

"विहिरीत पारवे आहेत, रात्री जाळी लावू."

पोरे आपल्या भाषेत बोलली पण मला आशय कळला. चट्दिशी उठून मी बाहेर आलो,

"अरे, मुलांनो, विहिरीतले पारवे धरायचे नाहीत हं, मार मिळेल."

पावाच्या विहिरीत पारव्याच्या दोन जोड्या वस्तीला होत्या, पारध्याप्रमाणे तीसुद्धा सोबत होती, शिवाय अलीकडे काही वर्षांत फासेपारधी, गाढवी सोनार, रोहिले यांसारख्या भटक्या लोकांनी गावातल्या पारव्यांचा, लाव्ह्या-चितुरांचा पार बीमोड केला होता. झाडावरच्या खारी, ओढ्याकाठच्या गाडीतील मुंगसे, फार काय सांगावे, गावातील मांजरेसुद्धा त्यांनी संपवीत आणली होती.

मी ताकीद दिली तेव्हा पोरे 'नाही दादा, नाही पाटील' म्हणाली. मागे बघत बघत पालांकडे निघून गेली.

काही मागायला सवरायला म्हणून पारधी माझ्या झोपडीकडे येतील अशी माझी कल्पना होती, पण तिसरा प्रहरपर्यंत कुणीही झोपडीकडे फिरकले नाही. मग मीच उंबऱ्यात उभे राहून हात वर केला आणि पारध्यांना बोलावले.

वीस एक वर्षांचे एक तरणे वांड पोर व पन्नाशीच्या घरात गेलेला एक बुटका गडी असे दोघेजण आले आणि अदबीने झोपडीबाहेर उभे राहिले.

झोपडीतील टेबलखुर्च्या, कॉट, मच्छरदाणी, दोन बंदुका हे इकडच्या भागात सहसा न दिसणारे साहित्य पाहून पारधी दबकले होते. रामराम घालून ते गप उभे राहिले.

मी विचारले,

"कोण लोक रे तुम्ही?"

वयाने झालेला पारधी हेल काढून उत्तरला,

" पाटील, आम्ही पारधी, राजपारधी. "

राजपारधी, भिल्लापारधी, हरिणपारधी असे प्रकार पारध्यांत असतात हे मला ऐकून ठाऊक होते.

" नाव काय तुझं ? "

" माझं नाव मिठू शिपाई. "

शिपाई हा पेशा आहे. हे मला ठाऊक होते, पण ते नावसुद्धा असू शकते याचा पत्ता नव्हता.

" आणि याचे ? "

" हा माझा पुतण्या आहे, याचं नाव रमजान. "

एकाने पेशाचे नाव घेतलेले तर दुसऱ्याचे हिंदू असून मुसलमानी नाव हौसेने ठेवलेले. आडनावाची चौकशी केली तेव्हा ते भोसले आहे असे कळले! नाव रमजान आणि आडनाव भोसले. रमजानच्या बापाचे नाव होते फाकत्या. रमजान फाकत्या भोसले, या नावात तुम्हां-आम्हांला विनोद दिसेल. पारध्यांना त्यात काही वावगे मुळीच दिसले नव्हते. नाव विचारले; गाव विचारण्याची सोय नव्हती. भटकीच जमात ती. रानचा मेवा खात दाही दिशांना हिंडणारी. गाव नाही, घर नाही, जमीन नाही, जुमला नाही.

" दोन पाले कुणाची ? "

सगळे तपशिलवार सांगायचे ते उभ्या-उभ्याने कसे सांगता येणार म्हणून मिठू शिपाई दोन पायांवर बसला. दोन पिसे पाहून त्याच्या मुलाने ज्याप्रमाणे या विहिरीत पारध्यांची वस्ती आहे, हे ओळखले होते, तसेच माझ्या दोन शब्दांवरून, इथे अघळपघळ बोलायला हरकत नाही असे मिठूने ओळखले असावे. उंबऱ्याला लागून ते दोघेही चुलतेपुतणे खाली बसले. मिठू शिपाई सांगू लागला,

" ही दोन माझ्या भावाची, फाकत्याची पोरे. हा रमजा, आन् दुसरा धाकटा मेदवाऱ्या. फाकत्या मेला, त्येची बायकूबी मेली. मंग पोरांनी कुठं हिंडावं, म्हणून ती माज्या बरुबर ऱ्हात्यात. ह्यंचे लगीन दोन सालामागं झालं, आमी दोनशे रुपये देऊन पोरगी केली पर पोरीच्या बापाला लोभ सुटला. पोरगी माघारी नेली आन् पुन्ना दोनशे रुपयं मागू लागला. ते आमी कुठलं

देनार दादा? म्हनलं तुझी लेक तुझ्यापाशी ऱ्हाऊ दे. आमी पैका देनार नाही. आमचा पहिला पैका माघारी दे. त्येनं दिला. त्येच्यातून पोरांनी काही सामानसुमान घेतलं. दोन गाया घेतल्या. कापडं केली. आन् आता माज्या संगं असत्यात!".

इतके सविस्तर समजल्यावर विचारण्यासारखे काही विशेष राहिले नाही. एकच शंका मनात होती. ती ही की एरवी गावापासून दूर माळावर उतरणारे पारधी या खेपेला गावाच्या इतक्या शेजारी का उतरले? हाही प्रश्न मी विचारला. मिठू शिपायापाशी त्याचे असे एक कारण होते.

"पाटील, आमची जात खराब लोक म्हणून नाव मिळवलेली. आम्ही गावाबाहेर लांब राहिलो आन् तुमच्यासारख्याच्या रानातला काही जिन्नस नाहीसा झाला तर पहिली पाळी आम्हांवर. आम्ही नेलेलं असू नसू पर पाटलानं आम्हाला धरून नियाचं, चार काठ्या आमच्या अंगावर ओढायच्या. इळभर धरून चावडीत बसवायचं. म्हणून आम्ही गावाशेजारीच ऱ्हातो. कुनीबी नजर ठेवावी, पालाच्या झडत्या घ्याव्यात."

मिठूने गावाशेजारी राहण्याचे हे कारण दिले ते खोटे म्हणता येणार नाही आता ही मंडळी इथे माझ्या रानात आली आहेत. उद्या जर रानातली वैरण, किंवा धान्य गेले तर प्रथम मला शंका येणार ती पारध्यांचीच. मार ठोक मी केली असती का नाही, हा भाग वेगळा, पण वहीम आला असता तो पारध्यांचाच.

मिठूचा पुतण्या रमजा इतका वेळ हांहूं करीत होता. चुलत्याच्या बोलण्याला टेकू देत होता. त्याचे लक्ष सारखे खुंटीला अडकविलेल्या बंदुकांकडे होते. भीड चेपली तसा तो म्हणाला,

" पाटील, तुम्हीबी शिकार करता?"

"करतो तर. अरे आता ज्याचा धंदा त्याने करावा असे कुठे राहिले आहे? आम्हीही शिकार करतो. हरीण दाखव आम्हाला, आम्ही शिकार करू त्याची."

"हरण कुठं ऱ्हायलंय आता आपल्या देशाला? पार बुडालं! आम्ही हरणाचं फासं पाळत होतो तवा दिवा बघत नव्हतो. गावाबाहेर ऱ्हायाचो ते त्या कारनानं. दिवा बघितल्यावर फासं आंधळं होत्यात!"

पारध्याची जात आपल्या पालात दिवा कधीही लावत नाही हे मला ठाऊक होते. नेहमी फिरस्ते असल्यामुळे, रानात वस्ती असल्यामुळे दिवा लावला तरी तो वाऱ्यात टिकणार कुठे? आता कंदील निघाले. पण पूर्वी लामणदिवेच होते ते पारध्याच्या पालात टिकाव कसे धरणार? शिवाय गुन्हे करणे हाही पारध्यांचा जोडधंदा होता. गुन्हा झाला की पाळतही आलीच आणि ज्याच्यावर पाळत आहे त्याला अंधार उत्तम! या कारणानेच पारधी सदैव ब्लॅक-औट पालीत असावेत असा माझा अंदाज होता. रमजाने सांगितलेलं कारण काही मला माहीत नव्हते.

असे आम्ही बोलत बसलो होतो तेवढ्यात मिठूचा दुसरा पुतण्या धावत आला आणि दक्षिण दिशेला हात करून काही सांगू लागला. त्यासरशी मिठू उठला. कपाळावर हात घेऊन क्षितिज न्याहाळू लागला. गडबडीने मला बोलला,

"बरं तर. मी जाऊन येतो दादा."

– आणि माझ्या होकाराची वाटही न पाहता ते दोघेतिघे पारधी पालांकडे सुसाट पळाले. फासे घेऊन गाईवर स्वार झाले. एखाद्या ऐतिहासिक कादंबरी-तील स्वाराप्रमाणे काळ्या रानातून भरधाव असे दक्षिण दिशेकडे निघाले. एवढ्या तातडीने मिठू शिपाई कशावर सुटला हे मला काही समजले नाही. झोपडीबाहेर येऊन मीही हात कपाळावर घेऊन दक्षिण दिशेकडे पाहिले, पण काही दिसत नव्हते. फक्त आभाळात चारसहा काळे ठिपके दिसत होते. यमाजी पाटलाच्या वाडीकडे एखादे गूर मेले असावे आणि हे ठिपके म्हणजे त्यावर फिरणारी गिधाडे असावीत. पारधी फासे घेऊन गेले त्याअर्थी ते शिकारीवर गेले हे नक्कीच; पण कशावर गेले हे काही मला समजले नाही. कदाचित पारध्यांचा एखादा थवा कुठे उतरलेला या पोराने पाहिला असेल. किंवा लांब ओरडणाऱ्या चितुरांचा आवाज ऐकला असेल. काही तरी होते खास!

दिवस मावळायच्या सुमारास मिठू आणि त्याचे पोरांचे लेंढार आमच्या झोपडीकडे आले. मिठूच्या बायकोने गावात हिंडून धान्य मिळविले होते. नेहमी बरोबर असलेल्या जात्यावर ते दळलेही होते. ताज्या भाकरीचे तुकडे गुळाच्या

नखभर खड्याशी लावून खात खातच पोरे बापापाठीमागे आली होती. या खेपेला मिठू उंबऱ्याच्या बाहेर न बसता आत येऊन बसला. कोंबडीच्या पंखाखाली पिले बसावीत तशी त्याची पोरे त्याच्या मांडीवर, काखेतून बसली. मी विचारले,

" झाली का शिकार मिठू शिपाई ? "

आपली दाढी वाढलेली हनुवटी हलवीत मिठू म्हणाला,

" नाही दादा, मस्त खटपट केली पर गिधूड काय फाशावर आलंच नाहीत ! "

मी थोडासा चकित झालो.

" म्हणजे तू गिधाडावर गेला होतास ? "

पारध्याने मान हालवून होकार दिला. मला इतके आश्चर्य वाटते आहे हे त्याच्या ध्यानी आले नाही. मी पुन्हा खात्री करण्यासाठी विचारले,

" गिधाड खाता तुम्ही लोक ? "

पारध्याला माझा प्रश्न थोडासा भोळसटपणाचा वाटला, जणू काही मी त्याला विचारले होते, " म्हणजे तुम्ही लोक जिलबी खाता ? "

मिठू बोलला,

" गिधूड ना खायला काय झालं पाटील ? तो तर कोंबडीवाणी लागतो आन् इळभर खाल्ला तर सरत नाही. "

गुणवत्ता आणि प्रमाण दोन्हीही असे भरघोस सांगितल्यावर मी काय बोलणार ? काही बोललो असतो तर पारध्याने मलाच वेड्यात काढले असते. हिणवले असते. साहजिकच मी गप् राहिलो. पण मिठूला वाटले की, हाही शिकारी गडी आहे. याला माहिती नाही ती करून दिली पाहिजे. त्याने उलट मलाच विचारले,

" तू घुबड खाल्लेस कंदी ? "

आता या पारध्याला काय सांगावे ? ज्या पाखराचे नावसुद्धा दिवसा घेत नाहीत, त्याची चव तो मला विचारीत होता. माझा चेहरा ओशाळला आणि काही बोलण्याऐवजी मी केवळ मान हलवली.

" तुम्ही लोक खात न्हाई हे मला ठावं हाये, पर इचारावं म्हणून इचारलं. घुबड चांगला लागतो दादा. कोतमीर, मिरची लावून, उलीसं तेल टाकून

परतावा. झकास, झकास, लागतो!"

असेल बुवा! नाही कसे म्हणावे? यानंतर तुम्ही लोक आणखी काय काय खाता हे विचारण्याची ताकद माझ्यापाशी राहिली नाही. बहुधा, स्वतःची जात सोडून, पारधी चट्सारे खात असावा.

सकाळपासून मिठू पाहात होता आणि त्याला काही उमज पडत नव्हता. झोपडीतील सर्व सामानसुमानाकडे पाहून त्याने मला विचारले,

"हा सगळा साचा संगं घेऊन हिंडतोस दादा?"

प्रश्नाचा रोख चटकन् ध्यानात आला नाही, थोड्या उशिरा आला, तोवर मी होय म्हणून गेलो होतो. मला वाटले फक्त बंदुकांना उद्देशून केलेला हा प्रश्न असावा, म्हणून मी होकार दिला. पण मिठूचा भाव तो नव्हता. तो आपल्याच मापाने मलाही मोजत होता. तो जसा फासे, पाले, कोंबड्या, जाते घेऊनच या गावचे त्या गावी जातो त्याचप्रमाणे मीही हा पलंग, ही टेबल-खुर्ची, ही हत्यारेपात्यारे, ही बैठक, लोड-तक्क्या हे घेऊनच गावोगावी हिंडतो का, अशी त्याची विचारणा होती. मी सुटीत आलो आहे. एरवी इथे नसतो एवढी बातमी त्याने गावात मिळवली असावी.

मी होकार दिला तेव्हा गंभीर होऊन मिठू म्हणाला,

"समदं आनायचं तर तुमा लोकास्नी मोटार, आगीनगाडीनं आनावं लागतं. खर्चा बहु येत असल पाटील?"

मीही गंभीरपणाने म्हणालो,

"तर तर, खर्च येतोच मिठू, पण आपल्याला पाहिजेत त्या वस्तू बरोबर तर खर्च होतो म्हणून भागते का?"

मिठू म्हणाला,

"तेबी खरंच!"

मिठूचा मोटा पोरगा आठदहा वर्षांचा होता. त्याचे नाव बंदरी होते. आपल्या अर्थाने पाहावयाचे तर बंदरी म्हणजे परदेशहून समुद्रमार्गे आलेला माल, विशेषतः धान्यधुन्य. बंदरावर उतरला म्हणून तो बंदरी. राष्ट्रभाषेत बंदर म्हणजे वानर, त्यावरूनही कदाचित बंदरी झाले असावे. हे आपले माझे अर्थ. मिठूने अर्थाचा काही विचार केलेला दिसत नव्हता. मिठूचा हा थोरला मुलगा रंगाने करवंदासारखा काळाभोर होता, अंगाने सडसडीत आणि मोटा चलाख

होता. त्याने केस वाढवून त्याची वेणी पाठीवर सोडली होती. खाली माधुकरी मुलासारखी सुरेख लंगोटी ठेवून दिली होती.

मी गमतीने विचारले,

" बंदऱ्या, लंगोटी का बरं लावलीस ?"

यावर तोंडातला भाकरीचा घास गिळून, नाक सुरू सुरू वाजवीत ते पोर उत्तरले,

" जातीची देणं हाये ती पाटील. ती सोडून कशी द्यावी ?"

पारध्याने धोतर नेसता कामा नये, त्याने कमरेभोवती चार हात फडके गुंडाळणेसुद्धा योग्य नाही. म्हाताऱ्यापासून लहान पोरापर्यंत सर्वांनी लंगोटीच वापरली पाहिजे, असा जातीचा रिवाज असल्याचे मिठूने सांगितले. केस राखून वेणी पाठीवर सोडण्याची चिनी पद्धत हाही जातीतला रिवाज आहे का ? अशी मी चौकशी केली तेव्हा बंदरीचे केस हे देवाच्या नावाने राखलेले आहेत असा खुलासा झाला. देव कोणता ? तर भवानीआई ! आडनाव भोसले होते तेव्हा कुळस्वामिनी म्हणून भवानी आली यात विशेष काही नव्हते. तिच्या नावाने मुलाने पाठीवर केस सोडावेत हेही काही वावगे नव्हते.

दिवेलागणीची वेळ झाली तेव्हा रखवालदार नाईक गावातून आला. झोपडीत ही मंडळी बसलेली पाहून त्याला थोडे आश्चर्य वाटले. मला उद्देशून तो म्हणाला,

" ही पिडा कशाला आली इथं ?"

मी म्हणालो,

" मी मुद्दाम त्यांना बोलावून घेतलं आहे. मेदवाऱ्या, तू चितूर धरतोस का ?"

सळसळीत लांब मांड्या असलेले आणि अंगात एक फाटका कोट, गळयात मण्यांच्या माळा घातलेले ते बांड पोर बोलले,

" धरतो जी."

" कसा धरतोस ?"

गळयातल्या गोफात अडकवलेली एक लहान नळी ओठाला लावून मेदवाऱ्या चितुरासारखा ओरडला. रानात असे ओरडले की लपून असलेले चितूर पक्षी त्या ओरडण्याला साथ देतात. त्यांचा ठावठिकाणा कळतो. मग फास

लावायचा. त्यात दाणे टाकायचे आणि गाईपाठीमागून दडत दडत जाऊन चितुराला त्या फाशापर्यंत न्यायचे अशी चितूर पकडण्याची पद्धत त्याने प्रात्यक्षिकासहित मला करून दाखवली. कमरेच्या पिशवीतील फासही दाखवला. मी बोली केली,

" मेदवाऱ्याने एक चितूर पकडून आणून आम्हाला दाखवावा, आम्ही त्याला एक गिधाड पक्षी मारून देऊ. "

मिठू शिपायाच्या तोंडाला पाणी सुटले. तो कळवळून म्हणाला,

" दे ना दादा एक गिधूड बंदुकीने मारून. माझी लेकरंबाळं खातील ! "

नायकाने विचारले,

" अरं आम्ही दिऊ तुला पर तू काय देशील ते बोल की ! "

हाताची पाची बोटे जुळवून ती रामोश्यापुढे करीत मिठू म्हणाला,

" तुला बग, पाच आण्यांचे पैसे देईन. "

इळभर न सरणारा, कोंवडीवाणी लागणारा, एक गिधाड मिळविण्यासाठी मिठू बंदे पाच आणे द्यायला तयार होता. सुगीच्या दिवसांत पेंडीपेंडी धान्य मागून त्याने नुकतीच दहाबारा रुपयांची ज्वारी विकली होती. पारध्याने देऊ केलेली ती रक्कम ऐकून नाईक म्हणाला,

" बरा पैसेवाला दिसतोय रं तू लेका एका बंदुकीच्या गोळीला काय पडतं ते माहीत आहे का तुला ? "

बापड्या मिठूला काडतुसांचा भाव काही माहीत नव्हता. ओशाळवाणा चेहरा करून त्याने विचारले–

" काय पडतं दादा ? "

रमजाला थोडी माहिती असावी असे दिसले. त्याने परस्परच चुलत्याला गुजराथी भाषेत सांगितले—

" एका गोळीला सव्वा रुपया पडतो. "

हा भाव ऐकून मिठू चकित झाला. हात जोडून बोलला,

" इक्ता पैका आम्ही कुठनं द्यावा पाटील. "

मी म्हटले,

" तुला पैका मागतंय कोण ? तू फक्त एक चितूर आणून दे. त्याच्या बदली आम्ही तुला गिधाड देऊ ! "

"देऊ ना. चितूर रानात दिसला तर त्याला काय आम्ही सोडणार ? खट-पट करून त्याला फाशात आणून घालू. पर न्हाईच दिसला तर मग काय करायचं पाटील ?"

तरण्या रमजाला आणि मेदवाऱ्याला चुलत्याचे हे गुळगुळीत बोलणे रुचले नाही. चितूर मिळत नाही म्हणजे गोष्ट काय ? जिथे रान आहे तिथे चितूर आहेच. आणि रानातला चितूर फाशात नाही आणला तर त्यात पारध्याचे कसब ते काय ?

रमजा म्हणाला,

"आम्ही चितूर देऊ."

हा सौदा पक्का झाला. पारधी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच ती दोन्ही पोरे फासे घेऊन पश्चिम दिशेकडे गेली. त्यांना जाताना पाहून नाईक मला म्हणाला,

"तात्या, पारधी चितूर आणत्याल. आपल्याला गिधूड आनला पायजे नाही तर वचनाला बाध येईल."

मी म्हणालो,

"अरे गिधाडांना काय तोटा. आत्ता फिरायला जाऊ तेव्हा बंदूक बरोबर घे. दोन चार गिधाडं आणून देऊ पारध्यांना !"

"ते खरं, पर तुम्ही त्या वंगाळ पाखरावर वार कसा घालनार ?"

"आपल्यांला ओंगळ वाटतं, पण पारधी त्याला जर कोंबडीसारखा मानतो तर त्याची मागणी पुरी करायला काय हरकत आहे....? तरस काय कमी ओंगळ जनावर असतं ? आपण वार घालतोच का नाही त्याच्यावर ?"

माझ्या या खुलाशाने नायकाचे समाधान झाले. पारधी चितुरासाठी पश्चिमेकडे गेले आणि आम्ही गिधाडासाठी दक्षिणेकडे गेलो.

ती मुलखावेगळी शिकार शोधीत एकदीड वाजेपर्यंत रानातून भटकलो तरी गिधाड कुठे नजरेला पडले नाही. आदल्या दिवशी पारध्यांनी पाहिलेली गिधाडे बातमी लागल्याप्रमाणे कुठल्या कुठे नाहीशी झाली होती. आमचा फार हिरमोड झाला. पारध्याला थोर तोंडाने दिलेला शब्द खोटा पडतो की काय अशी धास्ती वाटू लागली.

जेवण-वेळ टळून गेली. ऊन्हही फार झाले. इथून पुढे रानात फिरण्यात मतलब नव्हता.

" बापू, पारध्याला दिलेले वचन खोटे पडणार रे. "

रामोशी म्हणाला,

" तात्या, बारा कोस रान बघीन पर तुमचं वचन खोटं नाही पडू देनार. तर आता घराकडं चला. जेवण करा, जरा लवंडा, तवर मी गिधाडाचा तपास लावतो. "

पाच-सहा मैल रपेट मारून आम्ही परत घरी आलो. पारध्यांची पाले दिसू लागली, तेव्हा मला नक्की वाटले की आत्ता ती मंडळी चितूर घेऊन समोर येणार आणि आम्ही मात्र तोंडे वाकडी करून त्यांना काही मिळाले नाही म्हणून सांगणार. सहज गंमत म्हणून बोलून गेलो पण आता दिला शब्द पाळायचे झाले. दोन बंदुका आणि ओझेभर काडतुसे बरोबर घेऊन आलो आणि कसल्या शिकारीसाठी हिंडणे आले? मोठी गंमत होती. गिधाड ते काय आणि त्याची शिकार ती काय, पण दिवसभर का होईना एक पेचप्रसंग समोर उभा राहिला होता. पारधी जन्मजात शिकारी, रानात जाऊन ते चितूर आणल्याशिवाय राहणार नाहीत. फासे लावून, शिळा घालून ते चितूर आणणार यात शंकाच नाही. पण आम्ही काय करावे? शीळ घालून गिधाड काही बोलवता येण्यासारखे नव्हते. अब्रू जाण्याचा प्रसंग होता खरा.

" बापू, आजच्या दिवसात पारधी मागतो त्या पाखराचा तपास लागला पाहिजे. एक वेळ पारध्यांनी त्यांची शिकार आणून हजर केल्यावर आपल्याला वायदे करता येणार नाहीत. "

रामोश्याने काही बेत केला होता असे दिसले, कारण त्याच्या बोलण्यात आत्मविश्वास होता.

" तात्या, पाखरू तुमच्या नजरंला पडंल असं करनं माज्याकडं लागलं. आज उद्या ते तुमाला दिलं म्हंजे झालं का नाही? "

" झालं! "

" मग तुमी निव्वास व्हा. माझं मी बघतो. "

पारध्यांच्या पालाशेजारी पोचलो. मेदवान्या आणि रमजा आडवे आले. मागून मिठूही आला. त्यांचे चेहरे पाहूनच मी ताडले की यांनाही शिकार

मिळालेली नाही. चला! आजचा दिवस तरी सुटलो!

" काय मिठू शिपाई, चितूर कुठाय?"

" पोरं मस्त फिरून आली दादा. पर पाखराचा तपास नाही लागला. पर लागंल आता घटकाभरानं. ह्या अंगाला धाडतो दोघास्नी. मीबी संगं जातो."

" ठीक ठीक, बघा तुम्ही चितूर आणला की आम्ही तुझा कोंबडा आणलाच म्हणून समज!"

मिठू माझ्यापुढे येऊन उभा राहिला. तोंड पुढे करून म्हणाला,

" तुझी अट घटकाभर बाजूला ठेव. तुझ्यापाशी हत्यार आहे. एक गोळी माझ्यासाठी खर्ची घाल बघ. माझी लेकरंवाळं खातील!"

आता काय करावे?

" अरे, पण तू पाखरू दाखव ना ते."

" दाखवल्यावर मारशील?"

" हो हो; मारीन!"

" बरं मी दावीन. हितं बंगल्यापुढं आनतो बघ त्याला!"

मी जेवायला घराकडे निघून गेलो. पारध्याने आणि रामोश्याने काय बेत केला मला कळले नाही. पण त्यांचे आपसात काही बोलणे झाले.

तिसऱ्या प्रहरी झोप घेऊन मी उठलो तेव्हा झोपड्यापासून उलट्या वाऱ्याला दोन अडीचशे यार्डांवर काही जनावर मेल्याचे मला आढळून आले. गावातले एक भटके कुत्रे होते. रानचा वाघ समोर येण्यासाठी आम्ही बकरे बांधतो त्याप्रमाणे काही तरी करामत पारध्यांनी केली असावी असा संशय मला आला. रामोशी घराकडून आला तेव्हा त्याने माझा संशय खरा असल्याचे सांगितले. खटपटी पारध्यांनी शिकार मिळावी म्हणून मुद्दाम हा बनाव घडवून आणला होता. रानात गेलेली पोरे पुन्हा हात हलवीतच माघारी आली होती. मिठू आणि रमजा बांधावर बसून, आभाळातून शिकार केव्हा जमिनीवर उतरते याची वाट बघत होते. रामोशीही मोठा उत्सुक झाला होता. पण दिवस मावळला तरी घारीकावळ्यांशिवाय कोणी फिरकले नाही.

अंधार पडला. काळ्या रानातली पारध्यांची पाले काळोखात बुडून गेली. थोडेसे आभाळ आले आणि पावसाची थोडीशी सर येऊन गेली.

मला वाटले, काळ्या रानात चिखल झाला आहे, गार वारा सुटला आहे.

त्या एवढ्या पालातून पारध्याची प्रजा कशी झोपली असेल ? त्यांच्या अंगावर वस्त्रे नव्हती मग अंथरायपांघरायला काय असणार ? त्या गाईंनी कुठे आडोसा घेतला असेल, ती लेकुरवाळी कोंबडी कुठे बसली असेल, आणि दोन पुतणे आणि पाच मुले असलेला मिठू कुठे झोपला असेल ? पण हा विचार मीच करत होतो. पारध्याची पाले अगदी निवांत होती.

मध्यान्ह रात्री मी एकाएकी दचकन् जागा झालो. गर्द काळोखात डोळे उघडून ऐकू लागलो. पारध्यांच्या पालाकडून कुणी तरी रडते आहे असा आवाज कानी येत होता. कुणी तरी गहिवर घातला होता. दोन रात्रीसाठी माझ्या रानात मुक्कामाला आलेल्या पारध्यांवर काही बरावाईट प्रसंग आला काय ? आवाज लहान मुलाचा नव्हता, चांगल्या प्रौढ माणसाचा होता. एकच करुण स्वर निघत होता. सदा वाऱ्यावर वरात असलेल्या, अन्नासाठी दाही दिशा हिंडणाऱ्या या पारध्याला काय बरे प्रसंग आला आहे ?

"बापू, ए बापू. तुझ्या कानावर काही आवाज येतो का ?"

सावध झोपेचा रामोशी तात्काळ उठून अंथरुणावर बसला. कान पाडून आवाज घेऊ लागला.

"पारध्याच्या पालात कुणी तरी विव्हाळताय तात्या !"

"काय झालं असंल बरं ?"

"काय तरी नवराबायकूचं भांडन झालं असंल. मिठू शिपायानं बायकूला मारलं असंल !"

"हेच का दुसरं काही ?"

"छ्या ! काय परसंग आला असता तर आपल्या हिकडं पळत आली असती. काय तरी भांडणतंटाच हाय. तुमी निजा खुशाल !"

उशीरपर्यंत गलबला ऐकू येत होता. पुढे सगळीकडे शांत झाले. झोपमोड झाल्यामुळे मी वरचेवर उलथापालथा होत होतो. पहाटे पहाटे झोप लागली.

सकाळी पालात जाऊन चौकशी केली तेव्हा मिठू बाहेर आला. त्याचा चेहरा थोडा चिंताग्रस्त दिसला होता.

"काय गडबड झाली रात्री मिठू ?"

"माजा मुलगा बंदरी आजारी झाला दादा. एकाएकी ढाळ-वांत्या सुरू झाल्या !"

" बरं आहे का आता ? "

" हाय बरं."

" मग रडत होतं कोण ?

" मग देवीला बोलवत होतो दादा, माज्या अंगात देवी आली भवानी. तिनं सांगितलं काय धोका न्हाई. समदं खुशाल होईल म्हणून. म्हणजे काय झालं, दिवस मावळताना मेदवाऱ्यानं एक मुंगूस धरून आणला. तो मी माज्या हातानं भाजला, शिजिवला आणि समद्यास्नी वाटून दिला. माझा पोरगा खाऊन झोपला आन् मध्यान्‌रात्री आजारी झाला."

मी म्हटले, असो ! सारा प्रकार फासेपारध्याला शोभेल असाच होता. मुलाला आता बरे आहे. भोसल्याच्या कुलदैवताने अंगात येऊन मिठूला दृष्टान्त दिला आहे. आता काळजी करण्यासारखे काही नाही.

संध्याकाळी बांधावर गिधाडे उतरली. त्यातले एक बार घेऊन पडले. पारध्यांना हाक मारावी म्हणून मी पाहिले तो रान मोकळे होते ! पारधी निघून गेले होते. मघाशी तर मी पाहिली होती. थोडी झोप घेऊन उठतो तोवर गिधाडे दिसली. आणि एवढ्यातल्या एवढ्यात पाखरे उडावीत तशी ही पाले गेली कुणीकडे ?

रामोशी म्हणाला,

" तुमची झोप लागली तवाच पारध्यांनी पालं गुंडाळली. मी इचारलं, लेकानु जाता का ? तर म्हणाली, सुगाचं दिवस आहेत. एका गावात चार दिवस राहिलो तर पोटाला कसं मिळल ? मी म्हणालो, आन् शिकार रं तुमची? तर म्हणाली, कुठं पाखरं उतरतायत् ? कुठंवर वाट बघावी ? अन् गेली निघून ! "

उडून गेलेल्या पाखराचा कुठे म्हणून शोध करावा ? तरी मी दोन माणसे शेजारच्या वाडीकडे पाठवली. संध्याकाळी ती परत आली. पारधी लांब गेले होते.

त्या मेल्या पाखराकडे पाहून रामोशी म्हणाला,

" काय सांगावं तात्या, तुम्ही राग भराल म्हणून बोललो न्हाई पर हे पाखरू जेवायला मिळावं म्हणून पारध्यांनी गावातलं कुत्रं धरून आणून मारलं आन् हितं टाकलं. दोन जीव फुकट की हो गेले "

# ११

## जत्रेच्या रात्री

दिवाळी होऊन जाई आणि गारठा सुटे. दिवस लहान आणि रात्री मोठ्या होत. निवाऱ्याविना बांधलेली शेतकामाची जनावरे अंगे आखडून गप्प उभी राहात. एरवी बिनधोक उघड्या अंगाने पैरणीशिवाय हिंडणा-फिरणारी जवान माणसेसुद्धा सकाळ, संध्याकाळ अंगावर पांघरुणाची भाळ मारल्याशिवाय बाहेर पडेनाशी होत. म्हातारीकोतारी सारखी उन्हाला बसत. रानामाळात आगट्या पेटत आणि जागजागी धूर आभाळात चढताना दिसे. सकाळी ओढ्याच्या पाण्यावर दाट धुके तरंगू लागे आणि जत्रांचे दिवस जवळ येत.

आमच्या गावच्या आसपास दहावीस कोसांच्या आत बरीच देवस्थाने होती. आटपाडीला उत्तरेश्वर होता. खरसुडीला सिद्धनाथ होता. करगणीला श्रीराम होता. या सर्वांच्या नावाने तुफान जत्रा भरत. कुठे कार्तिकी पौर्णिमेला, कुठे पौषी पौर्णिमेला, तर कुठे माघी अमावास्येला. हौशे, नवशे, गवशे अशा अठरापगड जातीच्या माणसांची जत्रेच्या ठिकाणी मर्कण्ड पडे. हौशे, हौस फेडून घ्यायला येत; नवशे, नवस फेडायला येत आणि गवशे, काही गवसेल या आशेने जमत. माणसांची एवढी प्रचंड गर्दी जमते म्हटल्यावर नाना लहान-मोठे व्यापारीही गोळा होत. हलवाई, भडभुंजे, मणेरी, तांबोळी, सणगर, वाणी, घिसाडी, तांबट, बुरूड, मांग या सर्वांचीही गर्दी होई. हारीने पाले उभी राहात,

राहुट्या पडत, दुकाने मांडली जात. कुठे रसाची गुऱ्हाळे लागत, कुठे जुगारी पट मांडून बसत, कुठे हॉटेलची रांग बसे तर कुठे कापड आळी उभी राही.

जनावरांचा बाजार फार मोठा भरे. खिलारी खोंडे, गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, घोडी घेऊन लांबलांबचे लोक येत.

आमच्या गावचेही लोक जत्रेला निघत. कुणी देवाला, कुणी बैलजोडी घ्यायला तर कुणी खोंड विकायला. मग मुद्दाम जत्रेच्या निमित्ताने, जरीचे फेटे बासनातून निघत. बैलांच्या शिंगांना पितळी शेंब्या घातल्या जात, गाडीवर नवा तट्ट्या बसे. घरची गाडीच जातेय म्हटल्यावर आयाबायांनाही हुरूप येई. शिंगांना गोंडे आणि गळ्यात चंगाळ्या बांधलेल्या खिलारी बैलजोड्या, तट्ट्याच्या गाड्यांना जंपून चांगल्या दहावीस गाड्या निघत. आत कबिला असल्यामुळे ह्या गाड्यांना पडदे असत. गाड्यांच्या मागे नव्या कासऱ्याला बांधलेली विक्रीची जनावरे असत. भल्या सकाळी गाड्यांची रांगच्या रांग खरसुडीच्या वाटेला लागे.

अनेक गावच्या गाड्या, घोडी, जनावरे, पायदळ लोक यांची रीघ खरसुडी-कडे जाणाऱ्या सडकेवर लागली म्हणजे कच्ची केलेली सडक उखडून अतो-नात धूळ होई. धावणाऱ्या गाड्यांमुळे उधळलेला धुरोळा बसून सडकेकडेची बाभळ-नेपतीची, तरवड-लिंबाची झुडपे बरबटून जात. गाडी हाकण्यासाठी दांड्यावर बसलेल्या गाडीवानाचा चेहरा पिठाच्या गिरणीत काम करणाऱ्या गड्यासारखा पांढराधोप होई.

आम्हा पोरांना काही विकायचे नसे, काही घ्यायचेही नसे. फक्त जत्रेची मजा बघायची असे. रुपया आठ आणे खिशात टाकून आणि आईने पहाटे लवकर उठून करून दिलेली, बाजरीची भाकरी, धपाटी, मोकळी डाळ आणि ठेचा ही शिदोरी पाठीशी मारून, गाड्यांच्या सोबतीने आम्ही जत्रेला निघत असू. सोबतीने म्हणायचे ते आपले नावालाच. गाड्यांना गाडीवाटेनेच जावे लागे. आम्ही लवकर अंतर कातरायचे म्हणून आडवाटा धरीत असू. धुराळा, ऊन, तहान सोसत सोसत, दिवसभर पायपीट करून जत्रेच्या गावी पोहोचत असू.

गावच्या गाड्यांचा तळ कुठेतरी एकत्र पडे. तिथेच दाटीवाटीने आम्हीही सोडलेल्या गाडीच्या आडोशाला आपल्या पिशव्या टाकत असू. उघड्या

वाऱ्यावर, खाली वैरण आणि अंगावर चादर असे घोळामेळाने झोपत असू. झोपेची आणि अंथरुणापांघरुणाची काळजी करायला रात्रच अपुरी असे. कारण जत्रेला बहर येई तो दिवस मावळल्यानंतरच. कावळ्यांची काव काव, गुरांचे हंबरणे, घंटांचा आवाज, लोकांची गवगव, धुरोळा, चिपाडाच्या धुराचे आणि तव्यावरल्या भाकरीचे वास उसळले जात असतानाच, पश्चिम दिशा लालेलाल होऊन दिवसाचा देव डोंगराआड बुडे आणि आभाळात चांदण्या चमकारे मारू लागत.

पाला-दुकानातून, हॉटेल-खानावळीतून दणक्याने फोनो वाजत. गॅसबत्त्या, कंदील, पलिते, शेकोट्या जिकडे तिकडे पेटलेल्या दिसत आणि पटांगणातून वाळवंटातून तमाशाचे फड उभे राहात. आमची रात्र तमाशा बघण्यात जाई. तशी इतरही करमणूक असे. कुठे भेदिकांचा फड रंगलेला असे. कुठे चार धनगर मंडळी एकत्र जमून ढोलाच्या तालावर धनगरी ओव्या म्हणत असत, पण सगळी गर्दी तमाशाच्या दिशेनेच सरके.

बरेच फड आलेले असत. एका–एका जत्रेला चार चार. एकीकडे ईश्वर रेठरेकर असे तर दुसरीकडे रामा कुंभार वर्धनगडकर. इकडे बापू कुपवाडकर तर तिकडे भाऊ बापू मांग, नारायणगावकर. जागा मिळेल तशा कनाती उभ्या राहिलेल्या असत. म्हणजे चौफेर बांबू रोवून त्यांना पुरुषभर उंचीचे कापड नेसवलेले असे. आताप्रमाणे तेव्हा तंबू, ट्रक, जनरेटरचा जोजार तमासगिरांना परवडण्याजोगा नव्हता. चवलीच्या तिकिटात कनातच परवडे.

इतक्या फडातून बऱ्या वाइटाची निवड प्रेक्षकांनी कशी करावी ? बिगर माहितगार लोकांना नावाचा महिमा नसे. कनातीच्या प्रवेशद्वारी पाट्या असत, पण त्या वाचायला किती जणांना येणार ? अशा लोकांची सोय तमासगिरांनीच केलेली असे. कनातीच्या दाराजवळ जसा तिकिटे फाडणारा बसलेला असे तशाच बाकड्यावर ओळीने नाच्या पोरीही बसलेल्या असत. त्यांनी केसाची भांगपट्टी आणि तोंडाची रंगोटी केलेली असे. जरीकाठी लुगडी चापूनचोपून नेसलेली असत. गळ्यात, हातात, दंडात, नाकात डागदागिने घातलेले असत. पाने खाऊन चोची रंगवलेल्या असत. वरचेवर त्या तोंडे बाजूला करून धुळीत पिचकाऱ्या टाकत. डोळे मोडीत आणि गालात मुरमुशी हसत. लोकांचा घोळका

त्यांना न्याहाळत उभा असे. ज्या कनातीपुढे नव्या तरण्या, गोऱ्या भुरक्या बाया दिसत, त्या फडाची तिकीटविक्री जास्त होई.

सरसकट चवली तिकीट असे. आपण घुसून बोर्डानजीकची जागा मिळवायची आणि पायातल्या वहाणा मांडीखाली सांभाळत बसून राहायचे.

कनात काठोकाठ भरली म्हणजे पायपेटी वाजू लागे, कड्यावर कडी आणि ढोलक्यावर थाप पडे, तुणतुणे, ट्रँगल, झांजा वाजू लागत आणि गण सुरू होई.

लवकर यावे सिद्धगणेशा·
आतमधी कीर्तन वरून तमाशा,

कसले कीर्तन ? आतूनबाहेरून सगळा तमाशाच असे. गण गौळण, रंगबाजी लावण्या, फार्स आणि शेवटी वग असा चवलीच्या तिकिटात घेत असे.

गवळणीपासून हशा पिकू लागे. ह्या हशांचे वागाइतदार प्रामुख्याने दोघे असत. सोंगाड्या आणि गवळणीची म्होरकी असे म्हातारी मावशी. दह्यादुधाचे माठ घेऊन गवळ्याच्या बाया मथुरेच्या बाजाराला निघत. एखादा निबरट दाढीचा आणि उग्रट बोलण्याचा बाबा नेसूच्या धोतराचा पदर डोक्यावर घेऊन मावशी होई. वाटेत अचानक गवळणींची वाट कृष्ण आणि पेंद्या आडवत आणि अशीलदान ' मागत.

मग मावशी आणि कृष्ण या दोघांत विनोदी संवाद होई.

प्रेक्षाकांत हशा होई !

रसगंगा दुथडी भरून वाही. मुख्य रस शृंगार आणि त्याच्या मागून विनोद. शृंगार आणि गावरान विनोद तर त्याहूनही गावरान. झाकापाक, सूचकता, नसे. लावणीतले शब्द जिवंत करताना बाई मुळीच संकोचत नसे. सगळे हावभाव खुल्लम खुल्ला होत. सगळा मामला ' ॲडल्ट ओन्ली 'च्या पलीकडे असे. ( पण आम्हाला तो कळत असे )

एक कोळिणीचे गाणे हमखास टाकले जाई.

कोळिच्या डोक्यावर । झिंग्याची पाटी
कोळी लागलाय कोळणीच्या पाठी

कोळीण ये ग,
तुझा छंद लागं, तुझा छंद लागं–

नाची अर्थातच कोळीण आणि सोंगाड्या कोळी.

उडत्या ठेक्याचे हे गाणे ऐन रंगात आल्यावर प्रेक्षकांपैकीच कुणाचीतरी कानाएवढी उंच काठी घेऊन तिचा वापर मोठ्या खुबीने होई. मुले घोडा घोडा खेळतात तशी ही एकच काठी दोघेही घेत आणि होडी मागे पुढे वल्हवली जाई!

तो ठेका आणि हावभाव चालू होताच प्रेक्षकांत हाय, हाय, होई.

विनोदाची आतषबाजी तर वरचेवर होई.

तमासगिरांना आपला प्रेक्षक कळलेला असे. ओळखून ते सगळे गाणे, बोलणे त्या वळणाने नेत.

शिवशक्तीचा झगडा उभा राही. कोण श्रेष्ठ. शिव का शक्ती? स्त्री का पुरुष? कोणीएक बोलभांड रंगू आणि कोणीएक बेरक्या बापू अगं तुगंवर येत.

बापू म्हणे :

तुझं–माझं बोलणं पंचात जाणं
शिवशक्तीमधी नको दावा.

रंगू म्हणे :

पंचात नेईन, तिथंच बांधीन
एवढा लाड हा नसावा!

बापू : ब्रह्माचं अक्षार, कधी न चुकणार
संबंध तुझा माझा असावा ग–

रंगू : उग्रट बोलणं, वाईट वागणं
मस्तीचा बोकड नसावा!

होय नाही करताकरता वाद चांगलाच रंगे.

बापू : कृष्णा–कोयना पोहणार.
निघून जाणार
काना बंदुकीला असावा ग–

भले, कृष्णा–कोयना या तुफान नद्या असल्या तरी पट्टीचा पोहणार त्या पार करून जातोच की नाही? अहो, बंदूक हे हत्यार स्त्रीलिंगी, पण त्याला

पुल्लिंगी काना म्हणजे चाप नसला तर तिची किंमत किती, चूल फुंकण्याच्या फुंकणीइतकीच !

रंगू : गोळी मारणार उलथून पडणार
वायकात बोलणार नसावा !

बापू : मोटंला ' नाडा ' बैल जाडा
' नळा ' तिफणीला असावा ग–

रंगू : ' दोरी'चा आधार, नको करू तेगार
अडाणी पेरणार नसावा !

बापू : मागं म्होरं पेरणार, राशी हरणार
औताचा ' वळिवा ' असावा ग–

रंगू : पावसाची पाळी, जमीन काळी
धान्यात ' इंद्रा ' नसावा !

पेरणीच्या धान्यात मिसळ असली की ' इंद्रा ' उगवतो, भातात कोद्रू, तंबाखूत बंबाखू. रानात इच्का ( रानात इच्का आणि गावात टग्या, तुडवून मारल्याशिवाय मरत नाही, अशी म्हण आहे ) असा इंद्रा धान्यात नसावा.

बापू : वाणी उदमी तेली तांबोळी
कुंभार गावाला असावा ग–

रंगू : मातीत राहणं, कसाब करणं
कच्चा डेरा हा नसावा.

बापू : माणदेशाला संभू गोपाळा
श्रीधरस्वामी असावा ग–

रंगू : ऐकून बोली, शुद्ध कशी गेली
सभेत कावळा नसावा.

कोण संभू गोपाळा ?

श्रीधरस्वामी कोण हे आम्हाला उत्तम तऱ्हेने माहीत आहे. " पंढरपुरापासूनी तीस योजने दुरी, नाझरे नाम नगरी, ब्रह्मानंद माझा पिता, सावित्री माझी माता, या उभयतांना वंदूनी आता "

त्यांनी जी ग्रंथरचना केली ती आम्ही डोळयांनी वाचली आहे, कानांनी

ऐकलीही आहे. धन्य झाले आहोत, पण श्रीधराच्या मांडीला मांडी लावून बसतो म्हणणारा हा लोककवी संभू गोपाळा कोण ?

त्याची फारशी माहिती कुणाला नाही. कुठं तरी बावी नाही तर मायणी गावी कुसवाबाहेरच्या वस्तीत जन्माला आलेला आणि कवित्व करण्याचा नाद जोपलेला, हा गोपाळा मांगाचा पोरगा संभू असावा. वाखापासून दोर वळण्याचा, केरसुण्या, शिंकी, जनावरांच्या वेसणी, म्होरक्या गुंफून शेतकऱ्याला पुरविण्याचा आपला पिढीजात व्यवसाय संभाळून तो, नेटके शब्द गुंफण्याचा नादही करीत असला पाहिजे. करता करता त्याची रचना गोंधळ्या भराड्यांच्या तोंडून या महाराष्ट्र देशाच्या खेडोपाडी पोहोचली असली पाहिजे. श्रीधरस्वामींच्या पांडवप्रतापाप्रमाणे त्याच्या रचनेच्या वह्याही, आधी मस्तकी लावून मग उघडल्या जात असल्या पाहिजेत. असे असलेच पाहिजे त्याशिवायः—

माणदेशाला संभु गोपाळा
श्रीधरस्वामी असावा ग—

असे गर्वोद्गार कसे निघतील ?

देवादिकांचे गुणगान करून ते ग्रंथगत केले म्हणून श्रीधर राहिला, संभू गोपाळाच्या भेदिकाच्या आणि ऐकिवाच्या वह्याची पाने काळाच्या सोसाट्यात सापडून रानोमाळ उडाली.

तर असा हा झगडा होई. मग एखादा चवलीचा फार्स आणि त्यानंतर ठकसेन राजपुत्राचा किंवा राजा हरिचंद्राचा वग मध्यानरात्र उलटून जाई.

दरम्यान, कनात पुरी भरल्याचे बघून मालकानेच ती वर केलेली असे आणि तिकीट काढणाराप्रमाणेच्च बिनतिकीटवाल्याचीही गर्दी दाहीदिशांनी पसरून चांगला चार-पाच हजाराचा लोकसमुदाय तमासगिरांभोवती जमलेला असे. जो जो समुदाय वाढे, रात्र चढे, तो तो साथीची हत्यारे आणि सुरत्यांचे आवाजही चढत.

गारठा वाढे. झोपेचे अळके लोक बसल्या जागी मुर्गाळत. बरेच उठूनही जात. विरळ केलेल्या वैरणीच्या पिकाप्रमाणे समुदायामध्ये उघड्या धरित्रीचे ढोबळे दिसत. बत्त्यांचा उजेड फिका होई, कोंबडे आरवत, पूर्व दिशेला सूर्याचा लालभडक गोळा वर उठे आणि तमासगीर भैरवी म्हणत—

'नवरा–बायकोशिवाय रथ हा संसाराचा ना चाले.'

सकाळी पुन्हा हॉटेले गजबजत, पेशल च्या, भज्जी गर्म, शिरा, जिलाबी अशा पोरांच्या आरोळ्या उठत, जत्रा हळू बोलू लागे.

असा धडाका सात सात दिवस चाले. कनवटीचे पैसे आणि बांधून आणलेल्या बाजरीच्या भाकरीचे तुकडे उडत. हळूहळू जत्रा फुटू लागे. नदीनाल्यांना आलेला पूर ओसरावा तशी गर्दी ओसरे. पाले, राहुट्या गुंडाळल्या जात, गाड्यांचे तळ मोकळे होत. दुकाने हॉटेले उठून जात.

परत निघालेल्या बैलगाड्यांची वावखाडे पकडून आम्ही गावाकडची वाट धरीत असू. जत्रेच्या आठवणी बराच काळ मनात रेंगाळत. जत्रेच्या आणि जत्रेच्या रात्रीच्या–

२०६४
२२७३२
निबंध

# १२

## करिअप्पानंतर मीच

दुपारी साडेचारच्या सुमाराला मी ब्रिशबनच्या विमानतळावर गेलो तेव्हा आभाळ कुंद झाले होते, झिरीमिरी पाऊस पडत होता.

सिडनीहून उतारू घेऊन विमान आले, त्याच्या पाठोपाठ लगेच मेल-बोर्नहून दुसरे आले. दोन्हीही विमानांतून उतारू उतरू लागले आणि इकडे, आपल्या माणसांना घ्यायला स्त्रीपुरुषांचा रंगीबेरंगी मेळावा कठड्याशी लागून वाट बघत होता. तो वाऱ्याने फुलांचा ताटवा हलावा तसा हलू लागला. गोरे गोरे हात वर झाले, चिमुकले रुमाल फडफडले, लाल चुंबने हवेत उडवली गेली. सिडनी मेलबोर्नहून आलेले उतारू, खाली माना करून कपडे सावरत पावसातून येऊ लागले तशी हवाई पऱ्यांची धांदल उडाली. छत्र्या घेऊन त्या उतारूंना आडव्या गेल्या, आपल्या छत्रीत घेऊन विमानतळाकडे येऊ लागल्या.

उतारू आत येताच बायकांनी चिवचिवाट केला. मिठ्या पडल्या, चुंबने वाजली. कोणी कोणाचे मऊ हात हातात घेतले, कोणी कोणाच्या कमरेभोवती चांदण्याचे हात टाकले. संभाषणाची एक जलद गत वाजली, एखाद्या वाद्य-मेळावर वाजावी तशी. आणि ब्रिशबेनच्या दिशेने अनेक मोटारी एका पाठो पाठ निघून गेल्या.

हा सगळा प्रकार पाहात मी ‘ आम्हाला तेवढं नाही ना ’ अशा चेहऱ्याने

उभा होतो, तेवढ्यात केन्सला जाणाऱ्या उतारूंसाठी पुकारा झाला. पावसातून भिजत मी विमानात चढलो आणि उताऱ्या जागी जाऊन बसलो. बाहेर पाऊस पडतच होता. गोल खिडकीच्या काचेवर पाण्याचे थेंब चिकटून राहिले होते.

विमानाने वेग घेतल्यावर काचेवरचे थेंब मासे होऊन सुळकन् दुसऱ्या टोकाशी गेले. काळे ढग मागे टाकून लवकरच विमान स्वच्छ हवेत आले. छान कोवळे उन्ह पडले होते आणि खाली आलेल्या पांढऱ्याफेक ढगांच्या ढिगाऱ्यावरून आम्ही केन्सच्या दिशेने चाललो होतो.

हवाई पऱ्यांनी मद्याचे पेले फिरवले तेव्हा खाली सागराचे निळेभोर पाणी होते. नाना सोंगे घेऊन ढग उभे होते. संध्याकाळ होत होती. काचेला नाक लावून मी मावळतीचे रंग पाहात होतो. मन कसे फुलून आले होते, कसे प्रसन्न वाटत होते. हा प्रवास कधीच संपू नये आणि हे रंग कधीच नाहीसे होऊ नयेत असे वाटत होते.पण सुरेख संध्याकाळ फार लवकर नाहीशी झाली.

दिवेलागणीच्या सुमारास विमान टाउन्सविलला थांबले. मी खाली उतरताच पुण्यातल्या एप्रिल महिन्याचा वास आला. नाक वर करून मी तो छातीत भरून घेतला. असा वास मला आतापर्यंत इतरत्र कुठे आला नव्हता.

टाउन्सविलचा निळ्यातांबड्या दिव्यांनी लखलखणारा विजानतळ सुटला. नऊला दहा मिनिटे कमी असताना केन्सचा शांत विमानतळ आला.

केन्सच्या रेडिओकेंद्रावरचा रूरल ऑफिसर, लंबाटा बॉब लोगन लांब टांगा टाकीत आला, आणि आपल्या छोट्या गाडीत घालून मला गावात घेऊन आला. चाळीशी गाठत आलेला बॉब् शेतकऱ्याचा मुलगा होता, आणि अजून मोकळाच राहिला होता ( थोडी ओळख झाल्यावर मी कारण विचारले. तर तो म्हणाला, मला लग्न करावे अशी पोरगीच अजून सापडली नाही. ) एक्स्प्लनाड हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर त्याची लहानशी खोली होती. माझा हॉटेलचा खर्च वाचावा आणि त्या पैशातून काही पुस्तके आणि बायकोमुलांना भेटी घेता याव्यात म्हणून त्याने हॉटेलवालीशी रदबदली करून माझ्यासाठी एक लहानशी खाट आपल्याच खोलीत घालून घेतली. मालकीणबाई इंग्लिश होत्या आणि कधीकाळी भारतात राहून आल्या होत्या. गुलाबजाम हा पदार्थ आपण खाल्ल्याचे सांगून त्या म्हणाल्या,

" तुम्हाला म्हणून ही सवलत देत्येय. एरवी बॉबचं म्हणणं मी सुळीच

मानलं नसतं. ”

माझं जेवण विमानातच झाले होते ( ऑस्ट्रेलियन लोक, जैनांप्रमाणे सूर्य मावळण्यापूर्वी जेवतात. ) थोडा वेळ इकडचे तिकडचे बोलून, भगवाना, म्हणून मी खाटेवर अंग टाकले.

पहाटे लवकर जागा झालो तेव्हा, पहाटेच्या गार हिरव्या उजेडाने खोली भरून गेली होती. मला अनोळखी अशी पाखरे बाहेर भूपाळ्या म्हणत होती. आस्ट्रेलियात आल्यापासून अशी सुरेख जाग मला कधीच आली नव्हती. अशी शांत पहाट आणि अशी सुरेख गाणारी पाखरे मला कधी भेटलीच नव्हती. बॉबची झोपमोड होऊ नये अशा बेताने मी अंथरुणातून उठलो आणि बाहेरच्या गॅलरीत येऊन उभा राहिलो. खालून आडवा रस्ता गेलेला होता आणि त्यापलीकडे ओळीने हिरवीगार झाडे उभी होती. त्यापलीकडे समुद्राचे निळे निळे पाणी होते, आणि त्यापलीकडे दूरवर धुक्यात गुरफटलेल्या टेकड्या होत्या.

दिशा उजळत होत्या, पाखरे गात होती, निळे पाणी लहरा मारीत होते. प्रवासी लोकांची ‘ मक्का ’ समजल्या जाणाऱ्या केन्समधली माझी पहिली सकाळ किती सुंदर होती !

मग बॉब उठला. उठल्याउठल्या त्याने चहाची किटली उकळली. हा आता दुधाची काय व्यवस्था करणार म्हणून मी विचार करतो आहे, तोवर त्याने एक टूथपेस्टसारखी ट्यूब घेऊन कपात पिळली आणि चहा तयार झाला.

चहा पिताना माझ्या मनात विचार आला, आस्ट्रेलियन लोक हुषार खरे. पुढेमागे ते तयार चहाच्याही ट्युबा तयार करतील. ट्यूब पिळून त्यात गरम पाणी ओतले की चहा तयार !

बॉब म्हणाला,

“ आपण न्याहरी करू आणि कामाला लागू. ”

मी आस्ट्रेलियाच्या न्याहरीचा धसका घेतला होता. उठल्यासुटल्या तळलेली अंडी, तव्यावर परतलेले गुरांचे मांस, तळलेले मासे, बटाट्याचे तळलेले काप, ब्रेडलोणी, दूध पोहे, खीर, फळांचा रस, फळे, कॉफी असले पदार्थ किती आणि काय काय म्हणून खावे ?

मी चेहरा पाडून म्हणालो,

“ बॉब, मला असल्या न्याहरीची मुळीच सवय नाही. या बाबतीत मला

सूट मिळेल तर बरे!"

"मग तुला न्याहरीच नको?"

"मुळीच नको असं नाही. दुधाचा एक पेला, टोस्टचे दोन तुकडे, लोणी आणि फळाची एखादी फोड पुरे!"

माझी ही मागणी ऐकून मालकीणकाकूंना फारच विस्मय वाटला. त्यांनी खांदे उडवले, दोन्ही बगलेला दोन्ही हात पसरले आणि ओठ मुरडले.

"मग तुझ्याकडून मी इतके पैसे घेणार नाही, फक्त सोळा शिलिंग. पण बॉबला तुझ्यासारखे करून भागणार नाही. तो शेतकरी आहे. शेतकऱ्याला भरपूर न्याहरी लागते—"

यावर वाईट चेहरा करून मी म्हणालो,

"मादाम, मी शेतकरी नाही. शेतकऱ्यांसाठी रेडिओ कार्यक्रम आखणारा चाकरमान्या आहे."

मग माळकीणकाकूंनी माझी न्याहरी पाठवली. दुधाच्या पेल्याचा आकार बेतशीर होता. पण, त्यांनी पाठविलेला टोस्टचा ढीग संपवता संपवता मी बेजार झालो.

ट्रिनिटी उपसागराच्या किनाऱ्यालगत वसलेले केन्स हे सुरेख गाव ब्रिसबन्-पासून हजारएक मैल दूर आहे दूध, अननस, बीअर यांची लयलूट असलेल्या ह्या गावातली मध्यवर्ती वस्ती सोडली तर बाहेरची घरे जमिनीवर नव्हती. माळ्या-वर होती. शेत राखणीचा माळा फार उंच असतो. ही घरे एवढी उंच नव्हती. लाकडांचे प्रचंड ओंडके जमिनीत उभे पुरून, चार-पाच फूट उंचीवर केलेल्या लाकडी माळयावर ही लाकडी घरे उभी होती, वर-पत्र्याची छपरे होती आणि ही सुंदर आकाराची छपरे सुरेख रंगवली होती. लाल हिरवी, पिवळी, जांभळी. लाकडी शिडीच्या पायऱ्या चढून वर जायचे, मग उंबरा. रस्त्यातून जाताना मान वर करून बघितले की, दाराशी हवा खात बसलेल्या बायका दिसायच्या.

माळयाखाली, मोटरगाड्या, अवजारे ठेवलेली दिसायची.

केन्सच्या आसपास, उसाची हिरवीगार आणि मोटमोठी राने होती. सुसरी असलेल्या नद्या होत्या, डोंगराच्या रांगा होत्या. त्यापलीकडे पठारावर तांबड्या काळ्या रंगाची पिकाऊ जमीन होती आणि त्यापलीकडे, उंचउंच वृक्षांनी काळोखी आणलेले जंगल होते.

सरता नोव्हेंबर महिना होता आणि गुलमोहराची झाडे फुलोऱ्याने तांबडीलाल झाली होती. चाफा, घाणेरी, शंकेश्वर ही आपली मंडळी तिकडे केव्हा गेली कोण जाणे, पण ती सगळी सुरेख फुलली होती. मेलबोर्नला दिसणारे, कावळ्याचे भाऊबंद मेगपाय पक्षी इथे दिसत नव्हते. इथली पाखरे सुरेख गात होती, इथले पोपट पंचरंगी होते. बरोबर टेपरेकार्डर घेऊन बॉब आणि मी बाहेर पडलो. केन्सच्या ऊससंशोधनत केंद्रावर गेलो. तिथे कोणी गिलबर्ट नावाचा अधिकारी मोठा हुषार होता. त्याची मुलाखत घ्यावी आणि उद्या सकाळचा रेडिओ-कार्यक्रम भरून काढावा, असा बॉबचा हेतू होता. जागोजाग दुले भरवूनच शेतकऱ्याच्या शेतकी तज्ज्ञांच्या मुलाखती गोळा करून त्या कार्यक्रमात देणे, हे रुरल ऑफिसरचे महत्त्वाचे काम असते.

गिली हा माणूस मोठा कठीण आहे. मुलाखतीसाठी तो बधायचा नाही असे बॉबला वाटत होते. अधिकाऱ्याने थोडे मोकळे व्हावे आणि बोलावे यासाठी बीअरचे एक दोन ग्लासेस घ्यावेत, असाही विचार त्याने मला बोलून दाखवला.

आम्ही गिलबर्टसाहेबाच्या कचेरीत गेलो तेव्हा आपले मोठे पोट घेऊन तो खुर्चीत बसला होता. टकल्या, गिड्डा, जाड चाळिशी लावलेला, साठी गाठत आलेला आणि बोलायला मोठा गमत्या. त्याच्या मोठ्या टेबलावर कागदांचा पसारा होता. आणि एक भली मोठी अर्धवट संपलेली रमची बाटलीही होती! ती पाहून मी आणि बॉबने फक्त एकमेकाकडे पाहिले.

माझी ओळख वगैरे करून दिल्यावर गिलबर्टसाहेबाने मला केंद्र फिरून दाखवले, पण बॉबला मुलाखत दिली नाही. 'पुन्हा केव्हा तरी': असे म्हणून त्याने बॉबची विनंती अंगाआड टाकली. पण त्या बापड्याला उद्या सकाळचा कार्यक्रम भरावयाचा होता, तेव्हा नाइलाजाने दुसऱ्या एका दुय्यम साहेबांची मुलाखत त्याने रेकार्ड केली. हा साहेबही बोलताना चाचरत होता, आमच्या-कडच्या शेतकी साहेबासारखाच टंगळमंगळ करत होता, हे बघून मला बरे वाटले.

मग गिलबर्टनी मला विचारले,

"तुला डॉनसिंगला भेटायचं आहे का? मी घेऊन जाईन त्याच्याकडे. तो तुझ्या देशातला आहे. चार पैसे बाळगून आहे. चांगला शेतकरी आहे."

मी म्हणालो,

"जाऊ या."

लगेच साहेबाने डॉनसिंगला फोन केला आणि वीस एक मिनिटांनी आम्ही डॉनसिंगच्या मळयावर पोचलो.

हा डॉन् म्हणजे पंजाबी ग्यान होता. आस्ट्रेलियात मला भेटलेला पहिला हिंदी माणूस. शंभर वर्षांपूर्वी त्याचा बाप इकडे उसाची लागवड करणारा शेतमजूर म्हणून आला, तेव्हा आजची 'व्हाईट ऑस्ट्रेलिया पॉलिसी' नव्हती. काळया माणसांना तेव्हा आस्ट्रेलियात येऊ दिले जात असे आणि राहू दिले जात असे.

डॉनने आमचे छान आगतस्वागत केले, खाऊपिऊ घातले... बोलताबोलता मध्येच तो म्हणाला,

"साब, हिंदुस्थानी आती है?"

मी म्हणालो,

"जरूर, क्यू नहीं? यह तो अपनी राष्ट्रभाषा है, ग्यानसिंग!" डॉनचा चेहरा एकदम उजळला. तो म्हणाला,

"मला तिकडचे कोणी आले की फार आनंद होतो. पण हे साहेब पाहुण्याला अगदी थोडा वेळ घेऊन येतात. घंटा दोन घंट्यानं भूक भागत नाही.- चार दिवस माझ्या घरा राहिले पाहिजे."

मग त्याने मला आपली 'गन्नेकी खेती' दाखवली. शंभर एकर रान, अद्ययावत यंत्रसामग्री, सगळे टापटीप होते. रानातले घर म्हणजे सुरेख बंगला होता. फोन, फ्रीज असलेल्या सगळ्या सुखसोयी होत्या, गाड्या होत्या.

बंगल्यापुढचे 'इमली'चे झाड त्याने मला कौतुकाने दाखविले. पन्नाशीच्यापुढे गेलेल्या डॉनने बहुधा आस्ट्रेलियन बाईशी लग्न केले असावे. बाई दिसल्या नाही. पण डॉनचा पोरगा होता. तो पुरा आस्ट्रेलियन वाटत होता. ग्यानसिंगचे दोन भाचे काही वर्षांपूर्वी भारतातून आले होते. आम्हा दोघांना हिंदीतून बोलताना पाहून त्या पोरांना मजा वाटत होती. काही न बोलता ते आपले हसऱ्या चेहऱ्याने नुसते ऐकत होते.

शेवटी डॉन म्हणाला,

"साब, आपण लोक इंग्रजांसाठी लढाईवर गेलो, त्याच्या शत्रूला आपला शत्रू मानून छातीवर गोळया झेलल्या. पण आमच्या ह्या सच्चाईचा काय फायदा

तर ही व्हाईट आस्ट्रेलिया पॉलिसी ! हमें जहर जैसी लगती है। हे माझे भाचे, शेतकामासाठी देशाकडनं आणले, इथं कामाला माणसं मिळत नाहीत म्हणून. आता ते वयात आले. त्यांची लग्नं करावी म्हटलं तर बायका इकडं आणायला सरकार परवानगी देत नाही इथलं. ''

डॉन मधूनच माझ्याशी हिंदीतून बोले आणि एरवी मजेशीर हेल असलेल्या फाकड्या इंग्रजीतून बोले. दोन्हीही साहेब ऐकत होते, पुष्कळ वादविवाद झाला.

गिलबर्ट साहेब म्हणाला,

" डॉन, व्हाईट ऑस्ट्रेलिया पॉलिसीचा अर्थ आम्ही काळ्या लोकांना दूर ठेवू इच्छितो असा नाही बाबा. आम्हाला काळे गोरे हा झगडा या देशात नको. म्हणून आम्ही आपले संभाळून आहोत इतकेच. तू इतके दिवस इथे आहेस तुला कोणी कधी काळा म्हणून कमी मानले आहे का ? नाही ना ? मग ? ''

पण ग्यानसिंगला काही पटले नाही. त्याचे भाचे वयात आलेले असून मोकळे राहिलेत, याचा अर्थ काय ?

मग आम्ही डॉनसिंगचा निरोप घेऊन निघालो. बाहेर पडल्यावर गिलबर्ट-साहेब म्हणाला,

" डॉन इंडियन कसला ? तो आता आस्ट्रेलियनच झाला आहे. त्याला शेत-कऱ्यांत, समाजात फार मान आहे. फार उमदा शेतकरी आहे ! ''

केन्सच्या शेतकी अधिकाऱ्याच्या गाडीतून मी आजूबाजूला खूप हिंडलो. डोंगर ओलांडून पठाराकडे जाताना रस्त्याच्या डाव्या उजव्या बाजूंना चमत्का-रिक झाडे दिसली, हात दोन हात बुटकी आणि डोक्यावर गवताच्या झिंज्या असलेली.

मी विचारले,

" ही कसली झाडे हो ? ''

शेतकी अधिकारी म्हणाला,

" दे आर कॉल्ड ग्रास ट्रीज ऑर ब्लॅक बॉईज, वन् ऑफ दी स्ट्रन्जेस्ट मेंबर्स ऑफ लिली फॅमिली. ''

अशा प्रकारच्या सोळा वेगवेगळ्या जाती आस्ट्रेलियात आहेत. ह्या खुज्या झाडाच्या झिंज्यांमधून कधी कधी दहा बारा फूट उंचीचे कणीस उभे राहिलेले

दिसते, पानकणसासारखे. पश्चिम आस्ट्रेलियात असलेल्या एका जातीचे झाड इतके सावकाश वाढते की, दहा फूट उंचीचे झाड एक हजार वर्षे वयाचे असते !

आजूबाजूला उभ्या असलेल्या ह्या मंडळीच्या वयाला दोनदोनशे वर्षे तरी झाली असावीत असा कयास मनाशी करून मी त्यांच्याकडे आदराने पाहात राहिलो

रस्त्याच्या दोन्ही बाजूला ही वडील मंडळी उभी होती आणि जागोजाग लालमातीचे मोठे मोठे बुडबुडे जमिनीतून वर आले होते. ही म्हणे वारुळे ! आस्ट्रेलियातल्या मुंग्या सुद्धा बांधकामशास्त्रात फार पुढारलेल्या. त्यांनी स्तूपाच्या आकाराची प्रचंड वारुळे वीस वीस पावलांवर बांधली होती. झिंज्या-पकाट्ट बुटक्या झाडांचे बन आणि ही फुगी वारुळे पाहून आपण अज्ञात प्रदेशात हिंडणारे धाडशी प्रवासी आहोत असे मला वाटू लागले.

मग सुरेख काळे तांबडे रान लागले. तंबाखूची लागवड दिसली. तंबाखूचा मालक आपल्या रानावरून विमानाने उडत होता. जगात मिळणाऱ्या तंबाखू-पैकी बारा टक्के तंबाखू आस्ट्रेलियात पिकतो तो सगळा हा एकटाच बहाद्दर पिकवीत असावा असे मला वाटले !

वाटेत बॉब नावाच्या शेतकऱ्याच्या वस्तीवर गेलो. कांदे, बटाटे आणि मका पिकविणारा बॉब तीन हजार एकरांचा धनी होता. आम्ही गेलो तेव्हा आभा-ळाच्या त्या टोकाला त्याचे यंत्र तांबडा धुरोळा उडवीत मका पेरताना दिसले. बांधावर बराच वेळ उभा राहिल्यावर, बॉब आणि त्याचे यंत्र आवाज करीत धुरोळा उडवीत आले. माहुताने हत्ती थांबवावा, तसे यंत्र थांबवून बॉब खाली उतरला.

त्याचा मातीने भरलेला हात हातात घेताच मला वाटले, हा बॉब कसला, बुटका आणि अंगाने आडवा असा बाबू थोरातच हा.

या दिवसांत किती पेरून होते, असे मी विचारताच, कागदात तंबाखू घालून सिगरेट वळीत तो म्हणाला,

" पन्नास एकर ! "

मग मी मनाशी म्हणालो, ' हा बाबू थोरात कसला, हा बॉब डेव्हीसच !'

अथरटन् टेबललँडवरून दिवसभर आम्ही काहीबाही पाहात हिंडलो.

आंब्याच्या झाडांना कैऱ्या दिसल्या, एक ठिकाणी मिरचीचे भले उंच एकच झाड दिसले. मी गुपचुप मूठभर मिरच्या तोडून खिशात ठेवल्या. तोंडाला फार अळणी आले होते. हॉटेलात जेवायला जाताना मिरच्या घेऊन जावे, आणि जीभ पोळवावी हा हिशेब. ( केलेल्या सबंध मुक्कामात हे तिखट मला पुरले. )

रात्री अथरटन् गावातल्या एका सुरेख हॉटेलात राहिलो. रानात फिरायला जाताना टायसूटची कटकट कशाला, म्हणून मी अर्धी चड्डी, अर्ध्या बाह्यांचा शर्ट घालून आलो होतो. बरोबर टॉवेल आणि टूथब्रशाखेरीज आणखी काही झेंगट घेतलेही नव्हते. पण अथरटनचे हे हॉटेल भलतेच पॉश होते. 'जेवण-घरात येताना सभ्य गृहस्थांनी कोट आणि टाय घालून जावे' अशी पाटी वाचताच मी बाहेर सटकलो आणि रस्त्याकडेच्या एका ग्रीन कॅफेत, खुंटावर बसून जेवून आलो.

मालकीणकाकूंना हा हिंदू माणूस जेवत नाही याचे कारण धार्मिक असावे असे वाटले. त्यांनी पुन्हा पुन्हा बॉब लोगनला सांगितले की,

"तुझ्या मित्राला काय हवे ते आम्ही मिळवून देऊ. त्यांना शाकाहारी जेवण करून त्यांच्या खोलीत पाठवू दे का ?"

यावर बॉब गंभीर चेहऱ्याने म्हणाला,

"मला वाटते, त्याचा आज उपवास असावा. थँक्यू मादाम !"

यावर बाईंनी मोठ्या कौतुकाने माझ्याकडे पाहिले, आणि म्हटले,

"मग काही हरकत नाही, हो !"

मी मांसमच्छर खाऊन भरल्या पोटाने काऊंटरपाशी उभा होतो तो चेहरा वळवून भिंतीवरची चित्रे पाहू लागलो.

सकाळी मालकीणबाईंनी दिलेली दूधफळे घेऊन मी आदल्या रात्रीचा उपास सोडला आणि अथरटनही सोडले. अमकी फॅक्टरी, तमका तलाव, असे काहीबाही बघत, उंच उंच झाडे, किर्र जंगल, वेडेवाकडे घाट, खोल दऱ्या-झुळझुळते झरे मागे टाकत भन्नाट परत आलो.

रात्री अंथरुणावर अंग टाकल्यावर कितीतरी वेळ माझ्या डोक्यात मोटरीचा आवाज भरभरत होता, झाडेझुडे उलट्या दिशेने पळत होती. अंगाखाली रस्ता सरसरत होता.

दुसऱ्या दिवशी, सिटी आणि शायर कौन्सिलसने सन्मान्य पाहुणा म्हणून माझा पाहुणचार केला. हार्बर बोर्डच्या मालकीच्या 'wongable' नावाच्या लॉंचमधून मला 'ग्रीन आयलंड' ला नेऊन तिथली अंडरवॉटर ऑब्झर्वेटरी दाखवावी असे फर्मान सुटले.

केन्सपासून सोळा मैल आलेल्या ह्या सुंदर बेटाकडे मी निघालो, तेव्हा उभ्या लॉंचमध्ये मी एकटाच प्रवासी होतो. बॉब लोगन पाठराखणी होता.

माणदेशात जन्म झाल्यामुळे वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत मी दर्या पाहिला नव्हता, मग पाण्यातला प्रवास कुठला? निळ्याभोर दर्यातून लॉंच ग्रीन आयलंडकडे जाऊ लागली तेव्हा चाक मारणारा नाकेला कप्तान माझ्याकडे बघून म्हणाला,

"यू आर द सेकंड इंडियन दॅट आय एम् कॅरिंग इन् धिस् लॉंच टु ग्रीन आयलंड!"

मी विचारले,

"एम् आय्? मे आय नो प्लीज हू वॉज द फर्स्ट फॉर्च्यूनेट वन्?"

कपितान बोलला,

"जनरल करिआप्पा."

मी सावरून बसलो.

कपितान् पुढे म्हणाला,

"आय रेकन्, ही इज ए मायटी मॅन."

मी भुवया चढवून आणि मान झुकवून म्हणालो,

"माय वर्ड–"

"अहो, थोडा वेळ इकडचे तिकडचे बोलल्यावर तुमचे करिआप्पा म्हणाले, मी आता थोडीशी झोप घेतो" आणि (इथे कप्तानाने चाक सोडून टाळी वाजवली) "असे झोपी गेले. किती? दहाएक मिनिटं. पुन्हा जागे झाले आणि बोलू लागले. मी विचारले, 'अशी हुकमी झोप कशी घेता येते? तर' म्हणाले, 'तशी मी तिला शिस्त लावली आहे. धन्य आहे!'"

थोड्याच वेळात बोट डुलू लागली आणि मला पेंग येऊ लागला. बॉब कपितानाकडून चाक कसे फिरवायचे हे समजून घेत होता, तंगड्या फासकटून उभ्या राहिल्या राहिल्या, डाव्या उजव्या बाजूला कलंडत होता. चाक हाणीत

होता. हसत होता. मला बोलवत होता. पण पाळण्यातल्या पोरासारखी मला गुरूगुरू झोपच आली. मागल्या फळीला पाठीचा टेका देऊन मी बसल्या बसल्याच घोरू लागलो.

बऱ्याच वेळाने 'ग्रीन आयलंड' आले. तीस एक एकराचे हे लहानसे प्रवाळ बेट झाडाझुडपांनी हिरवेगार दिसत होते. आजूबाजूला निळेभोर पाणी, उन्हात चमकणारा सफेत वाळूचा किनारा, रंगीबेरंगी छोटी छोटी घरे, आणि इकडून तिकडे धावणारी, पाण्यात डुंबणारी, वाळूत लोळणारी गुलहौशी जोडपी, त्यांची नितळ उघडी अंगे, आणि स्वच्छ मोकळे हसणे बोलणे...परीकथेतील राजपुत्रासारखा मी या पाण्यातल्या ग्रहावर उतरलो.

मऊ वाळूत पाय रोवत हिंडलो, गार सावलीत उभा राहिलो, समुद्रावरचा खारा वारा हुंगला, गर्द झाडीतून भरारणारी पाखरे पाहिली. बॉबला चुकवून झाडीत शिरलो. थंड बुंध्याला विळखा घालून उगीच उभा राहिलो. उत्तम कविता वाचली, चित्रपटातला उत्तम प्रसंग पाहिला, कुणी लिहिलेला सुंदर प्रसंग वाचला की, डोळयाला पाणी येते तसे झाले. समोर, क्षितिजापर्यंत पसरलेल्या सागराकडे बघत मी कितीतरी वेळ उभा राहिलो.

बेटाच्या एका अंगाला पाण्यातला बराच भाग उघडा पडला होता, पाऊल बुडेल एवढ्या पाण्यातून हिंडून मी आणि बॉबने नाजूक प्रवाळ झेले गोळा केले. विविध आकारांचे प्रवाळ सापडत होते, एकापेक्षा दुसरे अधिक सुंदर. शिंपल्या वेचणाऱ्या पोरांसारखी आमची धांदल उडाली.

आम्हाला अजून जेवायचे होते. तीही सोय हार्बर बोर्डातर्फे झाली होती. दुपारचे दोन वाजून गेल्यामुळे हॉटेलात कोणी नव्हते. बॉबने तिकीट दाखवताच बाई म्हणाल्या,

" तुम्हाला थोडा वेळ थांबावे लागेल हं ! "

बॉब आणि मी टाळया वाजवीत टेबलाशी बसून राहिलो.

हॉटेलच्या खिडक्यांतून नाना रंगाचे शिंपले, सुरेख रंग दिलेले प्रवाळ झेले ठेवले होते. पेंढा भरलेल्या सुसरीही होत्या.

मी विचारले,

" बॉब्, सुसरीच्या शिकारीचे काय झाले ? "

थॉम् वाईट चेहरा करून म्हणाला,

" हो, मला सिडनीहून जे. डी. नी तसं लिहलं होतं पण मी नुकताच इथं बदलून आलोय. माझे कुठं कान्टॅक्टस नाहीत. प्लीज जे. डी. ना सांगू नकोस हं. म्हणावं प्रयत्न केला पण जमलं नाही. "

मी म्हणालो,

" बरं. "

ग्रीन आयलंडला भेट हे काही माझ्या कार्यक्रमात नव्हतं. तो योग अचानक जुळून आला होता. सुसरीच्या शिकारीवर पाणी सोडणं भाग होतं

मी विचारले,

" माझं मी शिकारीचं जमवायचं म्हटलं तर फार खर्च येईल का ? "

" हो, पुष्कळच येईल. तुला कसं साध्य आहे ते ? "

" नाही ही गोष्ट खरी ! "

झकास जेवून आम्ही बाहेर पडलो आणि पाण्याखालचे जग पाहण्यासाठी गेलो. बेटापासून ऑब्झर्वेटरीपर्यंत आलेला छोटासा लाकडी पूल पार करून गेल्यावर, पाण्याने झाकलेली लहानशी लाकडी खोली होती. या खोलीत शिरून आम्ही तीसएक पायऱ्या उतरून, सोळा फूट पाण्याखाली गेलो. खाली सत्तर टन वजनाची, पोलादी चेंबर होती आणि तिला दोन्ही अंगाला मिळून बावीस गोल खिडक्या होत्या. खिडकीच्या जाडकाचेला नाक लावून पाहिले की, पाण्यातले अद्‌भुत जीवन दिसत होते. प्रवाळाच्या बागा, नाना रंगांचे, नाना जातीचे मासे, समुद्रमुळे, लहानशा मुलाला आत बसवून न्हाऊ घालता येईल एवढ्या प्रचंड शिंपा !

निळ्या पाण्यात रंगाची उधळण होती, रंगीबेरंगी प्रकारचे झेले डोलत होते. प्रचंड शिंपल्यांची तोंडे हलत होती. सारडीनसारख्या माशांच्या झुंडीच्या झुंडी येत होत्या आणि जात होत्या. अंगावर लाल पट्टे असलेले विदूषक जसे प्रवाळातून सावकाश हिंडत होते ! किती रंगाचे, किती आकाराचे, किती जातीचे प्रवाळ होते.

पुष्कळशा खिडक्यातून ताऱ्यांच्या आकाराचे CORAL POLYPS दिसत होते. पाण्याच्या झुळुकाबरोबर ते धुगधुगत होते. आपल्या डोळ्यांना न दिसणारे अन्न गोळा करीत होते. या लहान जिवांनीच म्हणे सबंध क्वीन्स लँडच्या सागर-

किनाऱ्यावर बाराशे मैल लांबीचा प्रवाळखडक निर्माण केला. ग्रेट बॅरिअर रीफ.

पाव टन वजनाचे आणि चार सहा फूट लांबीचे शिंपले तोंडे उघडत होते. मिटत होते. एवढे महाकाय शिंपले जगात इतरत्र कुठल्याही सागरात सापडत नाहीत. समुद्रतळाशी जाणाऱ्या माणसाला हे शिंपले पकडतात, गिळून टाकतात असा प्रवाद आहे. पण तसे प्रत्यक्ष घडल्याचे उदाहरण नाही.

तास दीडतास रेंगाळून मी त्या बावीस खिडक्यांतून सागराचे ते वैभव पाहिले आणि थक्क होऊन वर आलो.

ही पोलादी खोली पाण्यात बुडवावी आणि शास्त्रज्ञांबरोबरच पोराबाळांनी-सुद्धा निसर्गाचे हे कवतीक बघावे ही कल्पना मुळात दोघा शिकाऱ्यांची. VINCE VLASOFF आणि LIOYAD GRIGG अशी त्यांची नावे. एक इंजिनियर होता. दुसरा नुसताच शिकारी होता. पण दोघेही नादी आणि कल्पक. या दोघांनी ही कल्पना लोकांपुढे मांडल्यावर त्यांना कोणी खुळ्यात काढलं नाही. बरे यांनीही नुसत्याच बावळ्या उडवीत काळ काढला नाही. ते कामाला लागले, आणि लोकांकडून त्यांना सगळी मदत मिळाली. आपल्याला या कामात अपयश आलं तर काय होईल, अशी भीती आस्ट्रेलियात कुणाला वाटत नसावी.

एखाद्याने प्रयत्न केला आणि त्यात त्याला अपयश आलं तर तिकडे लोक म्हणतात,

" Well, good on him, he had a go. "

पंचवीस फूट लांब, आठ फूट रुंद आणि सात फूट उंच असे हे भांडे समुद्रात बुडवायची ही कल्पना ह्या दोघा बहाद्दरांनी बारा महिन्यांत अंमलात आणली. केन्सला बांधलेले हे धूड, समुद्रातून सात मैल आत कसे नेले आणि कसे बुडवले हरी जाणे !...

ते सुंदर बेट सोडून मी परत लॉंचवर चढलो. आणि केन्सच्या दिशेनं निघालो तेव्हा सागर थोडाफार खवळला होता, प्रचंड लाटा उठत होत्या. खाऱ्या पाण्याचे सपकारे आत येऊन अंग भिजवीत होते. आमच्यापैकी कोणीच बोलत नव्हते. बॉब पाय पसरून गप्प बसला होता, कपितान चाक मारीत होता. त्याचा मदतनीसही गप्प बसला होता. मग मीही गोगलगाई-सारखा हळूच आकसलो आणि आपल्या कवचात शिरलो.

चार दिवसांचा मुक्काम संपवून मी केन्सहून लॉंगरीचला जाण्यासाठी निघालो. तेव्हा बॉबने आपल्याजवळचा, ओपेलच्या खाणीतला एक सुरेख दगड मला दिला. काळपट, निळसर अशा या जाड दगडावर इंद्रधनुष्यासारखे नाना रंग असलेला ओपेलचा थर होता.

बॉब म्हणाला,

" केन्समधल्या मुक्कामाची आठवण हा रंगीत खडा तुला देईल ! "

माझ्या लिहिण्याच्या टेबलावर हा दगड मी आता ठेवून दिला आहे.

## १३

# प्रदर्शन

निसर्ग चित्रांचे ते प्रदर्शन मला आवडले. प्रदर्शन एकाच चित्रकाराचे होते. सगळी मिळून पंचवीस एक चित्रे होती. आता कालबाह्य गणल्या जाणाऱ्या पारंपरिक पद्धतीने पारदर्शक जलरंगात ती केलेली होती. तसे जलरंग हे माध्यम मर्यादा असलेले आहे. ( लघुकथा आणि कादंबरी ह्या दोन्हींमध्ये असते तसेच अंतर जलरंगात आणि तैलरंगात असते. ) ही मर्यादा ओळखून चित्रकाराने चित्राचा आकार ठरवला होता.

शिवाय मला विशेष अशी एक गोष्ट जाणवली. ही सगळी चित्रे खास मराठी होती. एका मराठी मनाचे हे सर्जन होते. जसे भजन ऐकताना वाटते, कीर्तन ऐकताना वाटते, तसे हे प्रदर्शन पाहतानाही वाटत होते की, अरे, हे अगदी आपले आहे.

भल्या सकाळी सकाळी रानात पेटलेल्या गुऱ्हाळाचे एक चित्र होते. थंडगार सकाळ होती. आभाळ अजून पुरते उजळून गेले नव्हते. रान थंड होते, झाडेझुडपे थंड होती. अजून पाखरे जागी झालेली नव्हती आणि शेंदरी लाल असे गुऱ्हाळ मात्र नुकतेच पेटले होते. अजून वारा सुटलेला नव्हता. त्यामुळे धुक्यापेक्षा जाड असा धूर गुऱ्हाळाच्या चुलवणावर रेंगाळत होता.

उकळल्या रसाचा आणि पाचोऱ्यांचा करपट धुरकट वास हे चित्र

पाहताना येत होता; आणि मोकळ्या रानातला गारठा अंगावर काटा उभा करीत होता.

आणखी एक, खिंडीतील लाल रस्त्याचे चित्र होते. चित्रात मोजक्या अशा तीनच गोष्टी होत्या. उजव्या बाजूला निळा जांभळा असा भव्य कडा, उद्दाम उभा होता. डाव्या बाजूलाही थोडा कमी उद्दाम असा कडाच होता, आणि ह्या दोन पाषाणकड्यांमधून, पाऊल बुडेल असा लाल धुळीने भरलेला रस्ता, वळण मारून आपल्या अंगावर येत होता. पार पलीकडे दूरवर सळनळीत आभाळ दिसत होते. आभाळात ढग नव्हते आणि जमिनीवर कुठे झाड-झुडूपही नव्हते. म्हणजे लाव्हा रसाने बनलेल्या बोडक्या डोंगरातली ही बऱ्याच उंचावरची खिंड होती.

खिंड ह्या शब्दाभोवती भावभावनांचे एक मोठेच वर्तुळ आहे. खिंडीत गाठले, खिंडीत सापडलो, खिंडीत लुटले असे वाक्प्रचार आपल्या कानांवर सतत पडत असतात आणि पावनखिंडीतला तो धीरोदात्त संग्राम तर ओतुरकर-कृत सोपपत्तिक इतिहासाच्या वाचनापासून आपल्या मनात घर करून राहिलेला असतो.

वर्ण्य विषयाच्या ठळकपणामुळे म्हणा, विशिष्ट रचनेमुळे म्हणा, किंवा मनावरच्या ह्या ठशामुळे म्हणा, हे निसर्गचित्र मला फार आवडले. आपल्या खिशाला परवडले तर आत्ताच हे इथून उचलायचे आणि आपल्या अभ्या-सिकेत नेऊन टांगायचे असे मी ठरवून टाकले.

दुरून पाहात होतो तो जवळ गेलो आणि वाकून किंमत वाचली.

बोटभर चिठ्ठीवर लिहिले होते—

SOLD OUT.

आणखी एक चित्र होते. धुवांधार पाऊस पडून गेला होता तरी आभाळात ढग होतेच. झाडेझुडे ओलीचिंब झालेली होती. जमिनीवर पोपटी रंगाचे गवत सर्वत्र माजलेले होते आणि चंद्रभागेच्या आकाराची नदी लाल पाण्याचा विस्तृत संथ प्रवाह घेऊन धो धो वाहात होती. लाल पाण्याचा प्रवाहच तेवढा डोळ्यात भरत होता. ह्या चित्राकडे पाहता पाहता प्रवाहाची गाज कानावर येत होती. मातीचा सुगंध जाणवत होता आणि येताना छत्री आणायला पाहिजे होती असे पटकन मनात येऊन जात होते.

सगळीच चित्रे 'पिक्चरस्क' होती. एका चित्रात एकच वर्ण्य विषय होता.

कुठे तळ्याकाठची काळी जांभळी दगडी देवळे शेवाळल्या पाण्यात प्रतिबिंबे टाकून निर्विकार उभी होती. कुठे वरड तांबड्या डोंगरमाथ्यावर तीनशे वर्षांपूर्वी बांधलेल्या किल्ल्याचे अवशेष खिन्नपणे खडे होते. कुठे हिरव्याकंच डोंगरदरीत पाऊस कोसळत होता, थेंब सहस्रशः फुटत होते, वातावरण धोंधाटले होते, तर कुठे दोन्ही अंगांना वृद्ध वटवृक्षांच्या ओळी असलेला रुंद रस्ता भर उन्हात सावल्यांची नक्षी अंगावर लेवून सुम्म पडून होता.

मला प्रदर्शन आवडले आणि चित्रकारही आवडले. त्यांचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार होते, पण चट्टेरीपट्टेरी आणि तंग तोकड्या कपड्यांनी, गलमिश्यांनी आणि हनुवटमाखल्या दाढीनं त्यांनी ते विचित्र बनले नव्हते. त्यांचे डोळे स्वप्नाळू नव्हते. मुद्रा गंभीर हरवलेली नव्हती. घरातील समारंभप्रसंगी करावे तसे ते आल्यागेल्याचे स्वागत करीत होते. हसऱ्या चेहऱ्यांनी दोन शब्द बोलत होते आणि त्यांची कृतार्थ गृहिणी, डोक्यावर पदर घेऊन प्रसन्न चेहऱ्याने आपल्या पतीशेजारी उभी होती.

माझ्या मनात आले की, ह्यांचे बरे आहे. लेखकासारखे नाही. लेखकाला नाही म्हटले तरी कुणावर तरी तोंड टाकावे लागते. कुणापुढे तरी पाटीवर लोळण घेऊन पोट दाखवावे लागते, कधी चार उड्या मारून दाखवाव्या लागतात, थाप मिळावी म्हणून कुणापुढे तरी पाठ करावी लागते. तसे ह्यांचे खचितच नाही.

शिवाय, विचार हा ह्यांचा कच्चा माल नाही. सारखा मेंदू पिंजून काढण्याचे ह्यांना कारण पडत नाही. दार बंद करून सहा सहा तास टेबलाशी बसावे लागत नाही. ब्रश, रंग, फलक, कागद आणि बाटलीभर पाणी (पाणी हं!) एवढे साहित्य बरोबर घेऊन हे बाहेर पडू शकतात. डोंगरपायथ्याशी, तळ्याच्या काठाशी, नदीतीराशी बैठक मारून काम करू शकतात. मोकळ्या रानात कुठेही उंचावर बसून एखादा मुठीएवढा पक्षी जसा स्वतःच्या आनंदासाठी गळा मोकळा करून गात राहतो, तसे हे चित्र रंगवू शकतात. स्वतःच्या इच्छेनुसार नटवे किंवा सभ्य रंग वापरू शकतात.

चित्रकाराला त्याच्या दैनंदिन व्यवहारात रंग वापरावे लागत नाहीत.

लेखकाला मात्र शब्दच वापरावे लागतात. कोट्यवधी लोक नित्य व्यवहारात वापरतात तेच शब्द, एखादा मागतकरी जसा गृहस्थाने उंबऱ्याच्या आतून अंगावर फेकलेले वस्त्र वापरतो, तसे त्याला वापरावे लागतात. वापरलेले, झिजलेले, विटलेले, तेच शब्द घेऊन त्याला साहित्यनिर्मिती करावी लागते, आपल्याला सांगावयाचे ते सांगावे लागते.

शब्दापेक्षा रंग हे कमी वापरातले माध्यम चित्रकाराचे असते म्हणून तो भाग्यवान !

लेखक होण्याची चूक आपण का बरे केली ?

चित्रकारांचे लक्ष माझ्याकडे गेले.

" नमस्कार. "

" नमस्कार. "

" वाः तुम्ही आलात आनंद झाला. "

" प्रदर्शन पाहून आम्हालाही झाला. "

" आवडलं ? "

" उत्तम ! मुंबईला कसं काय ? "

" प्रेक्षक खूप होते. मला धास्ती होती की आमचा हा जुनापुराणा माल आता कोण पाहणार ! जमाना फार बदललाय राव. पण छान रिस्पॉन्स दिला लोकांनी. "

आवाज थोडा खाजगी करून त्यांनी विचारले, " किंमती फार ठेवल्यात असं वाटतं का ? "

माझ्या स्वतःच्या खिशाला त्या जास्तीच होत्या. म्हणालो,

" आमच्यासारख्यांना नुसतं पाहून आनंद मानण्याची सवय असते. धनिकांना ही किंमत मुळीच जास्त नाही. "

" मला संकोच वाटला सुरुवातीला, पण मुंबईच्या काही मित्रांनी सांगितलं की ह्या किंमती ठेवा आणि आश्चर्य म्हणजे बरीच चित्रं विकली गेली ! ही तिन्हीही चित्रं बाराशेला घेतली एकानं. "

मी नजर टाकली तर पहिलेच चित्र खिडकीतील लाल रस्त्याचं होतं !

मला संतोष झाला.

हौसेने उत्तम बंगले बांधणाऱ्या ह्या शहर पुण्यातील घरमालकांना आपल्या

हॉलमध्ये दोनचार चित्रे जरी लावावी वाटली तरी पुरे. अशी प्रदर्शने सालोसाल भरतील.

मी सहज बोलून गेलो, " ते खिडकीतील लाल रस्त्याचं चित्र मला फार आवडलंय; पण ते विकलं गेलंय ! "

" जाईना का, मी तुम्हाला पुन्हा करून देईन. "

ओशाळवाणे हसून मी म्हणालो, " हो, पण त्याची किंमत लेखकाला कशी परवडणार ? "

चित्रकारांनी मनापासून विचारलं,

" तुमच्या एका उत्तम कथेला संपादक जेवढी किंमत देतात तेवढी द्याल ? "

" अगदी आनंदानं ! "

" मग हे चित्र मी तुम्हाला दिलं ! "

चित्रकारांनी आपला उष्ण हात माझ्या हातात दिला. तो स्नेहपूर्ण स्पर्श होताच मला मनोमनी वाटले –

लेखक होऊन आपण तशी, फार मोठी चूक केलेली नाही.

## १४

## माकडास पाहून–

सकाळी नऊ वाजता घरापुढच्या रस्त्यावरून डिग् डिग् डिग् असा कुड-बुड्याचा आवाज ऐकू आला म्हणून मी खिडकीतून डोकावलो तर आपला सगळा धंदा सायकलवर लादून कोणी माकडवाला चाललेला होता.

एक लहानशी लाकडी हातगाडी त्याने सायकलच्या कॅरेजला आडवी बांधली होती. त्याचा हुप्प्या माकड, देवजी धसाडे ह्याला त्याने डबलसीट घेतले होते. लहानखुऱ्या अंगाची भागाबाई माकडवाल्याच्या खांद्यावर तोल सावरीत बसली होती आणि डाव्या हाताने सायकलचा तोल संभाळीत माकडवाला कुडबुडे वाजवत होता.

डिग् डिग् डिग् डिगर्र डिगर्र.

ही हिंडतीफिरती सर्कस आज इकडे कुठे म्हणून मी बाहेर येऊन पाहात उभा राहिलो.

मला पाहून माकडवाल्याने एक पाय लांबवून जमिनीवर टेकला, सायकल थांबवली आणि खास कमावलेल्या आवाजात विचारले,

" काय सायेब, खेळ करायचा का ? ".

तोवर घरातील मुलेही बाहेर आली होती ती टाळ्या पिटून म्हणाली,

" करायचा, करायचा ! "

घरात मुले आहेत ते बघून माकडवाल्याला धीर आला: तो सायकलवरून उतरलाच.

मी विचारले,

" अरे, पण तुझी बिदागी काय ? "

" ऐशी पैसे द्या सायेब ! "

बाटा कंपनीच्या पादत्राणासारखी त्यानेही अडनाडी किंमत का सांगितली हे मला कळले नाही.

" बरं, देऊ ऐशी पैसे. होऊन जाऊ दे खेळ. "

माकडवाल्याने स्टॅण्ड पाडून सायकल फाटकाशी उभी केली आणि प्रथम ती खेळातली हातगाडी सोडली. दरम्यान भागाबाई आणि देवजी ह्यांच्या गळ्याच्या साखळ्या त्याने पायाखाली धरल्या होत्या. दोन्ही माकडे दोरीशी ओढ घेऊन रस्ता शोधीत होती.

अंगणात येऊन मध्यभागी माकडवाल्याने बैठक मारली. जवळ पोतडी होतीच. देवजीच्या गळ्याला असलेल्या दोरीला हिसके देऊन हातातील काठीच्या धाकावर हवे ते काम करून घेण्याचा माकडवाल्याचा इरादा दिसला.

दोन्हीही माकडे फार त्रयस्थासारखी वावरत होती. त्यांना ह्या खेळात स्वारस्य नव्हते. लोकांपुढे येणे, हशा, टाळ्या घेणे ह्या गोष्टींचा त्यांना मुळीच तेगार नव्हता, त्यांची दृष्टी अंगणभर भिरभिरत होती. रांगत्या पोरांना जसे जमिनीवर सांडलेले काहीबाही लगेच दिसते, आणि ते तोंडात घालण्याची घाई होते, तसे त्यांचे चालले होते.

कुडबुड्याचा आवाज ऐकून शेजाऱ्यापाजाऱ्यांची आठ-दहा मुले आता अंगणात गोळा झाली होती. आणखी काही येत होती. प्रेक्षकांना तोटा नव्हता.

माकडवाला चांगला जवान आणि पोरगेला होता. त्याचा वर्ण काळा होता. ओठावर मिश्या होत्या. दंड पिंढऱ्या चांगल्या मजबूत होत्या. खेळ करून दाखविण्यात त्याला आनंद वाटत होता असे दिसले. मळकट पोतडीतून त्याने एक तांबड्या साटीनची विटकी चड्डी बाहेर काढली. ( तिच्या बुडावर मोठे भोक होते. ) देवजीला जवळ बोलावून त्याला त्याने ही चड्डी नेसवली आणि काळ्या रंगाचे एक जाकीट त्याच्या अंगावर चढवले. त्या पूर्ण पोषाखात देवजीचे ध्यान मोठे विनोदी दिसू लागले.

ती खेळण्यातली हातगाडी पुढे करून मालकाने देवजीला इशारा केला. देवजीने तो मुळीच ऐकला नाही. मालकाने चिडून दोरीला हिसका दिला, आपल्या भाषेत शिवी हासडली. तसा देवजीही बिथरला. तोंडाचा 'ओ' करून तो मालकावर गुरगुरला. तरी पण काठीचा धाक होताच. रागारागाने त्याने कशीतरी ती हातगाडी पकडली, आणि ती दरादरा ओढून मालकाभोवती एक-दोन चकरा मारल्या. हातगाडी भिरकावली व 'खड्ड्यात जा तू, आणि तुझा खेळ' असा चेहरा करून तो पाठ फिरवून बसला.

हे मालक आणि मजूर असे नाते होते. भांडवलदाराविषयी सर्वत्र श्रमिकांना जे वाटते तेच देवजीला मालकाविषयी वाटत असावे. पिळला जाणारा श्रमिक जसा वागतो तसाच तो वागत होता.

मालक अधूनमधून डिग् डिग् कुडबुडे वाजवीत होता आणि कॉमेंट्री करत होता—

"अरे बिस्र्या देवजी, पोटासाठी आपगाला हातगाडी वढावी लागती, तू तिचा कट्टाळा करू नकस. अरं बिस्र्या, आराम हराम हाय. काम दावशील तर सायेब दाम दील, नखरा करशील तर तुला कोनी पुसनार नाही."

गोष्ट खोटी नव्हती!

ह्या सर्व खेळाची हिरॉईन भागाबाई होती. पण तिला स्कोप कमी होता. ती खाका खाजवीत उगीच बसली होती. मालकावर चिडलेला देवजी मधून तिच्यावर राग काढीत होता.

मुले खेळात रंगून गेली होती.

मग माकडवाल्याने निळया रंगाची एक विदूषकी टोपी पोतडीतून काढली, एक लाकडी बैठक काढली, एक लहानसा आयना काढला. देवजीची दोरी ओढून त्याला जवळ घेतला, कुस्तीच्या फडात पहिलवानाला फेटा बांधावा तशी ती टोपी देवजीच्या डोक्यावर चढवली. ठोकळा बुडाखाली घेऊन, एक पाय मांडीवर ठेवून देवजी रुबाबात बसला आणि आयन्यात आपले झोकदार रूप पाहू लागला.

मुलांना फार हसू आले. पुढे वाकूनवाकून ती हसत होती, आणि डोळ्यांत भरलेले पाणी पुसत होती.

मग मालकाभोवती दोन चकरा मारून देवजी पैठणपेठेची साडी भागाबाई-

साठी घेऊन आला. त्याने ती अंगावर टाकताच भागाबाईने त्रागा केला. तिला पोत, काठ पसंत नव्हते.

"अग भागाबाई, नवऱ्यानं आणलं ते गोड मानून अंगावर ल्यावं. हसून त्याला सामोरं जावं," असं माकडवाला सांगत होता. तरी भागाबाई झटक्याने साडी दूर टाकून देऊन पाठमोरी बसत होती.

त्याबरोबर देवजीला अचानक संताप आला आणि काठी घेऊन त्याने तुफान मारझोड सुरू केली.

"अरे बिऱ्या देवजी, आता पयला काळ गेला, बायकूला मारू नकोस. ती कोर्टामधी जाईल, मोठ्ठा वकील देईल आन तुजपासनं काडीमोड घेईल. बिऱ्या, तुज्या भाकर-तुकड्याची पंचाईत होईल."

असे चार समजुतीचे शब्द माकडवाल्याने ऐकवले तेव्हा, बायकोला मारायचे सोडून देवजीने मालकालाच चार धपाट्या घातल्या. हा प्रकार घेरावच्या पुढचा होता. वास्तविक ह्या क्लायमॅक्सवर खेळ संपायला हवा होता. पण आतापर्यंतच्या रसांत करुण रस आलेला नव्हता. त्यामुळे माकडवाल्याने देवजीला लढाईवर पाठवले. भागाबाईने शोक केला. लढाईवर गेलेला देवजी धाडकन वर्मी गोळी लागून कामास आला आणि इथे खेळ संपला.

माकडवाला आवराआवर करू लागला. तोवर मरून पडलेला देवजी उठून बायकोपुढे जाऊन पाठमोरा बसला होता आणि ती गृहिणी त्याचे केस साफ करीत होती. ह्या जोडप्यातील हे सामरस्य पाहून मला भरून आले.

ऐशी पैसे बिदागी घेऊन माकडवाला उठला. त्याने हातगाडी कॅरेजला बांधली, पोतडी खांद्याला अडकवली. सायकल उभी करताच देवजी उडी मारून दांडीवर बसला. भागाबाई त्याच्या पुढ्यात बसली. डिग् डिग् डर्र्रर्र डिग करीत माकडवाला पुढच्या दाराला निघून गेला. आता त्याला पुढच्या दारापुढेही हेच सगळे पुन्हा करून दाखवावे लागणार होते. प्रत्येक घरापुढे नवी उडी देवजीला मारावी लागणार होती. ह्याला उडी मारता येते हे गृहीत धरून पैसे कोण देणार ?

तुमचे आमचे तरी काय असेच असते. प्रत्येक वेळी नवी उडी मारून दाखविल्याशिवाय आपल्याला तरी कोण बिदागी देतो ?

दहा वाजून गेले होते. घाई–गडबडीने मी ऑफिसला जाण्यासाठी तुमान चढविली. मनात आले–

रखड रखड रखड
    जरी फाटते तुमान
ठिगळाविण वसन इथे
    नच नभासमान !

## १५

## पर्जन्यात् अन्नसंभवः ....

आक्काला माहेरी आणून सोडायला किंवा परत न्यायला तिचा सासरा यायचा. डोक्याला जरीकाठी रुमाल, अंगात गोल अंगरखा, पारशी कोट, धोतर आणि पायात लाल जोडा असा त्यांचा पोशाख. तोंड सदा पानाने रंगलेले. त्यांना आम्ही नाना म्हणत असू.

नानांच्या घोड्यावर भली मोठी पडशी असे येताना तिच्यातून ते काहीनाही आणत. भाजीपाला, धान्यधुन्य, मुळे, फळे असे काहीही. त्यांनी अंगणात घोडे आणून बांधले, खोगीर काढून सोप्यात टाकले आणि पडशी माजघरात मोकळी केली की, आम्हाला त्यांनी त्यांच्या घोड्याला लागणाऱ्या पेंडीसाठी धावपळ करावी लागे. तेव्हा आमच्या घरी शेतीभाती नव्हती. कुणाकडून तरी मागून आणून वैरणीची पेंडी घोड्याला घालावी लागे.

दुपारी जेवणखाण झाले की, नाना सोप्याला बसून पान कुटत. कुटलेल्या पानातला एवढासा लगदा ते आम्हालाही देत असत. पण हे बक्षीस मिळविण्यासाठी आम्हाला त्यांनी घातलेल्या तोंडी हिशोबाची उत्तरे द्यावी लागत.

नाना पान कुटता कुटता विचारत—

“ कितवीत गेला रे तू आता ? ”

“ दुसरीत. ”

" बेरीज वजाबाकी झाली का ? "

" हो. "

" मग सांग बघू, सत्ताविसातनं नऊ गेले, राहिले किती ? "

थोडा वेळ बोटे मोडून मी ओरडायचो—

" अठरा. "

नाना म्हणायचे, " चूक. "

नानांचा हिशोब इतका साधा, सोपा नसायचा. त्यात काहीतरी गोम असायची.

" अरे लेको, या माणदेशात राहता आणि हा हिशोब येत नाही ? "

आता, कुठे राहतो याचा आणि हिशोबाचा काय संबंध ? आमची उत्सुकता बराच वेळ ताणून शेवटी नाना खुलासा करायचे—

" एकूण नक्षत्रं सत्तावीस. त्यांतली पावसाची नऊ नक्षत्रं जर गेली, म्हणजे कोरडी गेली, पाऊस पडला नाही तर काय उरतं ! काही नाही. दुष्काळ. पाणी नाही, पिकं नाहीत, गुरंढोरं नाहीत, काहीच नाही. म्हणून या हिशोबाचं उत्तर शून्य. सत्ताविसातनं नऊ गेल्यावर खाली उरतो भोपळा ! "

हा पावसाचा महिमा लहानपणापासून आम्ही ऐकला. या देशातल्या माणसाइतका आणखी कुणाला तो कळला असेल की नाही मला नाहीत नाही. आमचे सगळे जगणेच पावसावर अवलंबून असते. ' इथं इथं बैस रे मोरा ' किंवा ' एक होती चिऊ, एक होता काऊ ' प्रमाणे ' येरे येरे पावसा ' हे गाणे बालपणीच आपल्याला पाठ होते. पावसाने यावे म्हणून त्याला पैसा देण्याचे आमीष दाखवायचे ( तेसुद्धा खोडकर खोटे ) आणि मग मोठा पाऊस आला की नाचायचे. मुलांनी असे नाचायचे तर बायकांनी जात्यावर ओव्या म्हणायच्या.

पाऊस पडतो मृगाआधी रोहिणीचा, पाळणा हालतो भावाआधी बहिणीचा. पावसाबद्दल एवढा भक्तिभाव का, तर पर्जन्यात् अन्नसंभवः .... मुख्य हे की काळी पिकली पाहिजे.

' वॉल्डन ' या आपल्या पुस्तकात थोरोने तक्रार केलेली आहे की, अमेरिकेत कृषिवलांना आपल्या व्यवसायाबद्दलचे पावित्र्य व्यक्त करता येईल असे सण, उत्सव नाहीत. आमच्याकडे कितीतरी आहेत. नवान्न पौर्णिमा आहे,

बेंदूर किंवा पोळा आहे. नवरात्रात घरात धान्य लावायचे आणि दसऱ्याच्या मिरणुकीत त्याचे पोपटी तुरे फेट्यात खोचायचे. सोन्याबरोबर बाजरीची कणसे, लिंबूरही वाटायची. पेरणीआधी टिपण पुजायची. नव्या विहिरीला पाणी लागले की, त्याचीसुद्धा पूजा. काळीला आईच म्हटल्यावर पूजा नाही, उत्सव नाही असे कसे होईल.

माणूस हा देवपुत्र कसला, तो निसर्गपुत्रच. दुष्काळी मुलुखातल्या, लहानशा गावात बालपण गेले म्हणजे पावसाचा मोठेपणा जास्त कळतो.

काळेनिळे ढग आकाशात जमून कसा गडगडाट होतो. वीजबाई कोसळू नये म्हणून मग घाईगडबडीने अंगणात पहारी टाकायच्या.

धो धो पाऊस कोसळला आणि रस्त्यारस्त्यांवर गढूळ तांबड्या पाण्याचे लोट वाहू लागले की—

"अगाबाबा, मायंदाळ पानी आदाळलं आज!" म्हणून ओढा बघायला धावायचे.

काळी पांढरी माती भिजून कसा घमघमाट सुटतो. गुरेवासरे कशी आखडल्या अंगाने उभी राहतात. कोंबड्या फुगून आडोशाला बसतात. भिजलेल्या शेरडाकरडांचा वास झोपड्यांतून पसरतो. लगेच चार दिवसांत नाही तेथे नवे कोंब कसे तरारून येतात, कुठे कधी पडलेला चिंचोका फुटून त्यातून कोंब, कधी कुठे जांभळाचे बी पडलेले त्यातून कोंब, लिंबोळ्यातून, दामुक्यातून रोपे तरारतात. एरवी केराचे डोंगर वाटणाऱ्या उकिरड्यावर कसले कसले वेल पसरू लागतात. बघता बघता सगळी धरणी तर हिरवीगार होतेच होते, पण घराची माळवदे व छपरेसुद्धा पोपटी दिसू लागतात. पावसानंतरची ही दुनिया म्हणजे चमत्कार असतो.

पेरणीची धांदल किती मोलाची. घरात माणूस गेलं तरी, ते झाकून ठेवून आधी घात साधायची.

थोरो म्हणतो की, कृषिकर्म ही एक कला आहे, असे प्राचीन दैवत, कथा, काव्ये सूचित करतात. पण आपण ही कला बेमुर्वतपणे, घिसाडघाईने हाताळतो मत्सर, स्वास्थ्य यामुळे भूमी ही आपली मालमत्ता आहे, संपत्ती मिळविण्याचे साधन आहे असे समजून चालण्याची जी विषयासक्त, नीच प्रवृत्ती आपणा सर्वांत आढळून येते, तिच्यामुळे शेतीप्रमाणे आमचाही अधःपात होतो.

शेतकऱ्याचे जीवन निकृष्ट बनते. त्याला निसर्ग म्हणजे एक डाकूच वाटू लागतो. एरवी कृषिकर्मातून मिळणारा लाभ हा विशेष पवित्र आणि न्यायपूर्ण असतो.

शेतकऱ्यांकडे, हा माझा मुख्य क्षेत्रपाल म्हणून शेते बघत नाहीत, तर त्याच्यावरची नजर काढून ती अधिक दयामय शक्तीकडे, ज्या त्यांना पाणी पुरवून हिरवेगार ठेवतात, त्यांच्याकडे वळवतात. क्षेत्र पिकते ते काही एकट्या शेतकऱ्यासाठीच नाही. अंशतः का होईना, पण ते पाखरांसाठी, कीटकांसाठी, जंगली प्राण्यांसाठी असते. मग शेतात तणच माजले तर, त्याने आनंदून का जाऊ नये? तणांची बियाणे म्हणजे पाखरांची अंबारे नाहीत का? ज्याप्रमाणे या वर्षी रानात चेस्टनट धरतील का नाही, याबाबतीत खारी पूर्णपणे निश्चित असतात, त्याप्रमाणे शेतकऱ्याने पीकपाण्याच्या बाबतीत असावे. मनोमनी फलाचा त्याग करून त्याने आपले रोजचे काम शांतपणे करीत असावे.

थोरो हा फार मोठा माणूस. त्याच्या मागोमाग जाणे आजवर तरी कुणाला साधलेले नाही. आपण आपले त्याचे साहित्य वाचावयाचे व आनंदून जायचे, एवढेच.

तर, मी म्हणत होतो की, आपले सगळे पावसावरच आहे. म्हणून आपण बारा महिन्यांच्या कालखंडाला वर्ष म्हणतो आणि आपला सगळा दैववाद्-सुद्धा या पावसामुळेच आपण स्वीकारलेला. आपली संस्कृती पावसाने घडवली आहे.

बऱ्याच वर्षांपूर्वी मी सावळा धर्मा खुडे यांचा एक बग ऐकला होता. त्यात राजा आपल्या लेकीचे स्वयंवर मांडतो. 'जो कोणी माझ्या तीन प्रश्नांचे उत्तर देईल त्यास माझी मुलगी माळ घालील,' असे सांगून तो तीन प्रश्न टाकतो ते असे–

मोठ्यात मोठा राजा कोण?

सर्वांत मोठा पुत्र कुणाचा?

सर्वांत मोठा दात कुणाचा?

कोणी काही, कोणी काही उत्तरे देतात. सगळी चूक. एक फाटका माणूस म्हणतो –

मोठ्यात मोठा राजा, मेघराजा,

मोठ्यात मोठा पुत्र गाईचा,
आणि मोठ्यात मोठा दात नांगराचा.
राजकन्येची माळ या भूमिपुत्राच्या गळ्यात पडते !

## १६

# पिकासोचे घुबड

प्राणी-पक्षी पाळण्याचा नाद पुष्कळांना असतो. या नादी लोकांतील बरीच मंडळी कुत्रा, मांजर, पोपट, मैना पाळणारे असतात. तीनचारशे वर्षांपूर्वी बाज पक्षी पाळून त्याच्याकडून शिकार करवून घेत असत. आजही परदेशात हा नाद चालतो.

काही वर्षांपूर्वी ‘ कोलिअर ’ नावाचे साप्ताहिक निघत असे त्यात एका नादी माणसाने गवळण ( ग्रासहॉपर ) कीटक बरेच महिने पाळून त्यावर एक मोठा लेख प्रसिद्ध केलेला मला आठवतो. गवळणीची नाना रंगीत छायाचित्रे घेऊन त्याने ह्या लेखात दिली होती. ही गवळण पुढे दुःखी दिसू लागली, तेव्हा तिच्यासाठी चांगला नवराही ह्या मालकाने शोधून आणला होता. ही नवराबायको काही काळ एकत्र नांदली. पुढे नवरा मेला आणि ही गवळणही गुंगारा देऊन कुठे गेली. काही दिवसांनी घराच्या आवारात, पुष्कळ लहानसान पोरे, मालकाला एका झुडपावर आढळली, असा त्या लेखाचा शेवट होता.

कोसला कादंबरीचे लेखक भालचंद्र नेमाडे ह्यांच्या अहमदनगरच्या बिऱ्हाडी मी एकदा गेले होतो, तेव्हा त्यांनी पाळलेला मोठा कोळी मी पाहिला होता. सकाळी मोरीत जाऊन मी तोंड धुऊ लागलो तेव्हा ते म्हणाले,

" संभाळा हां माडगूळकर, तिथं कोळी आहे, त्याच्या जाळ्यावर पाणी उडवू नका. मी पाळलाय त्याला. "

मग तो कोळी जाळ्यात कसा मस्त असतो, फावल्या वेळात आपण माश्या मारून त्याला कशा घालतो, पण मेलेल्या माशीत त्याला रस कसा नाही, हे त्यांनी मला सविस्तर सांगितले होते.

जगप्रसिद्ध चित्रकार पाब्लो पिकासो ह्यालाही असा शिकारखाना पाळण्याची हौस होती. त्याच्याकडे पिवळ्या रंजन रंगाचे, कुलूकुलू बोलणारे कनारी पक्षी होते, कबुतरे होती. टुर्टलडव्हज् जातीची पाखरे होती. आपल्या मित्रांच्या हेतूबद्दल पाब्लोला जसा संशय असे, तसा या मित्रांबद्दल नसे.

म्युझियममधल्या कोपऱ्यात सापडलेले एक जखमी घुबड त्याला कोणी मित्राने आणून दिले. ह्या घुबडाचा एक पंजा दुखावलेला होता. काही दिवस मलमपट्टी केल्यावर तो बरा झाला. मग या घुबडासाठी सुरेख पिंजरा आणून, इतर पक्ष्यांबरोबर पाब्लोने त्यालाही पाळले.

घरातली सगळी माणसे ह्या दिवाभिताशी प्रेमाने वागत. येता-जाता त्याच्या पिंजऱ्याशी जाऊन बोलत, पण घुबड फार माणूसघाणे होते. ते सर्वांकडे फक्त रखारखा बघत असे. सगळे पाळीव पक्षी स्वयंपाकघरात होते. पाब्लो किंवा फरान्सवाद ( पिकासोची तरुण मैत्रीण ) ह्यांपैकी कोणीही स्वयंपाकघरात गेले की कनारी चिवचिवाट करत, कबुतरे घुमू लागत, टुर्टलडव्हज हसू लागत, पण हे घुबड मात्र ढम्म बसून असे. कधी त्याचा आवाज उमटलाच तर ते रागीट गुरगुरणे असे.

ह्या माणूसघाण्या घुबडाच्या अंगाला फार घाण येई. उंदराशिवाय ते कशालाही चोच लावीत नसे. पाब्लोच्या स्टुडिओत पुष्कळ उंदीर धुडगूस घालीत. बिचारी फरान्सवाद रोज अनेक सापळे स्टुडिओत लावून ठेवी आणि उंदीर सापडला रे सापडला की ह्या उर्मट घुबडाला आणून घाली. आता कोणीही प्राणी, अगदी प्राणिसंग्रहालयातला वाघसुद्धा, खाद्य पुढ्यात आले की त्याच्यावर लगेच तुटून पडतो. पण हे घुबड, खाद्याकडे आणि ते आणून घालणाऱ्या फरान्सवादकडेही संपूर्ण दुर्लक्ष करी.

घुबडाला दिवसा दिसत नाही असा एक समज आहे, पण तो काही खरा

नाही. ह्या घुबडाला छान दिसत असे. पण दिसून न दिसल्यासारखे दाखविण्यातच त्याला प्रौढी वाटे. फरान्सवाद जरा कुठे स्वयंपाकघराबाहेर गेली रे गेली की, दरम्यानच्या काळात घुबडाला घातलेला उंदीर नाहीसा होई.

काही तासांनंतर केसाची लहानशी गुठळी घुबडच बाहेर टाकी, ती पाहून समजावे की उंदराचे काय झाले.

पाब्लोला बघून घुबड गुरगुरले की हा साठ वर्षे उलटून गेलेला, जगप्रसिद्ध चित्रकार त्याला उलट चार इरसाल शिव्या मोजी. का तर, हा आपल्यापेक्षा वरचढ आहे हे घुबडाला कळावे, आपण एक असभ्य झालो तर हा दहा होईल याची खात्री त्याला पटावी. अशा शिव्या मोजल्यानंतर पिकासो आपले बोट बळेच घुबडापुढे धरी. घुबड चावा घेई. पण चित्रकाराची बोटे चांगली टणक होती, त्यांना इजा होत नसे.

पुढे काही दिवसांनी घुबडाने चावणे सोडून दिले. पाब्लोने त्याच्या डोक्यावर खाजवले तरी ते गप्प राहू लागले. बोट पुढे केले की चावण्याऐवजी त्याच्यावर बसू लागले.

या घुबडाचे एक सुरेख शिल्प पिकासोने केले. हे नुसते घुबडाचे शिल्प नाही तर त्याच घुबडाचे आहे.

कबुतरे घुमायची, पण टुर्टलडव्हज् खरेच हसायची. राखी फिक्कट गुलाबी रंगाची ही लहान पाखरे होती.

पाब्लो आणि फ्रान्सवाद स्वयंपाकघरात जेवण्याच्या टेबलावर येऊन बसली की, बऱ्याच वेळा पाब्लोला लहर यायची. एखाद्या फिलॉसॉफरसारखे त्याचे स्वगत भाषण सुरू व्हायचे. मग ही पाखरे लक्षपूर्वक मालकाचे बोलणे ऐकत राहात. बोलता बोलता पिकासो मुद्द्यावर आला की, ही टुर्टलडव्हज् एकदम फिदीफिदी हसणे सुरू करीत.

पिकासो म्हणे,

"ही पाखरे तत्त्ववेत्त्याच्या कामाची आहेत मनुष्यप्राण्याच्या सगळ्या वचनांना एक मूर्खपणाची बाजू पण असते. माझं सुदैव म्हणून ही पाखरं इथं आहेत. ज्या ज्या वेळी, आपण फारच विद्वत्तापूर्वक बोललो असा गर्व मला होतो तेव्हा ही माझी टर उडवतात आणि गर्वहरण करतात."

एकोणीसशे त्रेचाळीस साली. सायकलचे जुने हँडल आणि जुने सीट

ह्यातून "बैलाचे डोके" नावाचे शिल्प पिकासोने तयार केले. ह्या शिल्पाचं सर्वत्र फारच बहावा झाली. पण, वास्तव म्हणजे काय, ह्यासंबंधीच्या सतत बदलणाऱ्या कल्पना ध्यानात येऊन पिकासो म्हणाला—

"एक दिवस असा उजाडेल की, कोणी तरी पुन्हा शोध लावील, अरे, हे बैलाचं डोकं नाही, हे खरं जुन्या सायकलचं हँडल आणि सीट आहे."

'ला फाम फ्लर' (आपण फुलवंती म्हणू) ह्या नावाने प्रसिद्ध असलेलं फ्रान्सवादचे पोर्ट्रेट पिकोसोने अगदी वेगळ्या पद्धतीने चितारले आहे, एखादं फुलझाड चितारावे तसे.

फ्रान्सवादला तो म्हणाला,

"तिसरा हिस्सा मानवजात जनावरासारखीच दिसते. पण तू वेगळी आहेस. एखाद्या फुलझाडासारखी. मला काळजी होती. ही कल्पना मी मूर्त कशी करू. तू जनावरांच्या जातीतली नाहीस. वेलाफुलांच्या जातीतली आहेस हे मी कसं दाखवू? आतापर्यंत, अशा पद्धतीनं कुणाचं पोर्ट्रेट करावं असं मला वाटलं नव्हतं. पण हीच पद्धत योग्य आहे. ही तूच आहेस."

चित्रफलकापुढे उभा राहिला म्हणजे पिकासो चार चार तास उभा असे. त्याला थकवा कसा येत नाही याचा अचंबा तरुण फ्रान्सवादला वाटे. हा प्रश्न विचारल्यावर पिकासोने उत्तर दिले—

"मला थकवा मुळीच येत नाही. मुसलमान लोक मशिदीत शिरताना पायातले जोडे बाहेर काढून ठेवतात, तसं काम करताना मी शरीर बाहेर ठेवतो."

REFBK-0022732

२०६४
22632
निबंध

REFBK-0022732

आगामी प्रकाशने

व्यंकटेश माडगूळकर

**चिंपँझींच्या शोधात**

**नागझिरा** ( जंगलातील दिवस )